# आम्ही सारे पृथ्वीपुत्र

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.
IRBK-0115590



—सी. अ. देसाई

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा.वा.
दा. क्र. १०४

१०६

BVBK-0400104

कि.

बा. वा.
नों. क्र. ९०४

म. ग्रं. सं. ..., ... शाखा.

दा. क्र. ९०४

विषय किशोर क्र. 63

# हिरकण्या

[ तुर्कस्तानातील १५ व्या शतकात होऊन गेलेल्या "होजा" नावाच्या, बिरबलसारख्या शहाण्या (आणि दीड-शहाण्याही) चतुर व्यक्तीच्या मनोरंजक व उद्‌बोधक अशा १२५ छोट्या छोट्या कथा ]

BVBK-0400104

: लेखक :

प्रो. भा. म. गोरे एम्. ए.

पुणे ४

म. ग्रं. ... शाखा.
... व
दा. क्र. १०४

अरगडे - कुलकर्णी प्रकाशन, पुणे ३०

किंमत २-५० रुपये

प्रकाशिका :
**सौ. निर्मला नारायण अरगडे**
अरगडे कुलकर्णी प्रकाशन
१६।२२४ लोकमान्यनगर
पुणें ३०.

प्रथमावृत्ति
ऑगस्ट १९६९

सर्व हक्क प्रकाशिकाधीन

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग-कुलाबा

# कथानायकाचा परिचय

कालिदास, बिरबल, तेनालिरामन्, डॉन क्विक्झोट, इसाप यांच्या
ांच्या, हजरजबाबीपणाच्या, व्यवहारकौशल्याच्या शेकडो कथा कैक
ांपासून आबालवृद्धांच्या ऐकिवात आणि वाचनात आहेत. त्यात
', (नसरद्दिन होजा) या नावाची या पुस्तकामुळे भर पडणार आहे.

तसे म्हटले तर होजा ही व्यक्ती बिरबलाच्याही पूर्वकालातील, म्हणजे
ऱंगाच्या वेळेची. (सुमारे इ. स. १४०० सालच्या सुमाराची) तुर्क-
, मध्य आशिया, ग्रीस, बाल्कन् द्वीपकल्प यात कैक शतके होजाच्या
[ तुर्क कथा आबालवृद्धांत अत्यंत लोकप्रिय झालेल्या आहेत. होजा ही
बिरबल्याकडील " पंडित " किंवा " महामहोपाध्याय " या सारखी तुर्की
रंजकी होती. १९३५ मध्ये केमालपाशाने अशा धार्मिक पदव्या रद्द केल्या.
र्यंत या पदवीचा उपयोग करण्यात येत असे. मोठी थोरली पगडी आणि
व अंगरखा ही मानाची वस्त्रे या पंडितांना देण्यात येत. पुढील कथांत
सन्मानदर्शक वस्त्रांचे अनेक उल्लेख आढळतील.

हे " होजा " पंडित विशेषतः धर्मशास्त्रात तज्ज्ञ असत. कुराण पठण
रणे मशिदीत 'खतीब' किंवा प्रवचनकाराचे काम करणे आणि
ापलेकडील खेड्यातील भिक्षुकांप्रमाणे खेडोपाडी हिंडत, 'रमजान' या
ार्मिक महिन्यात दक्षिणा गोळा करणे ही कामे ते करीत. शिवाय नसरद्दिन
ोजासारखे गरीब पंडित शेतीच काय पण भाजी विकण्यासारखी कामे
करण्यात कमीपणा मानीत नसत. याविषयीच्या काही कथाही या संग्रहात
आढळतील.

या संग्रहात होजाच्या चातुर्याच्या व हजरजबाबीपणाच्या अनेक कथा
आहेत. त्यांतील काहींचे बिरबल, तेनालिरामन् आणि महाराष्ट्रातील काही
कहाण्यांतील प्रसंगांशीहि साम्य आढळेल. याचे कारण म्हणजे अशा लोकांशी
निगडित केलेल्या अनेक कथा म्हणजे खरोखर लोकवाङ्मय, लोककथा
अ ांचे नमुने असतात. तत्कालीन लोकप्रि मलेल्या प्रसिद्ध व्यक्तींशी त्या
डून देण्याची चाल असे. मात्र अशा चातुर्य कथांपेक्षा 'एक विशेष'
जाच्या या कथांत आढळून येईल.

तो म्हणजे या कथा जशा "शहाण्यांच्या" कथा आहेत तशाच त्यापैकीं अनेक "दीड शहाण्याच्या" ही आहेत. रामदासांनी ज्यांना "पढतमूर्ख" म्हटले आहे. अशा दीडशहाण्यांच्या, मूर्खांच्या हास्यापद कृतीही पुढील अनेक कथांतून दिसून येतील. लोककथांतही विद्वान, राजे, श्रीमंत वगैरेंची हुरेवडी उडवून सामान्य लोकांना विजयाचा आनंद मिळवून देण्याचे प्रयत्न दिसून येतात. तैमुरलंगासारख्या क्रूर राजाचीही होजाने केलेली फजिती, स्वतः होजाची अनेक वेळी झालेली फजिती यांतून सामान्य व्यक्तींना खूपसे गौरवाचे समाधान प्राप्त झाले असेल.

"नसरद्दिन होजा" ही व्यक्ती खरोखर होऊन गेली की नाही या विद्वानांतील वादात आपल्याला शिरण्याचे कारण नाही. आशियातील तुर्कस्तानच्या भागात "अंक शहिर' या गावी त्याची कबर अद्याप दाखविण्यात येते. हे गाव व "सिवरी-हिसार" या तुर्की किल्ल्याचे अनेक उल्लेख या कथांत आढळतील. काहींच्या मते त्याचा जन्म इ. स. ९९३ मध्ये झाला. तर कित्येक त्याला १३ व्या शतकातला मानतात. तैमूरलंग या मोंगल विजेत्याची भारतालाही अद्याप आठवण आहे. त्याने तुर्कांच्या साम्राज्याची धूळधाण उडवून तेथेही अनन्वित कत्तली केल्या होत्या. (इ. स. १४००) होजा आणि तैमूरलंग यांच्या संबधी काही कथा या संग्रहात सापडतील.

विद्वानांच्या मते होजाच्या या कथांपैकीं अनेक कथा "हूजा" नावाच्या अरब व्यक्तीबद्दल फार्शी भाषेत ११ व्या शतकात लिहिलेल्या असून "हूजा" या नावाचाच "होजा" हा अपभ्रंश असावा. याला आधार म्हणजे यापैकी काही कथा जलालुद्दिन रूमी या फार्शी तत्त्ववेत्त्याने आपले तत्त्वज्ञान विशद करताना सांगितल्या आहेत. "रूमीच्या नीतिकथा" या नावाने त्या प्रसिद्ध आहेत. या फार्शी कथांपैकी काही पुढे तुर्कस्तानात येऊन, त्यांत बदल व भर पडून, त्या "होजाच्या कथा" म्हणून प्रसिद्धीस आल्या असाव्या असे समजण्यास हरकत नाही. लोक कथांचा असा दूर-दूरचा प्रवास लोककथांच्या अभ्यासकांना अपरिचित नसावा. अरब, आर्मेनियन, ग्रीक, सर्व तुर्की वगैरे लोकांत या कथा अद्याप फार लोकप्रिय आहेत. मराठीत मात्र या कथा पहिल्यानेच येत आहेत. मराठी वाचकां-

नाही हा "होजा" आपल्यातलाच वाटावा एवढे मानवी स्वभावातले साधर्म्य या कथांत आहे, असा आमचा विश्वास आहे. विशेषतः बाल व कुमार वाचकांना या गोष्टी विशेष आवडाव्या अशा आहेत. कारण त्यापैकी बहुतेकांत विनोदाची स्थूल किंवा सूक्ष्म अशी खुलावट आढळेल. १५ व्या शतकांतील होजाच्या या कथा सुमारे शंभर वर्षांपूर्वी बार्कर या लेखकाने इंग्रजीत भाषांतरून प्रसिद्ध केल्या. या कथांचे पुनर्लेखन डाउनिंग या लेखकाने १९६४ साली करून प्रसिद्ध केले आहे. यावरून या कथांचे चिरस्थायी स्वरूप लक्षांत येईल. मराठीत या कथा पहिल्यानेच येत आहेत. या कथांतील सामाजिक, धार्मिक जीवनविशेषांबद्दल विस्तार करण्याचे कारण नसले तरी वाचकांचा गैरसमज होऊ नये म्हणून फक्त एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्य आहे.

अनेक कथांत "होजाच्या गाढवाचा" उल्लेख येतो. हे गाढव म्हणजे भारत किंवा महाराष्ट्रातील गरीब, मठ्ठ लहानसर प्राण्यासारखे समजू नये. मध्य आशियातील अनेक देशात मोटारींचा प्रसार होण्याआधी वाहन म्हणून गाढवांचाच उपयोग करण्यात येत असे. ही गाढवे चांगली देखणी, उंच, स्वच्छ, हुशार व दमदार असत. घोडे आणि उंट यांचा उपयोग लांबलांबच्या प्रवासासाठीच मुख्यत्वेकरून होत असे. होजासारख्या गरीब पंडिताला सरदारी घोड्यापेक्षा सामान्य जनांचे गाढवच अधिक जवळचे वाटावे यात नवल नाही. असो.

अशा रीतीने आम्ही प्रथमच मराठीत आणलेला हा फार्शी-तुर्की होजा मराठी वाचकांनाही आवडावा, आणि इकडील लोककथांच्या नायकांत त्याचीही पुढे गणना व्हावी एवढीच इच्छा व्यक्त करून वाचकांची रजा घेतो.

७७३/६ (अ) ईशकृपा
पुणें ४.

भा. म. गोरे

# अनुक्रमणिका


क्र. कथा पृष्ठ

परिचय ६

१. नगाला नग ९

२. सत्यात नाही आले –
स्वप्नात येऊ का ? ९

३. हरवले ते गवसले का ? १०

४. एकबाणी – एकवचनी ! १२

५. हे कोण बोलले बोला ? १२

६. वही होता है, जो मंजुरे
उ खुदा होता है। १३

झा माझे मरण मी पाहिले
डोळा १४

८. द्वयानां धूर्तानाम् । १५

९. अगा जे झालेचि नाही १६

१०. गुरोस्तु मौनं व्याख्यानम् । १६

११ विडा पैजेचा उचलू नको ! १८

१२. अबोला बरा या काला २०

१३. बहुरूपा ही जनवाणी २०

१४. फेकला तटाहुन घोडा २१

१५. रामाय स्वस्ति ।
रावणाय स्वति ॥ २२

१६. दे माझिया धनाला । २३

१७ बोलाचीच कढी,
बोलाचाच भात २४

१८. पागोटे आणि विद्वत्ता २५

१९. देणे आणि घेणे २६

क्र. कथा पृष्ठ

२०. लोळणचि भूमिवरी ।
मोक्ष वाटे मना ॥ २७

२१. भोळी खुळी गवसति जी २८

२२. दिलरुबा मधुर हा ! २९

२३. सागरा ! प्राण तळमळला २९

२४. मूर्ती छोटी पण किर्ती मोठी ३०

२५. अति रागा, भीक मागा ! १

२६. धन विरहित ज्ञान
फुकट मान ! ३३

२७. परलोकची सफर–स्वस्तात ! ३५

२८. किती गोड गोड बदला ३६

२९. नाचत ना गगनात ३७

३०. बोल तुझे अनमोल ३७

३१. देनेवाला जबहि देता ।
पूरा छप्पर फाडके देता । ३९

३२. वादे वादे जायते तत्त्वबोधः ४३

३३. आधी अनाना, मग तनाना ४५

३४. खटासि व्हावे खटनट । ४६

३५. काय हो चमत्कार ! ४७

३६. आधी कळस मग पाया रे ! ४८

३७. उद्धवा अजब तुझे सरकार ४८

३८. कथा कुणाची,
व्यथा कुणा ? ४९

३९. अन्न हे पूर्णब्रह्म ! ५०

४०. जुगलबंदी ५१

| क. | कथा | पृष्ठ |
|---|---|---|
| ४१. | जा घेउनि संदेश ! | ५२ |
| ४२. | आसुरी लालसा | ५२ |
| ४३. | दीवाना हूँ मैं। | ५३ |
| ४४. | हुकुमाचा मी बंदा। स्वहिताचा माझा धंदा | ५४ |
| ४५. | सखे शेजारिणी ..! | ५५ |
| ४६. | कर-न-करीचा वसा | ५५ |
| ४७. | सुईच्या अग्रावरी, वसे एक गांव | ५६ |
| ४८. | मौनं सर्वार्थ साधनम्। | ५८ |
| ४९. | हे कधी होईल का? | ५९ |
| ५०. | प्रभु तेरि माया। परम अपारा ॥ | ६० |
| ५१. | या लाडक्या मुलांनो ! | ६१ |
| ५२. | वाऱ्यावरची वरात ! | ६१ |
| ५३. | हे फळ काय मम तपाला ? | ६२ |
| ५४. | माझे आहे मजपाशी | ६३ |
| ५५. | श्रेष्ठ कोण ?– बायको की गाढव ? | ६४ |
| ५६. | जन खुळे नादावले. | ६४ |
| ५७. | नरो वा कुंजरो वा ! | ६५ |
| ५८. | शशि सूर्यप्रभा गगनाची | ६५ |
| ५९. | दिसे अजब कट्यार ! | ६६ |
| ६०. | मसाला मुर्गी | ६७ |
| ६१. | मी तो हमाल, भारवाही | ६७ |
| ६२. | वैद्यराज, नमस्तुभ्यम्। | ६८ |
| ६३. | समसमा संयोग की जाहला ! | ६९ |

| क. | कथा | पृष्ठ |
|---|---|---|
| ६४. | साहे ओझे त्यास, तेचि द्यावे | ७० |
| ६५. | जशास तसे. | ७१ |
| ६६. | आप लिखे, खुदे बांचे। | ७२ |
| ६७. | चंद्रकिरणांचा झोला | ७२ |
| ६८. | तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख ! | ७३ |
| ६९. | तुझी रे सारी उलटी तऱ्हा ! | ७४ |
| ७०. | मरण बरें बा, दरिद्रता खोटी | ७५ |
| ७१. | खेड्यामधले घर कौलारू | ७६ |
| ७२. | भट समरिं जरी तू, मी महावादी जेता ! | ७६ |
| ७३. | नोहे हा पवन, जवन वारू भासतो ! | ७७ |
| ७४. | गंगा यमुना डोळ्यात उभ्या कां | ७९ |
| ७५. | याहुनि आंधळा बराच मी | ८० |
| ७६. | जसा प्रश्न तसे उत्तर | ८० |
| ७७. | मी समजू तरी काय ? | ८१ |
| ७८. | मुद्रिके शोधू कुठे तुजला ? | ८१ |
| ७९. | आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी ! | ८२ |
| ८०. | कोणता मानू चंद्रमा ? | ८२ |
| ८१. | ईशेच्छा प्रमाण ! | ८३ |
| ८२. | हसत हसत फसवुनि | ८४ |

क्र. कथा पृ


८३. बाळपणीचा काळ सुखाचा ! ८
८४. झणि दे कर या ! ८
८५. बधुनि त्या भयंकर भूता ८
८६. मान ना मान। मैं तेरा मेहमान। ८
८७. महाघोर मरणातुनि सुटलो। ८
८८. वारुवरी होउनि स्वार ८
८९. उधार–उसनवार ९
९०. बुभुक्षितः किं न करोति पापम् ? ९
९१. धन्य ते गायनी कळा ! ९
९२. वेड्याचे घर उन्हात ९
९३. वारा फोफावला ! ९
९४. दुनिया क्या है ? ९
९५. जमविला रानचा मेवा ! ९
९६. ज्या गावच्या बोरी— ९
९७. वीतभर लाकूड, हातभर ढलपी ९
९८. शर लागला ९
९९. ऊपरसे तो खूब बनी ९
१००. रानोमाळ, आंधळ्यांची चाले माळ ९
१०१. श्रमसाफल्य ९
१०२. दिल्या घरी तू सुखी रहा ! ९
१०३. शापादपि, शरादपि १०


क्र. कथा पृष्ठ


१०४. झुकानेवाला चाहिये १०१
१०५. माणसाचे मोल १०३
१०६. जन पळभर म्हणतिल हाय ! १०३
१०७. हा वीणाझंकार १०४
१०८. कौशल्य मोठे रचनेत आहे १०४
१०९. मनात आले तर बच्चंजी ! १०५
११०. भिंत खचली, कलथून खांब गेला ! १०६
१११. मोहरेचे मोल १०६
११२. जाये तो जाये कहां ? १०७
११३. घट भरा, शिगोशिग भरा १०८
११४. एक नूर आदमी, दस नूर कपडा १०८
११५. चोरावर मोर ! १०९
११६. सदा कलहा विना ! ११०
११७. एके दिनी नवल झाले ११०
११८. फटाटोपो भयंकरः १११
११९. घास घ्या हो नारायणा ११२
१२०. साद घातली सखया तुला ११२
१२१. तस्करा हाती ११३
१२२. द्राविडी प्राणायाम ११३
१२३. हले डुले नाव ही ११४
१२४. मधुबिंदु लाभले जिथे ११५
१२५. लागले नेत्र हे पैलतिरी ११६

१०४

# १ : नगाला नग

एके दिवशी होजा घरी परत येत असता एका माणसाने मागून येऊन त्याच्या डोक्यावर एक तडाखा दिला. होजाने मागे वळून पाहिल्यावर त्या मनुष्याने माफी मागून म्हटले, ‘ मला वाटलं हा माझा मित्रच आहे ! ’ पण होजाला फार राग आला होता. त्याने त्या मनुष्याला कोर्टात खेचले. पण तो मनुष्य निघाला न्यायाधिशाचा परम मित्र !

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यावर न्यायाधीश त्या माणसाला म्हणाला—‘ हे पाहा, चूक तुझी आहे. तेव्हा तू या होजाला नुकसान भरपाई म्हणून एक पै दिली पाहिजे. ’

त्या मनुष्याजवळ त्या वेळी एक पै नसल्याने तो म्हणाला, ‘ थांबा हं ! मी आता जाऊन घेऊन येतो—’ पण तो आलाच नाही. इकडे होजाने एक तासभर वाट पाहिली. पण तो माणूस येत नाही असे पाहून तो उठला. बाहेर जाताना खुद्द न्यायाधिशांच्या डोक्यावर एक तडाखा मारून तो म्हणाला,— ‘ साहेब ! आता मला थांबायला वेळ नाही. तो माणूस आला म्हणजे एका तडाख्याची नुकसान भरपाई एक पै ही तुम्हीच ठरविलेली रक्कम माझ्याऐवजी तुम्हीच माझ्या वतीने स्वीकारा म्हणजे झालं ! ’

---

# २ : सत्यात नाही आले स्वप्नात येऊ का ?

एकदा उन्हाळ्यात दुपारी होजाला डुलकी लागली होती. तेव्हा त्याला स्वप्न पडले की कोणी एक माणूस आपल्याला दहा मोहरा देण्याचे वचन देत आहे. नंतर तो माणूस त्या मोहरा एक एक अशा

मोजून होजाच्या हातावर ठेवू लागला. अशा रीतीने त्याने नऊ मोहरा त्याच्या हातावर ठेवल्या. पण दहावी ठेवताना तो जरा घुटमळला. होजा म्हणाला– 'का थांबलात? मला दहा मोहरा देण्याचे तुम्ही वचन दिलं आहे!'

तेवढ्यात होजाला जाग आली. त्याने पाहिले तर त्याच्या हातात काहीच नव्हते.

तेव्हा होजाने चटकन् आपले डोळे मिटले आणि आपला हात पुढे केला आणि तो म्हणाला—

'बरं, बरं! नऊ मोहरांवरच तोडू या आपण! आणा त्या नऊ मोहरा!'

---

## ३ : हरवले ते गवसले का?

एके दिवशी होजा बाजारातून कोकराच्या मांसाचा एक छानसा तुकडा घरी घेऊन आला. त्याने तो आपल्या पत्नीला दिला. आता याचे खमंगसे जेवण आपल्याला मिळेल; असे सुखस्वप्न रंगवीत तो पुन्हा बाजारात गेला आणि सवंगड्यासह कॉफी पिणे, हुक्का ओढणे यात मजेने वेळ घालवू लागला.

इकडे त्याची पाठ वळल्यावरोबर त्याच्या पत्नीने त्या मांसाचे तुकडे केले. ते तारेवर लावून त्याचे छानसे कबाब भाजले. आपल्या साऱ्या साळकाया माळकाया गोळा करून मेजवानीचा थाटच उडवून दिला तिने.

या साऱ्या पाहुण्या गेल्यावर होजा डुलत डुलत घरी आला आणि जेवावयास बसला आणि पाहातो तो काय केवळ वाडगाभर कसल्यातरी रस्श्याचे पुळकवणी पाणी त्याच्या पत्नीने त्याच्यापुढे ठेवले. त्यावर

होजाने विचारले, ‘मी बाजारातून आणलेल्या मांसाचे काय झाले?’ यावर त्याच्या बायकोने थाप मारली– ‘अहो मांजरानं खाल्लं ते सारं.’

होजानं विचारले, ‘असं काय? त्या मांसाचं वजन कितीसं असावं?’

बायको घुटमळत म्हणाली, ‘असेल शेर दीड शेर.’



होजाने ते मांजर उचलेले आणि एका तराजूत घालून त्याच वजन केले.

तो म्हणाला, ‘अरे वा! बरोबर दीड शेर वजन आहे या मांजराचं. पण मला हे कळत नाही की, हे मांजर दीड शेराचे असेल तर, ते दीड शेर मांस कुठे गेलं? आणि हे दीड शेर वजन त्या मांसाचे असेल तर मग ते मांजरच कुठं आहे?’

आणि विचारा होजा डोके खाजवीत विचार करू लागला.

मोजून होजाच्या हातावर ठेवू लागला. अशा रीतीने त्याने नऊ मोहरा त्याच्या हातावर ठेवल्या. पण दहावी ठेवताना तो जरा घुटमळला. होजा म्हणाला– ‘ का थांबलात? मला दहा मोहरा देण्याचे तुम्ही वचन दिलं आहे ! ’

तेवढ्यात होजाला जाग आली. त्याने पाहिले तर त्याच्या हातात काहीच नव्हते.

तेव्हा होजाने चटकन् आपले डोळे मिटले आणि आपला हात पुढे केला आणि तो म्हणाला—

‘ बरं, बरं ! नऊ मोहरांवरच तोडू या आपण ! आणा त्या नऊ मोहरा ! ’

---

## ३ : हरवले ते गवसले का ?

**एके** दिवशी होजा बाजारातून कोकराच्या मांसाचा एक छानसा तुकडा घरी घेऊन आला. त्याने तो आपल्या पत्नीला दिला. आता याचे खमंगसे जेवण आपल्याला मिळेल; असे सुखस्वप्न रंगवीत तो पुन्हा बाजारात गेला आणि सवंगड्यासह कॉफी पिणे, हुक्का ओढणे यात मजेने वेळ घालवू लागला.

इकडे त्याची पाठ वळल्यावरोबर त्याच्या पत्नीने त्या मांसाचे तुकडे केले. ते तारेवर लावून त्याचे छानसे कबाब भाजले. आपल्या साऱ्या साळकाया माळकाया गोळा करून मेजवानीचा थाटच उडवून दिला तिने.

या साऱ्या पाहुण्या गेल्यावर होजा डुलत डुलत घरी आला आणि जेवावयास बसला आणि पाहातो तो काय केवळ वाडगाभर कसल्यातरी रस्श्याचे पुळकवणी पाणी त्याच्या पत्नीने त्याच्यापुढे ठेवले. त्यावर

होजाने विचारले, 'मी बाजारातून आणलेल्या मांसाचे काय झाले?' यावर त्याच्या बायकोने थाप मारली– 'अहो मांजरानं खाल्लं ते सारं.'

होजानं विचारले, 'असं काय? त्या मांसाचं वजन कितीसं असावं?'

बायको घुटमळत म्हणाली, 'असेल शेर दीड शेर.'



होजाने ते मांजर उचलेले आणि एका तराजूत घालून त्याच वजन केले.

तो म्हणाला, 'अरे वा! बरोबर दीड शेर वजन आहे या मांजराचं. पण मला हे कळत नाही की, हे मांजर दीड शेराचे असेल तर, ते दीड शेर मांस कुठे गेलं? आणि हे दीड शेर वजन त्या मांसाचे असेल तर मग ते मांजरच कुठं आहे?'

आणि विचारा होजा डोके खाजवीत विचार करू लागला.

# ४ : एकवाणी : एकवचनी !

**एकदा** एका माणसाने होजाला त्याचे वय विचारले. होजाने उत्तर दिले, ‘ चाळीस ! ’

दहा वर्षे लोटली. आणि दुसऱ्या एकाने होजाला पुन्हा त्याचे वय विचारले. होजाने पूर्वीचेच उत्तर दिले, ‘ चाळीस ! ’

दहा वर्षांपूर्वी होजाने उत्तर दिले होते त्या वेळी हजर असलेल्या एका मनुष्याने त्याला प्रश्न केला, ‘ काय हो तुम्हाला दहा वर्षांपूर्वी तुमचं वय विचारलं होतं तेव्हा देखील तुम्ही चाळीसच सांगितलं नाही का ? ’

होजाने न डगमगता उत्तर दिले, ‘ अगदी बरोबर ! माणसाने एकदा जे सांगितलं त्यात कधी बदल करता कामा नये, खरं का नाही ? ’

# ५ : हे कोण बोलले बोला ?

**एक** शेजाऱ्याने एकदा होजाजवळ त्याचे गाढव उसने मागितले.

होजा म्हणाला, ‘ ते गाढव सध्या माझ्याजवळ नाही. ’

तेवढ्यात त्याच्या परड्यातून गाढवाच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला. तो ऐकून शेजारी त्याला टोचून म्हणाला, ‘ का हो राजेश्री ! तुमचं गाढव इथं नाही असं तुम्ही आताच म्हणालात; पण मला तर त्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येत आहे. ’

होजा आपले डोके हालवीत म्हणाला, ‘ अरेरे ! तुम्हाला एवढासुद्धा विश्वास नाही का ? एखाद्या गाढवाच्या आवाजावर तुमचा विश्वास बसतो, पण काळ्याचे पांढरे झालेल्या माझ्यासारख्या वजनदार माणसाच्या शब्दावर तुमचा विश्वास बसू नये हे अजबच नव्हे काय ? ’ तो शेजारी जे समजावयाचे ते समजून निमूटपणे निघून गेला !

# ६ : वही होता है। जो मंझुरे खुदा होता है ॥

एके दिवशी संध्याकाळी होजा आपल्या पत्नीला म्हणाला, 'उद्या जर पाऊस पडला तर मी रानात जाऊन जळण गोळा करून आणीन. जर उघडीप असली तर जाऊन शेत नांगरीन.'

त्याची बायको म्हणाली, 'चांगल्या मुस्लीमाप्रमाणे यावर 'इन्शाल्ला' (परमेश्वराची इच्छा असेल तर!) असे म्हणा.'

होजा उसळून म्हणाला, 'तसं का म्हणायचं? एक तर पाऊस पडेल, नाहीतर पडणार नाही. या दोन्ही परिस्थितीत काय करायचं ते मी ठरवून ठेवलंच आहे. परमेश्वराच्या इच्छेचा येथे प्रश्नच येतो कुठे?'

दुसऱ्या दिवशी पाऊस न पडल्याने होजा शेत नांगरण्यासाठी बाहेर पडला. वाटेत त्याला शिपायांची एक तुकडी भेटली. त्यांनी विचारले, 'काय हो काका! त्या पलिकडच्या खेड्याला जाण्याची वाट कोणती?'

होजाला वाटलं, कुठे या लोकांना आपण सांगत बसावं? असा विचार करून तो म्हणाला, 'मला नाही आठवत!'

या उत्तराने त्या शिपायांना राग आला आणि ते होजाला हातातल्या काठ्यांनी बडवून काढू लागले. त्यावर होजा ओरडू लागला, 'अहो! आता मला आठवतंय्!'

हे ऐकून ते शिपाई म्हणाले, 'असं काय? चल मग. आम्हाला तेथपर्यंत घेऊन चल.'

वाटेत पाऊस येऊ लागला आणि त्या खेड्यात शिपायांना घेऊन जाईपर्यंत होजा भिजून चिंब झाला. त्याच्या अंगावर चिखल उडाला होता आणि त्याचे पाय अगदी थकले होते.

मध्यरात्रीच्या सुमाराला खुरडत खुरडत तो घरी आला आणि दार ठोठावू लागला. आतून बायकोने विचारले, 'कोण आहे ते?'


बाहेरून होजा म्हणाला, 'अगं मी आहे– अन् हो....इन्शाल्ला.... बरं का.'

# ७ : माझं मरण म्या पाहिले डोळा !

एका रात्री होजाने खिडकीतून बाहेर पाहिले असता चांदण्यात त्याला एक आकृती दिसली. आपले बाहू पसरून एक माणूस उभा आहे असे त्याला दिसले. होजाने घाईघाईने आपल्या बायकोला जागे केले. तो म्हणाला, 'अग कुणीतरी भयंकर माणूस आपल्या बागेत शिरला आहे. चटकन् जाऊन माझा तिरकामठा आणि बाण घेऊन ये.'

तिरकमठ्याची दोरी ओढून त्याने एक बाण सोडला तो त्या आकृतीच्या नेमका पोटात घुसला. इकडे होजा ऐटीने आपल्या पत्नीला म्हणाला, 'भली खोड मोडली गुलामाची. मला त्रास द्यायला येतोय काय?'

तरीही बागेत जाण्याची त्याला भीती वाटत होती. तो म्हणाला, 'राहू दे त्याला तिथं पहाटेपर्यंत.'



सकाळी होजा बागेत गेला. तेव्हा त्याला दिसले की, आपल्या

बायकोने आपला अंगरखा धुऊन दोरीवर वाळत घातला होता त्यातच आपला त्राण घुसला आहे. हे पाहून होजाने गुडघे टेकले आणि तो मोठ्या भक्तीने परमेश्वराचे आभार मानू लागला. ते पाहून त्याची पत्नी म्हणाली, 'आज इतकी भक्तीनं प्रार्थना चाललेली दिसतेय, झालं तरी काय एवढं?'

होजा उत्तरला, 'ए वया! दिसत नाही का तुला? माझा तीर या अंगरख्याच्या थेट मध्यातून गेला आहे. आता देवाची कृपा. नाहीतर त्या वेळी हा अंगरखा माझ्या अंगावर असता तर काय झालं असतं, याची कल्पनाच कर म्हणजे झालं!'

---

## ८ : द्वयानां धूर्तानाम्!

एके रात्री होजा आणि त्याची पत्नी स्वस्थपणे झोपली होती. मध्यरात्रीच्या सुमारास रस्त्यातून रागाचे, भांडणाचे, मोठेमोठे आवाज ऐकू येऊ लागले. त्यामुळे होजाला जाग आली. तो म्हणाला, 'हे काय चाललंय्, हे लोक कशासाठी भांडत आहेत?'

त्याची बायको म्हणाली, 'गुमान झोपा की आता, तुमचा काय संबंध आहे त्या भांडणाशी?'

पण होजा हे कुठला ऐकायला! तशीच अंगावर घोंगडी गुंडाळून तो माडीवरून खाली उतरला आणि दार उघडून रस्त्यावर आला.


होजा समोर दिसल्याबरोबर भांडणाऱ्या त्या दोन माणसांनी आपले भांडण थांबविले. पाहता पाहता होजाची घोंगडी हिसकून त्यांनी चटकन पळ काढला. अगदी खजील होऊन होजा माडीवर परतला. त्याच्या बायकोने विचारले, 'मग, कळलं का तुम्हाला ते लोक कशा-

# ७ : माझे मरण म्या पाहिले डोळा !

एका रात्री होजाने खिडकीतून बाहेर पाहिले असता चांदण्यात त्याला एक आकृती दिसली. आपले बाहू पसरून एक माणूस उभा आहे असे त्याला दिसले. होजाने घाईघाईने आपल्या बायकोला जागे केले. तो म्हणाला, 'अग कुणीतरी भयंकर माणूस आपल्या बागेत शिरला आहे. चटकन् जाऊन माझा तिरकामठा आणि बाण घेऊन ये.'

तिरकमठ्याची दोरी ओढून त्याने एक बाण सोडला तो त्या आकृतीच्या नेमका पोटात घुसला. इकडे होजा ऐटीने आपल्या पत्नीला म्हणाला, 'भली खोड मोडली गुलामाची. मला त्रास द्यायला येतोय काय?'

तरीही बागेत जाण्याची त्याला भीती वाटत होती. तो म्हणाला, 'राहू दे त्याला तिथं पहाटेपर्यंत.'



सकाळी होजा बागेत गेला. तेव्हा त्याला दिसले की, आपल्या

बायकोने आपला अंगरखा धुऊन दोरीवर वाळत घातला होता त्यातच आपला बाण घुसला आहे. हे पाहून होजाने गुडघे टेकले आणि तो मोठ्या भक्तीने परमेश्वराचे आभार मानू लागला. ते पाहून त्याची पत्नी म्हणाली, ‘आज इतकी भक्तीनं प्रार्थना चाललेली दिसतेय, झालं तरी काय एवढं?’

होजा उत्तरला, ‘ए वया! दिसत नाही का तुला? माझा तीर या अंगरख्याच्या थेट मध्यातून गेला आहे. आता देवाची कृपा. नाहीतर त्या वेळी हा अंगरखा माझ्या अंगावर असता तर काय झालं असतं, याची कल्पनाच कर म्हणजे झालं!’

---

## ८ : द्वयानां धूर्तानाम्!

**एके** रात्री होजा आणि त्याची पत्नी स्वस्थपणे झोपली होती. मध्य-रात्रीच्या सुमारास रस्त्यातून रागाचे, भांडणाचे, मोठेमोठे आवाज ऐकू येऊ लागले. त्यामुळे होजाला जाग आली. तो म्हणाला, ‘हे काय चाललंय्, हे लोक कशासाठी भांडत आहेत?’

त्याची बायको म्हणाली, ‘गुमान झोपा की आता, तुमचा काय संबंध आहे त्या भांडणाशी?’

पण होजा हे कुठला ऐकायला! तशीच अंगावर घोंगडी गुंडाळून तो माडीवरून खाली उतरला आणि दार उघडून रस्त्यावर आला.

होजा समोर दिसल्याबरोबर भांडणाऱ्या त्या दोन माणसांनी आपले भांडण थांबविले. पाहता पाहता होजाची घोंगडी हिसकून त्यांनी चटकन पळ काढला. अगदी खजील होऊन होजा माडीवर परतला. त्याच्या बायकोने विचारले, ‘मग, कळलं का तुम्हाला ते लोक कशा-

साठी भांडत होते ते?' होजा म्हणाला, 'अग, त्यांचं भांडण माझ्या घोंगडीबद्दल चाललं होतं. त्यांनी ती पाहिली मात्र; अन् काय सांगू, त्याचं भांडण एकदम संपलं.'

## ९ : अगा जे झालेचि नाही !

एके दिवशी होजा एक धार्मिक प्रवचन करीत होता. त्या प्रवचनाच्या भरात परमेश्वराच्या दयेचा गौरव करण्यासाठी त्याने आभाळाकडे डोळे वळविले आणि तो म्हणाला—

'अहो श्रोते जन हो! परमेश्वराचे आभार माना. त्याने आपल्या सत्यज्ञानामुळे उंटाना पंखच दिले नाहीत. समजा, त्या उंटांना पंख असते तर काय झालं असतं?'

—दुसरं काय, त्यांच्या नाचण्यानं आपल्या घरावरची सारी कौलं फुटून त्यांचा आपल्या डोक्यावर वर्षाव झाला असता !

## १० : गुरोस्तु मौनं व्याख्यानम् !

एका शुक्रवारी अफ्- शेहरीर या शहरातील एका मशिदीच्या व्यासपिठावर उभा राहून होजा प्रवचनाला सुरुवात करणार होता. त्याआधी त्याने विचारले—

'श्रद्धावान् श्रोते हो! आज मी कोणत्या विषयावर बोलणार आहे, हे तुम्हाला माहीत आहे काय?'

सर्व श्रोत्यांनी नवलाने एकमेकांच्या तोंडाकडे पाहिले आणि माना हलविल्या. ते म्हणाले—

'आम्हाला काही कल्पना नाही बुवा!'

होजा म्हणाला, 'तुम्हाला काहीच कल्पना नसली तर, माझ्या बोलण्याचा तुम्हाला काय उपयोग होणार आहे ?'

असे सांगून तो व्यासपीठावरून निघून गेला.

पुढील शुक्रवारी तो पुन्हा मशिदीत येऊन व्यासपीठावर उभा राहिला. श्रोत्यांना त्याने पुन्हा मागचाच प्रश्न केला—

'श्रद्धावान् श्रोते हो ! मी कोणत्या विषयावर बोलणार आहे याची तुम्हाला कल्पना आहे काय ?'

आता त्या श्रोत्यांनी होजाचा डाव ओळखला होता. त्यांनी धूर्तपणे उत्तर दिले-'होय !'

होजा म्हणाला, 'ठीक आहे. जर तुम्हाला हे आधीच कळलेले असेल तर, तुम्हाला पुन्हा तेच सांगण्यात काय अर्थ आहे ?'

असे बोलून तो व्यासपीठावरून खाली उतरून आपल्या घराकडे निघून गेला.

तिसऱ्या शुक्रवारी पुन्हा मशिदीत येऊन त्याच व्यासपीठावरून त्याने पुन्हा तोच प्रश्न केला—

'श्रद्धावान श्रोते हो ? मी कोणत्या विषयावर बोलणार आहे याची तुम्हाला कल्पना आहे काय ?'

यावेळी मात्र सर्व श्रोत्यांनी कडेकोट तयारी केली होती. त्यांनी उत्तर दिले—

'आमच्यापैकी कित्येकांना ते माहित आहे, तर कित्येकांना ते माहित नाही.'

होजा म्हणाला, 'असे असले तर ज्यांना ते माहित आहे त्यांनी ज्यांना ते माहित नाही त्यांना आता सांगावे.'

असे म्हणून तो तेथून निघून गेला.

# ११ : विडा पैजेचा उचलू नको

एका कडक हिवाळ्याच्या दिवसात होजाच्या मित्रांनी त्याच्याशी एक पैज लावली. ते म्हणाले, ' तू एक रात्रभर खेड्याच्या चौकात, न हलता, कोणतीही ऊब न घेता उभा राहिलास तर आम्ही तुला एक जेवण देऊ. पण यात तुला अपयश आले तर तू आम्हाला एक जेवण दिलं पाहिजेस. '

होजा म्हणाला, ' ठीक आहे. लागली आपली पैज. '

' आणि खरोखरच हिमवर्षाव, गारठा यांना दाद न देता तो रात्रभर चौकात उभा राहिला. पहाट झाल्यावर तो धावतच मित्राकडे गेला आणि विजयाच्या उत्साहाने म्हणाला, ' मी पैज जिंकली आहे.'

त्याचे मित्र म्हणाले, ' काय काय घडलं ते नीट आम्हाला सांग.'

होजा म्हणाला, ' घडलं काही नाही. फक्त मी खेड्याच्या चौकात रात्रभर उभा राहिलो आणि थंडीने जवळ जवळ थिजून गेलो एवढंच.'

त्याच्या मित्रांनी आणखी खोचून विचारले, ' काहीच घडलं नाही हे खरं काय ? '

खोजाने उत्तर दिले, ' तसे म्हटले तर मध्यरात्रीच्या सुमारास तीन मैलांवरच्या घराच्या एका खिडकीत एक मेणबत्ती पेटलेली मला दिसली. एवढंच. '


त्याचे मित्र एकदम ओरडले, ' बस्स ! तू पैज हरलास. त्या मेण-बत्तीची उब घेतलीस. '

होजाने पुष्कळ आढेवेढे घेतले पण त्याचे कोणीच ऐकेना. अखेर त्या सर्वांना संध्याकाळी त्याच्या घरी जेवणासाठी येण्याचे आमंत्रण त्याला द्यावे लागले.

सारे मित्र खूप हुरुपाने, उल्हासाने, मोठ्या आशा बाळगून त्याचे

घरी येऊन पोचले. त्यांनी खूप वाट पाहिली; पण जेवण काही पुढे येईना. तीन तास असेच गेले. नंतर होजा जरा बाहेर गेल्यावर या मित्रांनी ठरविले की, खरोखरच जेवणाची तयारी चालली आहे की नाही, हे स्वयंपाक घरात डोकावून पाहावे. त्यांनी तसे केल्यावर त्यांना दिसले की, एक भली मोठी कढई वर टांगलेली असून त्याखाली एक मिणमिणती मेणबत्ती पेटली आहे.

होजा परत आल्यावर त्या साऱ्यांनी एकच गलका केला, 'होजा ! हे काय? एवढ्याशा लहान ज्योतीवर एवढं मोठं भांडं केव्हा उकळणार? कसं उकळणार?'



होजा म्हणाला, 'अहो हे शक्य आहे असा याबद्दल तुमचाच आग्रह होता ना? जर तीन मैल दूर असलेल्या मेणबत्तीची ऊब चौकात उभे असलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला लागू शकते, तर त्याच मेणबत्तीच्या ज्योतीने फक्त तीन इंच दूर असलेल्या कढईला उकळी का येऊ नये?'

---

# ११ : विडा पैजेचा उचलू नको

**एका** कडक हिवाळ्याच्या दिवसात होजाच्या मित्रांनी त्याच्याशी एक पैज लावली. ते म्हणाले, ' तू एक रात्रभर खेड्याच्या चौकात, न हलता, कोणतीही ऊब न घेता उभा राहिलास तर आम्ही तुला एक जेवण देऊ. पण यात तुला अपयश आले तर तू आम्हाला एक जेवण दिलं पाहिजेस. '

होजा म्हणाला, ' ठीक आहे. लागली आपली पैज. '

' आणि खरोखरच हिमवर्षाव, गारठा यांना दाद न देता तो रात्रभर चौकात उभा राहिला. पहाट झाल्यावर तो धावतच मित्राकडे गेला आणि विजयाच्या उत्साहाने म्हणाला, ' मी पैज जिंकली आहे.'

त्याचे मित्र म्हणाले, ' काय काय घडलं ते नीट आम्हाला सांग.'

होजा म्हणाला, ' घडलं काही नाही. फक्त मी खेड्याच्या चौकात रात्रभर उभा राहिलो आणि थंडीने जवळ जवळ थिजून गेलो एवढंच.'

त्याच्या मित्रांनी आणखी खोचून विचारले, ' काहीच घडलं नाही हे खरं काय? '

खोजाने उत्तर दिले, ' तसे म्हटले तर मध्यरात्रीच्या सुमारास तीन मैलांवरच्या घराच्या एका खिडकीत एक मेणबत्ती पेटलेली मला दिसली. एवढंच. '


त्याचे मित्र एकदम ओरडले, ' बस्स ! तू पैज हरलास. त्या मेणबत्तीची उब घेतलीस. '

होजाने पुष्कळ आढेवेढे घेतले पण त्याचे कोणीच ऐकेना. अखेर त्या सर्वांना संध्याकाळी त्याच्या घरी जेवणासाठी येण्याचे आमंत्रण त्याला द्यावे लागले.

सारे मित्र खूप हुरुपाने, उल्हासाने, मोठ्या आशा बाळगून त्याचे

घरी येऊन पोचले. त्यांनी खूप वाट पाहिली; पण जेवण काही पुढे येईना. तीन तास असेच गेले. नंतर होजा जरा बाहेर गेल्यावर या मित्रांनी ठरविले की, खरोखरच जेवणाची तयारी चालली आहे की नाही, हे स्वयंपाक घरात डोकावून पाहावे. त्यांनी तसे केल्यावर त्यांना दिसले की, एक भली मोठी कढई वर टांगलेली असून त्याखाली एक मिणमिणती मेणबत्ती पेटली आहे.

होजा परत आल्यावर त्या साऱ्यांनी एकच गलका केला, 'होजा! हे काय? एवढ्याशा लहान ज्योतीवर एवढं मोठं भांडं केव्हा उकळ-णार? कसं उकळणार?'



होजा म्हणाला, 'अहो हे शक्य आहे असा याबद्दल तुमचाच आग्रह होता ना? जर तीन मैल दूर असलेल्या मेणबत्तीची ऊब चौकात उभे असलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला लागू शकते, तर त्याच मेण-बत्तीच्या ज्योतीने फक्त तीन इंच दूर असलेल्या कढईला उकळी का येऊ नये?'

## १२ : अबोला वरा या काला !

**एकदा** शिवरी-हिसार या गावी होजाला खतीब म्हणजे धर्मगुरुचे काम मिळाले होते. तो तेथे असता त्या गावाच्या मुहतार—म्हणजे नगराध्यक्षाशी त्याचे भांडण झाले. नंतर असे घडले की, काही काला-नंतर तो नगराध्यक्ष मरण पावला. त्या वेळी होजाला बोलावण्यासाठी गावचे सारे लोक मिळून त्याचेकडे आले. ते म्हणाले, ' आपले नगराध्यक्ष मरण पावले आहेत. चला, त्यांची उत्तरक्रिया करून पुन्हा तुम्हाला प्रार्थना म्हणावयाची आहे. '

होजा म्हणाला, ' त्याचा काय उपयोग आहे ? आमचे भांडण झालेले आहे. मी कितीही प्रार्थना केली तरी तो नगराध्यक्ष ती मुळीच ऐकणार नाही. मग ती करून काय फायदा ? '

---

## १३ : बहुरूपा ही जनवाणी

**एके** दिवशी होजा आणि त्याचा मुलगा जवळच्या प्रवासाला निघाले. मुलगा एका गाढवावर बसला होता आणि होजा रस्त्याने चालत होता. समोरून येणारे काही लोक त्यांना वाटेत भेटले. ते म्हणू लागले, ' ही पाहा आजकालची पोरं ! मुलगा मात्र आरामात गाढवावर बसला आहे आणि त्याचा बिचारा बाप रस्त्याने रखडत चालला आहे आणि याची त्याला पर्वा देखील नाही. '

हे लोक गेल्यावर मुलाने हट्ट केला की, होजाने आपल्या जागी त्या गाढवावर बसावे. अखेर होजा गाढवावर बसला आणि त्याचा मुलगा बाजूने रस्त्यावरून चालू लागला. वाटेत त्यांना आणखी काही लोक भेटले. ते म्हणाले, ' पाहिलात का हा देखावा ! हा एवढा धट्टाकट्टा

बाऱ्या आरामात गाढवावर बसला आहे अन् त्याचं इवलंसं पोर बिचारं रस्त्याने रखडत चाललं आहे.'

ते लोक दिसेनासे झाल्यावर होजा आपल्या मुलाला म्हणाला, 'आता सर्वांत उत्तम रीत म्हणजे आपण दोघांनी पायी चालावं म्हणजे काही भानगड नको.'

अशा रीतीने ते दोघे बापलेक गाढवाबरोबर पायीच चालू लागले. पण आणखी थोड्या वेळात त्यांना दुसऱ्या काही लोकांचा एक थवा भेटला. ते लोक होजा आणि त्याच्या मुलाकडे बोटे दाखवून म्हणू लागले, 'हे दोन मूर्ख पाहिलेत का? या एवढ्या कडक उन्हात हे दोघे रखडत चालले आहेत आणि त्यांचं रिकाम गाढव आरामात तुरुतुरू चाललं आहे.'

हे लोक गेल्यावर होजा म्हणाला, 'पाहिलंस पोरा! लोकांच्या वळवळत्या जिभा आणि त्यांच्या टीकेचा मारा टाळणं किती कठीण आहे हे तुला या प्रसंगावरून आता कळलं असेलच.'

## १४ : फेकला तटाहून घोडा !

**एकदा** कॉफीच्या दुकानात घोडेस्वारीबद्दल लोकांचे बोलणे चालले होते. तेव्हा होजा म्हणाला, 'मी तरुण असता एका माणसाने एक बेफाम घोडा आणला. तो अशा काही वेड्यावाकड्या उड्या मारीत असे की, त्याच्या पाठीवर बसलेला कसाही स्वार भुईसपाटच व्हावा. माझ्या खेड्यातील अनेक तरुणांनी त्या घोड्याला वठणीवर आणून त्याच्यावर स्वार होण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. अखेरीस त्यांनी मला तसा प्रयत्न करण्यास विनविले. त्या काळी मी चांगला तगडा होतो. मी

माझ्या बाह्या वर सारल्या. अंगरखा वर खोचला. त्या घोड्याची आयाळ पकडून मी त्याच्या पाठीवर उडी मारली.'

याच क्षणी त्या प्रसंगाचे वेळी हजर असलेला एक मनुष्य कॉफीच्या दुकानात आला. होजा गप्प राहिलेला पाहून ते लोक उत्कंठेने म्हणाले, 'ठीक ! ठीक ! पुढे सांगा.'

त्या माणसाकडे नजर फेकून होजा हळूच म्हणाला, 'त्या घोड्याने मलाही फेकून देऊन भुईसपाट केले अन् काय ! विचारा या मनुष्याला !'

---

## १५ : रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति !

एकदा दोन माणसांत एका मुद्द्यावर वाद चालला असता त्यांनी तो मिटविण्याची होजाला विनंती केली. पहिल्या मनुष्याने त्या वादाची आपली बाजू पुढे मांडली. ती लक्षपूर्वक ऐकून, मान डोलावून होजा म्हणाला, 'तुझं म्हणणं बरोबर आहे.'

हे ऐकून, दुसरा माणूस उसळून म्हणाला, 'खरी हकीगत अशी मुळीच नाही. असे म्हणून त्याने आपल्या बाजूने रंगवून ती घटना होजाला सांगितली. त्याचे बोलणे संपल्यावर होजा म्हणाला, 'तुझं म्हणणं बरोबर आहे.'

होजाची बायको हे सारे ऐकत होती. तिला हे सहन होईना. ती उसळून म्हणाली, 'हे हो काय तुमचं ? दोघांचंही म्हणणं खरं कसं असेल ? असं होणं शक्यच नाही.'

होजाने मिनिटभर विचार केला आणि तो म्हणाला—

'बाई ग ! तुझं म्हणणंही बरोबर आहे. मग तर झालं ?'

---

# १६ : दे माझिया या धनाला !

एके दिवशी होजाला खिडकीतून पाहिल्यावर दिसले की, आपण ज्याच्याकडून एक मोठी रक्कम उसनी घेतली आहे, तो सावकार आपल्या घराकडे येत आहे. हे पाहून होजा आपल्या बायकोला म्हणाला, 'तो बघ, सावकार इकडे येतोय. त्याला दार उघडू नकोस. त्याला जे सांगायचं ते खिडकीतूनच सांग.'

इकडे तो सावकार दाराला धक्के देऊ लागला तेव्हा होजाच्या बायकोने खिडकीतून आपले डोके बाहेर काढले आणि विचारले, 'काय हवंय् तुम्हाला ?'

सावकार म्हणाला, 'मला काय हवंय ते आतापर्यंत तुम्हाला कळायला हवं होतं. तुम्ही कर्जाऊ घेतलेल्या पैशासाठी मी आलो आहे.'

होजाची बायको म्हणाली, 'हे बघा आमच्या मालकांना सध्या पैशाची थोडी चणचण आहे. पण, तुमची परतफेड करण्यासाठी त्यांनी एक नामी युक्ती योजिली आहे. आमच्या घराच्या मागे ते मोठं काटेरी झाड दिसतंय ना तुम्हाला ? धनगर या गल्लीतून त्यांच्या मेंढ्या हाकून नेऊ लागले म्हणजे त्यांची थोडी थोडी लोकर काट्यांना अडकते. ही लोकर गोळा करावी, विकावी आणि तुमची परतफेड करावी असा आमच्या मालकांचा बेत आहे.'

सावकाराला कळून चुकले की, या पद्धतीमुळे आपली रक्कम परत मिळण्यास सुमारे हजार वर्षे लागतील ! असा विचार आल्याने त्याला मोठमोठ्याने हसूच आवरेना !

त्याचे हसणे ऐकून होजाला राग आला. खिडकीतून, बायकोच्या खांद्यावरून ओणवून तो उपहासाने म्हणाला, 'ठीक, ठीक ! तुला आनंद झाला ना ! छान झालं ! आपला पैसा चांगली पत असणाऱ्या माणसाला दिला आहे अशी खात्री झाल्यानेच तू हसत, खिदळत आहेस असं मी समजतो !'

---

# १६ : दे माझिया या धनाला !

एके दिवशी होजाला खिडकीतून पाहिल्यावर दिसले की, आपण ज्याच्याकडून एक मोठी रक्कम उसनी घेतली आहे, तो सावकार आपल्या घराकडे येत आहे. हे पाहून होजा आपल्या बायकोला म्हणाला, 'तो बघ, सावकार इकडे येतोय. त्याला दार उघडू नकोस. त्याला जे सांगायचं ते खिडकीतूनच सांग.'

इकडे तो सावकार दाराला धक्के देऊ लागला तेव्हा होजाच्या बायकोने खिडकीतून आपले डोके बाहेर काढले आणि विचारले, 'काय हवंय् तुम्हाला ?'

सावकार म्हणाला, 'मला काय हवंय ते आतापर्यंत तुम्हाला कळायला हवं होतं. तुम्ही कर्जाऊ घेतलेल्या पैशासाठी मी आलो आहे.'

होजाची बायको म्हणाली, 'हे बघा आमच्या मालकांना सध्या पैशाची थोडी चणचण आहे. पण, तुमची परतफेड करण्यासाठी त्यांनी एक नामी युक्ती योजिली आहे. आमच्या घराच्या मागे ते मोठं काटेरी झाड दिसतंय ना तुम्हाला ? धनगर या गल्लीतून त्यांच्या मेंढ्या हाकून नेऊ लागले म्हणजे त्यांची थोडी थोडी लोकर काट्यांना अडकते. ही लोकर गोळा करावी, विकावी आणि तुमची परतफेड करावी असा आमच्या मालकांचा बेत आहे.'

सावकाराला कळून चुकले की, या पद्धतीमुळे आपली रक्कम परत मिळण्यास सुमारे हजार वर्षे लागतील ! असा विचार आल्याने त्याला मोठमोठ्याने हसूच आवरेना !

त्याचे हसणे ऐकून होजाला राग आला. खिडकीतून, बायकोच्या खांद्यावरून ओणवून तो उपहासाने म्हणाला, 'ठीक, ठीक ! तुला आनंद झाला ना ! छान झालं ! आपला पैसा चांगली पत असणाऱ्या माणसाला दिला आहे अशी खात्री झाल्यानेच तू हसत, खिदळत आहेस असं मी समजतो !'

---

# १७ : बोलाचीच कढी, बोलाचाच भात !

**कोन्या** या शहरात असता होजाने जिल्ह्याच्या मुख्य न्यायाधिशाची भेट घेऊन त्याने आपल्याला कोठेतरी न्यायाधीश करावे अशी गळ घातली. सर्व जागा आधीच भरलेल्या असल्यामुळे मुख्य न्यायाधिशाला ही विनंती मान्य करता येईना. होजाला कोणती तरी पोकळ मानाची जागा देऊन ही ब्याद मिटवावी असा विचार करून त्याने होजालाच एखादी सूचना करण्यास सांगितले.

होजा म्हणाला, ' मला उपन्यायाधिश करा.'

न्यायाधिशाने प्रश्न केला, ' या जागेचं काम काय असणार ? '

होजा म्हणाला, ' त्यात काय ? ज्या खटल्यांचा निवाडा तुम्हाला करता येत नसेल ते खटले माझ्याकडे सोपवा म्हणजे झाले.'

आणि एके दिवशी असे दोन लोक एक विचित्र फिर्याद घेऊन मुख्य न्यायाधिशाकडे आले. वादी म्हणाला, ' रावसाहेब ! हा माणूस माझी ठरलेली मजुरी मला देत नाही. पाठीवर लाकडाची एक मोळी घेऊन तो रस्त्याने चालला असता अडखळून पडला. ती मोळी नेण्याची तयारी दाखवून मी त्याला विचारले, ' मी ही मोळी वाहून नेली तर तू मला काय देशील ? '

तो म्हणाला, ' काही नाही ! ' मी ती मोळी त्याच्या घरी पोचविली आणि माझी मजुरी मागितली, पण त्याने मला ' काही नाही ! ' मात्र दिले नाही. ते त्याने मला द्यावे म्हणून मी त्याला इथे आणले आहे.' या विचित्र मागणीने न्यायाधिश विचारात पडले. शेवटी त्यांनी त्या मनुष्याला दुय्यम न्यायाधिश होजा याचेकडे पाठविले.

होजाने वादीची हकीकत ऐकून घेतली आणि तो म्हणाला, ' माझ्या मेजासमोरचा तो छोटा गालिचा दिसतो आहे का तुला ? तो उचल. '

त्या मनुष्याने तसे केले.

*त्यावर होजाने विचारले, ' त्या गालिच्याच्या खाली काय आहे ?'*

तो मनुष्य म्हणाला, ' काही नाही ' होजा चटकन म्हणाला, ' मग तुला पाहिजे असलेली ' काही नाही ' ही मजुरी तीच आहे. ती उचल आणि चालायला लाग.'

---

## १८ : पागोटे आणि विद्वत्ता

**एकदा** एका मनुष्याने होजाजवळ त्याला आलेले एक पत्र आणले; आणि ते वाचून दाखविण्यास सांगितले.

' या पत्रातील हस्ताक्षर इतके वाईट आहे की, ते मला वाचता येत नाही. ' असे होजा त्याला म्हणाला.

यावर तो माणूस भलताच तापला आणि ओरडला, ' तुम्ही स्वतःला ' होजा ' ही पदवी लावता, आणि विद्वान म्हणून हे मोठं पागोटंही घालता, अन् तुम्हाला एक साधं पत्रही वाचता येत नाही ! '



यावर होजाने आपले पागोटे काढून त्या मनुष्यापुढे ठेवले आणि म्हणाला, ‘ जर तुला वाटत असेल की, हे पागोटे घालणारा प्रत्येक माणूस विद्वान असतो तर तूच हे पागोटे घालून पाहा; आणि मग बघ तुला हे पत्र वाचता येतंय का ? ’

---

## १९ : देणे आणि घेणे

एके दिवशी अक–शेहरीर या गावचा एक लोभी इमाम (धर्मगुरु) एका मोठ्या कारंजाच्या काठाशी हातपाय धूत असता पाय घसरून आत पडला. आणि गटंगळ्या खाऊ लागला हे पाहून त्या कारंजाच्या काठाशी अनेक लोक जमले. ते ओरडू लागले, ‘तुमचा हात द्या इकडे.’

परंतु त्या इमामाने त्यांच्याकडे लक्षच दिले नाही. कारंजाच्या उंच भिंती स्वतःच चढून जाण्याची खटपट त्याने चालविली होती.

या घोळक्याच्या काठाशी होजा हे दृश्य पाहात उभा होता. थोड्या वेळाने तो म्हणाला, ‘ या इमामाला अशा रीतीने मदत करता येणारच नाही तुम्हाला. हे असे लोक सगळे घेतील पण तुम्हाला काहीही देणार मात्र नाहीत. ’

असे म्हणून, त्या गर्दीतून वाट काढून तो पुढे गेला. आपला हात पुढे करून त्या इमामाला म्हणाला, ‘ गुरुजी, माझा हात घ्या. ’ आणि काय आश्चर्य त्या इमामाने चटकन् होजाचा हात पकडला आणि मग होजाने त्याला सुरक्षितपणे वर ओढून घेतले.

परंतु या साऱ्या प्रकारातून आपण कोणती गोष्ट सिद्ध करून दाखविली आहे हे मात्र त्या इमामाला कधीच कळले नाही ! ’

---

# लोळणाचि भूमिवरी । मोक्ष वाटे मना ॥

एके दिवशी संध्याकाळी शिवरी–हिसार या शहराचा न्यायाधिश खूप दारू पिऊन झिंगला होता. शहराबाहेरील, रस्त्याच्या कडेस असलेल्या झाडाच्या पायथ्याशी जाऊन त्याने आपला झब्बा आणि आपले पागोटे फेकून दिले. अर्धनग्न स्थितीत तो त्या झाडाखाली झोपी गेला.

नसरदीन होजा आपल्या अहमद नावाच्या शिष्यासह तेथून चालला असता त्याला हे दृश्य दिसले. न्यायाधीशाचा कशीदा काढलेला उंची झब्बा आणि त्याचे पागोटे घेऊन तो घरी आला.

इकडे बऱ्याच वेळानंतर तो न्यायाधीश शुद्धीवर आला आणि पाहतो तो आपले सारे कपडे गायब झालेले! कसाबसा घरी येऊन त्याने आपल्या कपड्याच्या शोधार्थ आपले नोकर गावात पाठविले.

दुसरे दिवशी न्यायाधीशाचा तो झब्बा घालून होजा ऐटीने गावात फिरत आहे असे त्या नोकरांना दिसले. आणि त्यांनी त्याला पकडून त्याच न्यायाधिशाच्या कचेरीत हजर केले.

न्यायाधीशाने विचारले–

'हा झब्बा तुझा आहे असे तुझे म्हणणे आहे काय?'

होजा उत्तरला–'तसं नाही रावसाहेब!'

'मग तो तुझ्या ताब्यात कसा आला?'

'होजा म्हणाला, 'रावसाहेब! त्याचं असं झालं. काल मी माझा शिष्य अहमद याच्याबरोबर गावाच्या काठानं फिरायला गेलो होतो. तेव्हा तेथे सच्चा मुस्लिमांना शिसारी आणील असं एक दृश्य मला दिसलं. कुणी एक इसम दारू पिऊन खूप झिंगला होता आणि अर्धनग्न स्थितीत झाडाखाली खुशाल घोरत पडला होता. मला अशी भीती पडली की, कोणी चोर त्यांच्या असाहाय्य आणि पापी स्थितीच

फायदा घेऊन त्याने बेहोषीत फेकून दिलेला झब्बा आणि पागोटे घेऊन पळून जातील म्हणून मी त्याचा झब्बा आणि त्याचे पागोटे उचलून घेऊन आलो. आता मी त्या इसमाच्या शोधात आहे, तो सापडला तर त्याची चीज-वस्तू मी त्याला देऊन टाकायला तयार आहे.'

इकडे न्यायाधीशाचा चेहरा पडला. तो पुटपुटला, 'असलं प्रदर्शन करणारा कोण हलकट मवाली असेल तो असो. मला याबाबतीत आणखी काहीच कारवाई करावयाची नाही.'

असे म्हणून त्याने होजाला तेथून निघून जाण्याची परवानगी दिली आणि मनातल्या मनात आपल्या मूल्यवान झब्बा आणि पागोटे या वस्तूंचाही कायमचा निरोप घेतला.

---

## २१ : भोळी-खुळी गवसति जी !

**होजाच्या** बाळपणी त्याच्या शेजारी एक अहंमन्य मुलगा राहात असे.

तो नेहमी बढाई मारी की, 'मला कोणीही फसवू शकणार नाही.'

हे ऐकून एके दिवशी होजा त्याला म्हणाला, 'तू जरा येथेच थांब मीच तुला फसविण्याची एखादी युक्ती शोधून काढतो. असे म्हणून होजा तेथून निघून गेला.

तीन तास झाले तरी तो मुलगा तेथेच उभा राहून होजा परत येण्याची वाट पाहात होता. जवळून जाणाऱ्या एका वाटसरूने विचारले,

'तू कोणाची वाट पाहात आहेस?'

तो मुलगा म्हणाला, 'तो नसरुद्दीन मला फसविण्याची एक युक्ती शोधून येणार आहे त्यासाठी मी इथं तीन तास वाट पाहात उभा आहे. पण तो अजून आलाच नाही.'

वाटसरू म्हणाला, 'आणखी किती वाट पाहाणार तू? आणखी फसविण्याची दुसरी कोणती युक्ती पाहिजे आहे तुला?'

---

## २२ : दिलरुबा मधुर हा !

एके रात्री इमद नावाच्या आपल्या शिष्यासह होजा घरी येत होता. वाटेत त्याला दिसले की, चोरांची एक टोळी एका घरासमोर उभी राहून घराचे कुलूप फोडण्याची खटपट करीत आहे.

इथे आपण काही बोलाचाली केली तर बहुधा आपल्यालाच मार बसेल असे होजाच्या लक्षात आले. म्हणून काही न बोलता तो मुकाट्याने पुढे चालू लागला.

पण हा काय प्रकार आहे हे त्याच्या शिष्याला मात्र कळले नाही. त्याने विचारले,

'गुरुजी ! हे सारे लोक तिथे उभे राहून काय करीत आहेत ?'

होजाने म्हटले, 'शू ! बोलू नकोस. ते लोक रबाब नावाचे वाद्य वाजवीत आहेत.'

पण तो पोरगा म्हणाला, 'पण मला त्याचे सूर काही ऐकू येत नाहीत.'


होजा उत्तरला, 'ते सारं संगीत उद्या ऐकू येईल. जरा वाट पाहा.'

---

## २३ : सागरा ! प्राण तळमळला !

एके दिवशी होजा समुद्राच्या काठाशी बसला असता त्याला फार तहान लागली. समुद्रात ओंजळ बुडवून त्याने पाण्याचा घोट घेतला पण त्यामुळे त्याची तहान भागण्याऐवजी अधिकच वाढली. नंतर किनारा

सोडून तो दुसरीकडे गेला. तेथे त्याला एक गोड पाण्याचा झरा आढळला. आपली तहान भागल्यावर त्याने....आपल्या पागोट्यात ते



पाणी भरून घेतले आणि समुद्राच्या काठाशी येऊन ते पाणी समुद्रात टाकले. समुद्राला उद्देशून तो म्हणाला, ' अरे समुद्रा ! तू मारे खूप फेस आणतोस, मोठी गर्जना करतोस पण तुझ्या या साऱ्या पाण्याचा काही एक उपयोग नाही. खऱ्या पाण्याची चव कशी असते ती एकदा घेऊन तरी पाहा. '

---

## २४ : मूर्ती छोटी, कीर्ती मोठी !

**कॉन्स्टॅन्टिनोपल** काबीज करण्याआधी तुर्की राज्याची राजधानी ' बर्सा ' या शहरी होती. एकदा होजा काही कामानिमित्त या शहरी गेला पण त्याचे काम मात्र तेथे यशस्वी होईना.

'या शहरातील उलु-जामी या मोठ्या आणि प्रसिद्ध माशिदीत प्रार्थना करावी ' असा सल्ला होजाला त्याच्या एका मित्राने दिला. तो म्हणाला, 'या माशिदीच्या मिहिराबे ( मक्केकडील खिडकी ) कडे तोंड करून चाळीस दिवस दर सकाळी प्रार्थना करावी आणि एकेचाळीसाव्या दिवशी भक्तिभावाने आपले मागणे मागावे असे केले असता तुझी इच्छा पूर्ण होईल.'

होजाने या उपदेशाची तंतोतंत अंमलबजावणी केली पण त्याला काहीच फळ मिळाले नाही.

काही दिवसानंतर त्या प्रचंड माशिदी शेजारच्या, उरहान जामी नावाच्या अगदी लहान माशिदीत जाऊन त्याने प्रार्थना केली. आणि काय आश्चर्य ! त्याच दिवशी त्याचे काम फत्ते झाले ! त्यानंतर होजा उलु-जामी या प्रचंड माशिदीत गेला आणि तेथे मोठ्याने ओरडला,

'ए मोठ्या माशिदी ! तुला तुझी लाज वाटायला पाहिजे. जे काम तुला करता आलं नाही ते तुझ्या छोट्या मुलानं किती भर्रकन् करून टाकलं बघ.'

---

## २५ : अति-रागा, भीक-मागा !

एके दिवशी होजाने ठरविले की, आपणच नेहमी आपल्या गाढवाला का चारा घालावा ? कंटाळलो आपण या कामाला. म्हणून त्याने आपल्या बायकोला ते काम करण्यास सांगितले. पण तिने या कामाला चक्क नकार दिला. ती म्हणाली, 'हे काम तुमचं आहे.'

अखेर त्यांनी ठरविले की, दोघांपैकी जो कोणी आधी बोलेल त्याने जाऊन गाढवाला चारा घालावा.

होजा लगेच एक शब्दही न बोलता कोपऱ्यात जाऊन बसला. घरा-

तल्या तंग वातावरणाला कंटाळून त्याची बायको एका शेजाऱ्याच्या भेटीला गेली. तेथे तिला गप्प बसवेना म्हणून झालेला सर्व प्रकार तिने सांगून टाकला. ती म्हणाली, 'बाई, बाई हे इतके हट्टी आहेत की, भुकेने मेले तरी बेहेत्तर पण तोंडातून शब्द काढायचे नाहीत.' शेजारीण म्हणाली, 'मग त्यांच्यासाठी हा थोडा रस्सा मी पाठविते.' असे म्हणून त्या रश्याची एक थाळी तिने आपल्या मुलाकरवी होजाकडे पाठविली.

इकडे असे झाले की, होजाच्या घराचे दार उघडे आणि आतून तर कोणाचाही आवाज येत नाही असे पाहून एक चोर त्याच्या घरात शिरला आणि दिसेल ते मौल्यवान् सामान आपल्या पोत्यात भरू लागला. जाता जाता होजा जेथे बसला होता त्या खोलीत तो आला आणि होजाला पाहून घाबरला. पण होजा बोलेना की चालेना. यामुळे त्या चोराला या माणसाला तर अर्धांगवायू झाला असावा म्हणून मालकाच्या देखत त्याने तेथील मौल्यवान वस्तूही पोत्यात भरल्या. होजाला खूपसा राग आला, पण त्याने विचार केला की, आपण काही हालचाल केली तर आपल्या तोंडून एखादा शब्द बाहेर पडेल. तो चोर महा बिलंदर होता. जाता जाता इतर सर्व वस्तु बरोबर होजाच्या डोक्यावरील पागोटेही काढून घेऊन तो तेथून निघून गेला.

त्यानंतर पाच मिनिटांनी शेजारणीचा मुलगा रस्सा असलेली थाळी घेऊन होजाच्या घरी आला. तेव्हा होजाने खाणाखुणा करून चोराने सर्व वस्तू कशा नेल्या हे सर्व सांगण्याचा प्रयत्न केला. चोराने आपले पागोटेही नेले असे दाखविण्यासाठी त्याने आपला हात डोक्याभोवती तीन वेळा फिरवून डोक्यावर ठेवला. त्या मुलाला वाटले होजाच्या मनातला भाव आपल्याला समजला. म्हणून त्याने हातातील थाळी

तीन वेळा होजाच्या डोक्याभोवती फिरवून सगळा रस्सा त्याच्या डोक्यावर ओतून दिला !

होजाला काय वाटले असेल ते असो पण इतके होऊनही त्याने एक शब्दही काढला नाही.

तो मुलगा परत घरी गेला आणि आपण काय पाहिले ते सारे आपल्या आईला आणि होजाच्या बायकोला सांगू लागला. सारी कपाटे, साऱ्या पेट्या उघड्या पडल्या आहेत, फुलदाण्या उलट्या होऊन पडल्या आहेत. घरात आपण पूर्वी पाहिले त्यापेक्षा कितीतरी सामान कमी झालेले दिसत आहे. असे त्याने सांगितले. आईने पाठविलेला रस्सा आपल्या डोक्यावर ओतून घेऊन खाण्याचा होजाने केलेला प्रयत्न सांगण्यास तो विसरला नाही.

होजाची बायको म्हणाली, ' काहीतरी भलतंच घडलेलं दिसतय्. ' असे म्हणून शक्य तितकी त्वरा करून ती घरी निघाली. घरात शिरल्यावर क्षणभर आश्चर्याने तिच्या तोंडून शब्दही फुटेना. मग ती उद्गारली, ' देवा देवा ! काय झालं हे सारं ? ' होजा आनंदाने ओरडला ! ' मी जिंकलो ! मी जिंकलो ! आता जा आणि तूच गाढवाला चारा घाल. '

मग त्याला त्या चोराची आठवण झाली. तो म्हणाला, ' पण तुझ्या हट्टीपणामुळे केवढा अनर्थ घडला आहे ते तर पाहा ! "

---

## २६ : धनविरहित ज्ञान । फुकट मान ।।

**रजब**, शबान आणि रमझान हे तीन पवित्र महिने सुरू झाले होते. धर्मगुरु या नात्याने दक्षिणा गोळा करण्यासाठी होजा गावोगाव फिरत होता. रमझानच्या उपवासाच्या काळात एखाद्या खेड्यात इमाम म्हणून नोकरी मिळाली तर पाहावे असाही त्याचा हेतू होता. पण त्याचे नशीब

असे की तो जेथे जेथे जाई तेथील लोक त्याला कवडीही देत नसत आणि सांगत की, आम्ही आमच्या खेड्यासाठी इमामची नेमणूक या आधीच करून ठेवली आहे.

अशा रीतीने अगदी विटून, निराश होऊन होजा त्याच्या दौऱ्या-वरील सातव्या खेड्याशी आला. तेथे खूपशी खळबळ उडाली आहे असे त्याला आढळले. गेले काही महिने एक कोल्हा तेथील कोंबड्या, बदके, टर्की, कोंबडे यांचा फन्ना उडवीत असे. अखेरीस चवताळलेल्या शेतकऱ्यांनी एक सापळा लावून त्या कोल्ह्याला त्यात पकडले. सूडाच्या भावनेने प्रेरित होऊन या कोल्ह्याला कसे हाल हाल करून ठार मारावे याबद्दल त्यांची चर्चा चालली होती. याच वेळी होजा तेथे आल्याने ते खेडवळ लोक त्याचा सल्ला घेण्यासाठी त्याच्याकडे वळले.

होजा म्हणाला, ' हे काम तुम्ही माझ्यावर सोपवा.' होजाची पांढरी दाढी आणि त्याची आत्मविश्वासपूर्ण चर्या पाहून त्या खेडवळांनी कोल्ह्याचे भवितव्य त्याच्यावर सोपविले.

होजाने त्या कोल्ह्यास जरा दूर नेऊन आपला झगा आणि आपले पंडित पद्धतीचे पागोटे या दोन्ही वस्तू त्या कोल्ह्याच्या पाठीवर ठेवल्या. नंतर त्याच्या पाठीवर थाप मारून त्याने त्या कोल्ह्याला मोकळे सोडून दिले. आपला शत्रू झपाट्याने मोकळ्या शेताकडे धावत चालला आहे, हे पाहून ते क्रुद्ध झालेले खेडवळ लोक धावतच तेथे आले आणि ओरडले,

' हे काय केले तुम्ही ? '

होजा शांतपणे म्हणाला, ' तुम्ही काहीएक काळजी करू नका. या कोल्ह्याला मी सर्वात मोठी शिक्षा केली आहे. त्याच्या पगडी, झगा या वेषाकडे पाहिल्यावर प्रत्येकाला असे वाटेल की, हा एखादा माझ्या-सारखाच विद्वान पंडित आहे आणि मग आठवड्याच्या आतच तो ( माझ्यासारखाच ) भुकेने कासावीस होऊन मरून जाईल !

## २७ : परलोकाची सफर-स्वस्तात !

**एकदा** होजा एका कबरस्तानात फिरत असता नुकत्याच खणून ठेवलेल्या एका खड्ड्यात पडला. तेथे पडल्या पडल्या त्याने विचार केला ‘ आता आपण मेल्याचे सोंग करू या. मग धर्मग्रंथात लिहिल्याप्रमाणे देवदूत येऊन आपल्याला प्रश्न विचारतात काय हे पाहू या. ’

या कल्पनातरंगात तो मग्न झाला असता एकाएकी जवळच मोठा गलबला त्याला ऐकू आला. घंटा वाजत आहेत, खणखण आवाज, टापांचे आवाज, चाबकाचे फटकारे आणि खूपशी आरडाओरड असे ते आवाज होते. खरे म्हटले तर काही व्यापारी चिनी मातीची भांडी पाच खेचरांवर लादून घाईघाईने त्या कबरस्तानाजवळून निघाले होते त्याचा हा आवाज होता. परंतु होजाला हे माहीत नव्हते. त्यामुळे त्याला असे वाटले की, प्रलयकालच एकाएकी आला असावा. आपण काय करावे हे त्याला क्षणभर मुळीच सुचेना. मग त्याने एकाएकी ठरविले की आपण येथून निसटावे हेच बरे. म्हणून तो धडपडत त्या खड्ड्यातून कसाबसा चढून बाहेर रस्त्यावर आला. आपण कोठे चाललो आहोत हे न पाहता तो सरळ पुढे धावत असल्याने समोरील खेचरांनाच त्याने जाऊन धडक दिली. ती खेचरं थबकली. आणि बावरून आपल्या मागील पायांवर उभी राहिली. एकमेकांशी त्यांची टक्कर होऊन पाणी पिण्याची भांडी, वाट्या, गडवे, थाळ्या या वस्तूंचा फुटून चक्काचूर झाला. ते व्यापारी रागाने लाल झाले आणि होजाकडे वळून ओरडले, ‘ कोण रे तू ? आणि वेड्यासारखा का पळतोस इकडे तिकडे ? ’

होजा म्हणाला, ‘ अहो मी मेलो आहे हे माझं प्रेत ! मी राहतो परलोकात. इकडील हालहवाल पाहण्यासाठी चक्कर टाकायला जरा आलो होतो एवढंच.’

पण अशा कल्पनारम्य असत्यावरही लोकांचा नेहमी विश्वास बसत नाही, ही एक शोचनीय गोष्ट आहे खरी.

ते व्यापारी म्हणाले, ' ठीक आहे आम्हीही आता तुझी हालहवाल पाहतो आणि चांगली खबर घेतो.'

—असे म्हणून आपले चाबूक उगारून त्यांनी होजाला चांगले बडवून काढले.

बरीच रात्र उलटल्यावर खट्टू होऊन माराने अर्धमेला झालेला होजा कसाबसा खरडत घरी येऊन पोचला.

त्याच्या बायकोने विचारले ' इतकी रात्र होईपर्यंत होता तरी कुठे तुम्ही ? '

होजा म्हणाला, ' मी एका कबरीत प्रेतात जाऊन पडलो होतो. अग, मी थेट परलोकात जाऊन परत आलो आहे समजलीस ! '

' अग बाई ! असं का ? परलोक म्हणतात तो आहे तरी कसा ? ' मोठ्या उत्सुकतेने त्याच्या बायकोने विचारले.

एवढेसे तोंड करून होजा म्हणाला, ' अग, तिथे विशेष काही सांगण्यासारखे नाही. पण तुला तिथं जायचं असेल तर मात्र एक छोटीशी सूचना तुला देऊन ठेवतो, ' चिनी मातीच्या भांड्यांनी लादलेली खेचरं तुला तिथे दिसली तर त्यांच्या बिलकूल वाटेला जाऊ नकोस बरं का ! '

---

# किती गोड गोड बदला !

**एकदा** कोणी एकाने होजाला विचारले, ' शहाणपण कसे मिळ-वावे ? ' होजा म्हणाला, ' जे लोक शहाणे आहेत ते काय म्हणतात त्यांचे बोलणे लक्ष देऊन नेहमी ऐकत जावे; आणि कोणी तुमचे बोलणे

ऐकत असेल तर तुम्ही काय बोलत आहात ते स्वतःच लक्ष देऊन ऐकावे म्हणजे झालं.'

---

## २९ : नाचत ना गगनात नाथा ! तारांची बरसात ?

**एके** दिवशी एका मनुष्याने थट्टेने होजाला विचारले—

'काय हो ! आमावास्येनंतर नवा चंद्र उगवतो तेव्हा जुन्या चंद्राचे काय करतात ?'

—होजाला याचं उत्तर माहीत नव्हतं पण आपले अज्ञान कबूल करण्याची त्याची तयारी नव्हती.

होजाने ताडकन् उत्तर दिले, 'अहो त्या चंद्राचे तुकडे करून त्याचे तारे बनवितात !'

---

## ३० : बोल तुझे अनमोल !

**एके** दिवशी एक मुल्ला (मुस्लीम धर्मशास्त्रज्ञ) ज्ञानाच्या शोधार्थ खेड्यापाड्यांतून फिरत होता. विद्वानांना भेटावे, अनेक तत्त्वज्ञानपर प्रश्नावर त्यांच्याशी चर्चा करावी असा त्याचा हेतू होता. एके दिवशी त्याने एक कठीणसा प्रश्न विचारल्यावर त्याच्याशी बोलणाऱ्या मनुष्याने सांगितले, 'या प्रश्नाचं उत्तर देऊ शकेल असा मनुष्य फक्त एकच आणि तो म्हणजे अक्-शहीरचा नसरुद्दीन होजा.'

म्हणून त्या मुल्लाने अक् शहीरची वाट धरली. त्या गावाच्या वेशीवर आल्यावर त्याला एक शेतकरी शेत नांगरताना दिसला. त्याच्या अंगा-

वर जाड्याभरड्या कापडाचा एक अंगरखा असून डोक्यावर जाड कापडाची एक टोपी आणि पायात जुन्या वहाणा होत्या.

हा शेतकरी म्हणजे होजाच होता, पण मुल्लाला हे माहीत नव्हते.

त्याला थोड्या विश्रांतीची जरूर असल्याने त्याने विचार केला की, येथेच जरा थांबून आपले प्रश्न या शेतकऱ्याला आधी विचारून पाहावे. कोणाला ठाऊक, मूर्खांच्या तोंडूनही कधी कधी काही शहाणपणाच्या गोष्टी येऊ शकतात.

या वाटसरूच्या जवळ छानशी, गोल, लालभडक डाळिंबे होती. होजाचे डोळे या डाळिंबावर खिळले होते.

'तुला काही प्रश्न विचारावयाचे आहेत?' असे त्या मुल्लाने म्हटल्यावर होजा चटकन म्हणाला, 'हे पाहा, माझ्या प्रत्येक उत्तरासाठी मला एक डाळिंब देशील तर तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी देईन.'

यानंतर मुल्लाने त्याला अनेक प्रश्न विचारले. हा शेतकरी केव्हाही न चुकता त्या सर्व प्रश्नांची उत्तरे देत आहे, हे पाहून त्या विद्वान मुल्लाला फार आश्चर्य वाटले. त्यामुळे त्याच्याबरोबर असलेली डाळिंबे संपून गेली. त्यांचा होजाच्या पायाशी ढीग पडला होता.

शेवटी मुल्ला म्हणाला, 'आता मला तुला आणखी एक प्रश्न विचारायचा आहे त्याबद्दलचे तुझे मत फार महत्त्वाचे वाटेल.'

होजाने विचारले, 'तुझ्या त्या पिशवीत आणखी काही डाळिंबं आहेत का?'

मुल्ला म्हणाला, 'नाहीत.'

यावर होजा म्हणाला, 'मग कृपा करून माझा वेळ घेऊ नको, मला काम करायचं आहे.' असे म्हणून तो उठला व शेत नांगरू लागला.

इकडे मुल्लाने एक उसासा सोडला आणि तो म्हणाला, 'अरेरे,

या प्रदेशातील शेतकऱ्यांची देखील एवढी तयारी असली तर येथील विद्वान लोक तर माझी अगदी मूर्खात गणना करतील.'

आणि अक्शहरीला भेट न देताच तो पुढे निघून गेला!

---

## ३१ : देनेवाला जबभि देता। पूरा छप्पर फाडके देता॥

एके दिवशी सकाळची प्रार्थना करीत असता होजा मोठ्याने म्हणाला, ' हे परमेश्वरा! मला नेमकी एक हजार सोन्याची नाणी दे. तू मला ९९९ जरी दिलीस तरी मी ती स्वीकारणार नाही.'

हीच प्रार्थना तो रोज करीत असे.

त्याच्या शेजारी एक पाखंडी (अ-मुस्लीम) व्यापारी राहात असे. होजाची ही भक्तीभावाने केलेली पण विचित्र अशी प्रार्थना तो रोज ऐकत असे. होजा आपल्या वचनाप्रमाणे वागेल की नाही हे जाणण्याची त्याला फार उत्कंठा लागली. ती इतकी की, दुसऱ्या दिवशी सकाळी होजाने आपली ठराविक प्रार्थना म्हटली तेव्हा ९९९ मोहरा असलेली एक पिशवी त्याने धुराड्यातून खाली टाकली. आता होजा काय करील हे पाहण्यासाठी त्याने खिडकीतून डोकावले.

होजाने ती पिशवी उचलली, त्यातील ९९९ मोहरा मोजून तो म्हणाला,

' ज्या अल्लाने मला या ९९९ मोहरा दिल्या तो मला लवकरच हजारावी मोहोर खचित देईल '

अशा रीतीने हजार मोहरा मिळण्याच्या मार्गावरील अनिश्चितता आता बरीच कमी झाली होती हे स्पष्ट होते. परमेश्वराने आपल्याला या सर्व मोहरा एकदम द्याव्या असे त्याने मुळीच म्हटले नव्हते.



होजाने या मोहरा आपल्याजवळ ठेवण्याचा निश्चय केला आहे हे पाहून तो व्यापारी पहाटे चांगले ऊन पडेपर्यंत थांबला आणि मग होजाची भेट घेण्यास गेला. तो म्हणाला, ' रावसाहेब ! थट्टेलाही काही सीमा असते ! मला माझ्या मोहरा परत द्या. '

होजा म्हणाला, ' शेटजी, तुम्हाला वेड तर नाही लागलं ! मी तुमच्याकडून केव्हा उसनवार रक्कम घेतली होती ? '

मला काय म्हणायचं आहे ते तुम्हाला माहीत आहे. मी तुमची प्रार्थना ऐकत होतो. तुम्ही तुमचा शब्द, तुमचे वचन पाळता की नाही, याची परीक्षा पाहण्यासाठी ९९९ मोहरा असलेली ती थैली मीच धुराड्यातून आज पहाटे खाली टाकली होती.

होजा रागाने म्हणाला, ' खऱ्या श्रद्धाळू मुस्लीमाला भुलविण्यासाठी एवढ्या मोठ्या रकमेचा धोका तू खुशीने पत्करलास या गोष्टीवर माझा विश्वास बसेल असं वाटतं का तुला? या मोहरा माझ्या आहेत. मनापासून आणि चिकाटीने प्रार्थना केल्याबद्दल बक्षीस म्हणून अल्लाने त्या मला दिल्या आहेत.'

यावर चिडून तो व्यापारी म्हणाला, ' मी तुझ्यावर फिर्याद करीन. त्या मोहरा माझ्या आहेत.'

होजा म्हणाला, ' ठीक आहे. न्यायालयाचा निकाल मान्य करण्याची माझी तयारी आहे. पण आता माझं वय झालं आणि न्यायालयापर्यंत पायी चालण्याचं त्राण माझ्या अंगात उरलं नाही.'

तो व्यापारी लगेच धावत गेला आणि एक खेचर घेऊन आला. प्रवासापुरते ते होजाला उसनवार देण्याची त्याने तयारी दर्शविली.

होजा म्हणाला, ' हे पाहा, समाजात माझा काही विशेष दर्जा आहे. माझा हा जुना झब्बा घालून मी न्यायाधिशासमोर उभा राहणार नाही.' त्या व्यापाऱ्याने निश्चय केला होता की, कोणत्याही सबबीवर होजाला न्यायालयात येणे टाळू दिले न पाहिजे. म्हणून घरात जाऊन त्याने एक छानसा रेशमी झब्बा आणि उंची केसाळ कोट बाहेर आणला.

तो म्हणाला, ' या प्रसंगापुरते हे कपडे मी तुम्हाला उसने देतो. पण चला लवकर.'

ते कपडे घालून होजा त्या खेचरावर बसला. आणि ते दोघे न्यायालयाकडे निघाले.

न्यायाधिशासमोर आल्यावर त्याने विचारले, ' तुमची काय तक्रार आहे?'

व्यापारी म्हणला, ' या मनुष्याजवळ माझ्या ९९९ मोहरा आहेत. पण त्या परत देण्यास तो नकार देत आहे.'

त्यानंतर त्याने न्यायाधीशास घडलेले सर्व वर्तमान सांगितले.

होजा म्हणाला, ' रावसाहेब ! हा माझा शेजारी आहे. परमेश्वराने माझ्या प्रार्थनेला अनुसरून मला ९९९ मोहरा दिल्या. मी त्या मोजत असता या माणसाने ते ऐकले असावे आणि आता या मोहरा आपल्याच आहेत. असा दावा तो करीत आहे. '

तो पाखंडी म्हणाला, ' पण त्या मोहरा माझ्या आहेतच.'

होजा म्हणाला, ' हे बघा रावसाहेब ! आता हा माणूस या पुढे म्हणेल कीं, ज्या खेचरावर मी बसून आलो ते खेचरही माझे आहे.'

तो पाखंडी म्हणाला, ' मग, ते आहेच माझं. '

होजा उत्तरला, ' रावसाहेब, पाहिलंत ना तुम्ही ? आता माझी खात्री आहे कीं, या माणसाची मजल इतकी पुढे जाईल कीं, तो म्हणेल की, माझ्या अंगावर असलेले कपडेही त्याचे आहेत. '

तो पाखंडी म्हणाला, ' मग ते आहेतच माझे—तो झब्बा, तो केसाळ कोट, दोन्ही माझेच आहेत. '

हे ऐकून न्यायाधीशाला फार राग आला. तो म्हणाला, ' चल चालता हो ! लबाड कुठला. आमच्या समाजात इतक्या सन्माननीय पदावर चढलेल्या मनुष्याची मिळकत बळकावण्याचा तू प्रयत्न करीत आहेस. एवढेच नव्हे तर मलाही मूर्ख बनविण्याचा तू प्रयत्न करीत आहेस, असे दिसते. '

असे म्हणून त्याने त्या पाखंड्याला न्यायालयातून हाकलून दिले.

होजा जेव्हा घरी आला तेव्हा त्याला दिसले की, त्याचा शेजारी, तो पाखंडी व्यापारी अगदी उदास होऊन घरात बसला आहे. यावर त्याने त्याला आपल्या घरी बोलावले. त्याचे खेचर-झब्बा, केसाळ कोट आणि मोहरांची थैली हे सर्व त्याला परत करून तो म्हणाला,

'शेटजी, हा तुमचा सारा ऐवज परत घ्या. पण हे बघा, यापुढे कोणाही अस्सल मुस्लीमाला आपण शब्द मोडण्यासाठी लाट्च दाखवू नका.'

---

## ३२ : वादे वादे जायते तत्वबोध :

एके दिवशी तीन विद्वान ख्रिस्ती संन्यासी ज्ञानाच्या शोधार्थ तुर्कस्तानात प्रवासास निघाले होते. राज्यातील विद्वान लोकांविषयी त्यांनी सुलतानाजवळ चौकशी केली. तेव्हा त्याने थट्टेने त्यांना अकशहिर गावच्या नसरद्दीन होजाचे नाव सांगितले. मग ते संन्यासी म्हणाले, 'आम्हाला या पंडिताची ओळख करून त्यांच्याशी वादविवाद करायचा आहे!' त्यापैकी प्रत्येकाला एक प्रश्न विचारायचा होता.

सुलतानाच्या आमत्रणावरून होजा आपल्या गाढवावर बसून दरबारात जाऊन पोचला. आपल्याला कशासाठी पाचारण केले आहे हे कळल्यावर तो म्हणाला, 'ठीक आहे, विचारू द्या यांना त्यांचे प्रश्न.'

पहिला संन्यासी पुढे झाला आणि त्याने प्रश्न टाकला, 'पृथ्वीचा केंद्रबिंदू कोठे आहे?'

होजाने उत्तर दिले, 'पृथ्वीचा केंद्रबिंदू आता माझ्या गाढवाच्या पुढच्या पायाच्या थेट खाली आहे.'

संन्यासी म्हणाला, 'हे तुम्ही कसं सिद्ध करता?'

होजा म्हणाला, 'त्यात काय आहे? अंतर मोजण्याची दोरी घेऊन तुम्ही पृथ्वीचा आकार आधी मोजून या. मग माझा हिशेब चुकला असे तुम्हाला वाटत असेल तर ती चूक केवढी आहे हे मला सांगा. आणि मग.... आपण त्याची चर्चा करू.'

तो संन्यासी बिचारा मुकाट्याने मागे फिरला. दुसरा संन्यासी पुढे

त्यानंतर त्याने न्यायाधीशास घडलेले सर्व वर्तमान सांगितले.

होजा म्हणाला, 'रावसाहेब! हा माझा शेजारी आहे. परमेश्वराने माझ्या प्रार्थनेला अनुसरून मला ९९९ मोहरा दिल्या. मी त्या मोजत असता या माणसाने ते ऐकले असावे आणि आता या मोहरा आपल्याच आहेत. असा दावा तो करीत आहे.'

तो पाखंडी म्हणाला, 'पण त्या मोहरा माझ्या आहेतच.'

होजा म्हणाला, 'हे बघा रावसाहेब! आता हा माणूस या पुढे म्हणेल कीं, ज्या खेचरावर मी बसून आलो ते खेचरही माझे आहे.'

तो पाखंडी म्हणाला, 'मग, ते आहेच माझं.'

होजा उत्तरला, 'रावसाहेब, पाहिलंत ना तुम्ही? आता माझी खात्री आहे कीं, या माणसाची मजल इतकी पुढे जाईल कीं, तो म्हणेल की, माझ्या अंगावर असलेले कपडेही त्याचे आहेत.'

तो पाखंडी म्हणाला, 'मग ते आहेतच माझे–तो झब्बा, तो केसाळ कोट, दोन्ही माझेच आहेत.'

हे ऐकून न्यायाधीशाला फार राग आला. तो म्हणाला, 'चल चालता हो! लबाड कुठला. आमच्या समाजात इतक्या सन्माननीय पदावर चढलेल्या मनुष्याची मिळकत बळकावण्याचा तू प्रयत्न करीत आहेस. एवढेच नव्हे तर मलाही मूर्ख बनविण्याचा तू प्रयत्न करीत आहेस, असे दिसते.'

असे म्हणून त्याने त्या पाखंड्याला न्यायालयातून हाकलून दिले.

होजा जेव्हा घरी आला तेव्हा त्याला दिसले की, त्याचा शेजारी, तो पाखंडी व्यापारी अगदी उदास होऊन घरात बसला आहे. यावर त्याने त्याला आपल्या घरी बोलावले. त्याचे खेचर-झब्बा, केसाळ कोट आणि मोहरांची थैली हे सर्व त्याला परत करून तो म्हणाला,

'शेटजी, हा तुमचा सारा ऐवज परत घ्या. पण हे बघा, यापुढे कोणाही अस्सल मुसलीमाला आपण शब्द मोडण्यासाठी लालूच दाखवू नका.'

---

## ३२ : वादे वादे जायते तत्वबोध :

एके दिवशी तीन विद्वान ख्रिस्ती संन्यासी ज्ञानाच्या शोधार्थ तुर्कस्तानात प्रवासास निघाले होते. राज्यातील विद्वान लोकांविषयी त्यांनी सुलतानाजवळ चौकशी केली. तेव्हा त्याने श्रद्धेने त्यांना अकशहिर गावच्या नसरद्दीन होजाचे नाव सांगितले. मग ते संन्यासी म्हणाले, 'आम्हाला या पंडिताची ओळख करून त्यांच्याशी वादविवाद करायचा आहे!' त्यापैकी प्रत्येकाला एक प्रश्न विचारायचा होता.

सुलतानाच्या आमत्रणावरून होजा आपल्या गाढवावर बसून दरबारात जाऊन पोचला. आपल्याला कशासाठी पाचारण केले आहे हे कळल्यावर तो म्हणाला, 'ठीक आहे, विचारू द्या यांना त्यांचे प्रश्न.'

पहिला संन्यासी पुढे झाला आणि त्याने प्रश्न टाकला, 'पृथ्वीचा केंद्रबिंदू कोठे आहे?'

होजाने उत्तर दिले, 'पृथ्वीचा केंद्रबिंदू आता माझ्या गाढवाच्या पुढच्या पायाच्या थेट खाली आहे.'

संन्यासी म्हणाला, 'हे तुम्ही कसं सिद्ध करता?'

होजा म्हणाला, 'त्यात काय आहे? अंतर मोजण्याची दोरी घेऊन तुम्ही पृथ्वीचा आकार आधी मोजून या. मग माझा हिशेब चुकला असे तुम्हाला वाटत असेल तर ती चूक केवढी आहे हे मला सांगा. आणि मग.... आपण त्याची चर्चा करू.'

तो संन्यासी बिचारा मुकाट्याने मागे फिरला. दुसरा संन्यासी पुढे

होऊन म्हणाला, ‘ आकाशाच्या घुमटात किती तारे आहेत ? ’

होजाने उत्तर दिले, ‘ माझ्या गाढवाच्या अंगावर जितके केस आ हेत तितके.’

‘ हें तुम्ही कसं सिद्ध करता ? ’ संन्याशाने विचारले.

होजा म्हणाला,‘ त्यात काय ? तुम्ही स्वतः मोजून पाहा. आणि माझी जर चूक असेल तर ती केवढी आहे ते सांगा आणि मग आ पण त्याची चर्चा करू.’

संन्याशाने यावर आक्षेप घेतला, ‘ अहो महाशय गाढवाच्या अंगावरील सर्व केस कसे मोजता येतील ? ’

होजाने उत्तर दिले, ‘ का ? आकाशातील तारे जितक्या सुलभपणे मोजता येतात तसेच.’

दुसरा संन्यासीही खजिल होऊन मागे सरला. यावर तिसरा संन्यासी पुढे आला. होजा केस मोजण्याबद्दल सारखा बोलत आहे हे पाहून त्याला त्याबद्दल चांगला धडा शिकवावा असे त्याने ठरविले. आणि विचारले, ‘ माझ्या दाढीत किती केस आहेत ते सांग पाहू ? ’

होजाने उत्तर दिले, ‘ माझ्या गाढवाच्या शेपटीला जेवढे केस आहेत तेवढे. ’

तिसऱ्या संन्याशाने विचारले, ‘ तू हे कसं सिद्ध करशील ? ’

होजा म्हणाला, ‘ त्यात काय कठीण आहे ? तुझ्या दाढीतील केस आणि माझ्या गाढवाच्या शेपटीचे केस एक एक करून उपटून पाहू या. गाढवाचा एक केस उपटला की तुझा एक केस उपटायचा. मग हे मोजून पाहिल्यावर तुझी खात्री होईल कीं माझं म्हणणं बरोबर आहे. चला करू या सुरुवात. ’

पण हा तिसरा संन्यासी या परीक्षेला तयार झाला नाही. आपण स्वतः आणि आपले दोन सोबती यांचा वादात पराभव झाला असे त्याने मान्य केले.

# ३३ : आधी अनाना, मग तनाना !

एके दिवशी होजा शिवरी हिसार या शहरात जाऊन पोहोचला. तेव्हा त्याला फार भूक लागली होती. पण त्याच्या खिशात पैसाही नव्हता. तो बाजारातून चालला असता ताज्या, नुकत्याच भाजलेल्या रोटांचा वास त्याच्या नाकात शिरला.

तो त्या भटाऱ्याला म्हणाला, 'काय हो ! हे कुरकुरीत, बदामी रंगावर भाजलेले रोट अगदी स्वर्गातल्या रोटांसारखे सुवास देत आहेत. ते तुमचे आहेत का ?'

तो भटारी शांतपणे म्हणाला, 'होय. माझेच आहेत. मग ?'

'अन् त्या चकचकीत, मधाच्या रंगाच्या, सुंदर, गोलं, मोदकासारख्या रोट्या ! अहाहा स्वर्गातल्या अप्सरेच्या शरीराइतक्या त्या मृदू दिसतात. नाही का ? त्याही तुमच्याच असतील ?'

होजाने दुसरा प्रश्न केला. त्याला आशा होती की, या साऱ्या बोलण्यातील सूचना लक्षात घेऊन तो भटारी या पैकी काही तरी आपल्यापुढे ठेवील.

पण भटारी आपला मख्खपणे म्हणाला, 'हो हो. हे सारं माझं आहे. पुढे बोला.'

यावर होजाने रागाने म्हटले, 'मग तू कोणाच्या परवानगीची वाट पाहतोस ? या रोट्या तुझ्या आहेत तर खा त्या साऱ्या !' म्हणून धुसफुसत होजाने तेथून पाय काढला.

# ३४ : खटासि व्हावे खटनट

एके दिवशी एक गरीब माणूस अक-शहीर गावातून चालला होता. त्याच्याजवळ भाकरीचा एक कोरडा तुकडा तेवढा होता. तो एका उपाहारगृहाजवळ चालला असता शेगडीवर तळण्यात येणाऱ्या काही मासांच्या तुकड्यांचा वास त्याच्या नाकात शिरला. त्या रुचकर वासाने तो इतका सुखावला की, तो वास आपल्या भाकरीच्या तुकड्याला लागावा म्हणून त्याने तो तुकडा कढईवर धरला. त्यानंतर तो तुकडा खाल्ला. त्याची चव त्याला पूर्वीपेक्षा अधिक चांगली वाटली.

त्या उपाहारगृहाच्या मालकाने हा सारा प्रकार पाहिला होता. त्या गरीब माणसाची मानगूट धरून त्याने त्याला न्यायाधीशापुढे खेचून नेले. कढईतील मांसाच्या तुकड्यांची किंमत या माणसाने दिली पाहिजे अशी त्याने मागणी केली. त्यावेळी होजा हाच न्यायाधीशाचे काम पाहात होता.

होजाने मालकाचे सर्व म्हणणे लक्ष देऊन ऐकून घेतले. त्यानंतर आपल्या खिशातून दोन नाणी काढून त्याने त्या मालकाला जवळ बोलाविले. तो आल्यावर होजाने ती नाणी आपल्या मुठीत धरून खुळखुळ वाजविली.

मालकाने विचारले, 'याचा अर्थ काय?'

होजा म्हणाला, 'वा? तुझा जो तोटा झाला त्याची नुकसान भरपाई मी तुला आताच देऊन टाकली आहे. अरे अन्नाच्या वासाची किंमत पैशाच्या आवाजाने भागविणे अगदी न्याय्य आहे. नाही का?'

यावर आपल्याला शहाणा समजणारा तो मालक तेथून निमूटपणे निघून गेला.

# ३५ : काय हा चमत्कार !

एकदा होजाने काही पक्ष्यांची शिकार केली. ते पक्षी नीट सोलून एका मोठया भांड्यात सर्व मसाल्यासह घालून त्याने ते भांडे भट्टीत ठेवले. आपल्या मित्रांना या मेजवानीसाठी बोलवावे म्हणून तो तेथून निघून गेला.

बऱ्याच वेळानंतर कोणा एका मनुष्याने भट्टींत नीट शिजलेले ते पक्षी काढून नेले. आणि थंड झालेल्या भट्टीत त्याच भांड्यात दुसरे जिवंत पक्षी ठेवून तो निघून गेला.

काही वेळाने होजा आपल्या मित्रांसह घरी आला. भट्टीतील ते भांडे मेजावर ठेवून त्याने भांड्याचे झाकण उघडले. लगेच त्यातील पक्षी बाहेर आले आणि खिडकीतून उडून नाहीसे झाले.



इकडे होजा फार खजील झाला. त्याने परमेश्वराचा धावा केला. तो म्हणाला, ' हे परमेश्वरा मृतांना जीवन देणे हा तुझा अधिकार

आहे खरा आणि हे पक्षी जिवंत करण्याचा चमत्कार तू केलास हेही खरे; पण आता मला एवढेच सांग की, ' मी वापरलेले जळण, लोणी, मीठ, मिरी, मसाले आणि माझी सारी मेहनत यांचं तूं काय केलं आहेस ? '

---

## ३६ : आधी कळस मग पाया रे !

**होजाने** एकदा तो रहात असलेल्या घराचा अर्धा हिस्सा विकण्याचे ठरविले. आणि एका दलालाला बोलावणे पाठविले. तो दलाल म्हणाला, ' घर विकायला ही वेळ अनुकूल नाही. इतकी घाई करण्याचं तुम्हाला काय कारण आहे ? '

होजा म्हणाला, ' हे पाहा, या वाड्यात दुसऱ्या कोणाबरोबर राहणे मला आवडत नाही म्हणून माझा बेत आहे कीं, माझा हिस्सा विकून टाकून आलेल्या पैशाने तो दुसरा भाग विकत घ्यावा. यासाठीच ही योजना मी आखली आहे ! '

---

## ३७ : उद्धवा, अजब तुझे सरकार !

**एकदा** होजा न्यायाधीशाचे काम करीत असता एक शेतकरी त्याच्याकडे येऊन म्हणाला, ' रावसाहेब ! समजा तुमची गाय आमच्या गायीबरोबर एका शेतात चरत आहे आणि तिने आमच्या एका गायीवर हल्ला करून तिला ठार मारले तर त्याबद्दल कायद्यात काय तरतूद आहे ? '

होजा म्हणाला, ' छे ! काही नाही. कोणत्याही प्राण्याला त्याने केलेल्या प्राणहानीबद्दल जबाबदार धरता येत नाही असा कायदा आहे. '

'असं काय ! माझ्या छातीवरचं एक मोठे ओझं उतरलं. आता तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही कारण **माझ्या** गायीने तुमच्या गायीला ठार केलं आहे.'

होजा घाईघाईने म्हणाला, 'थांब, थांब, आता ही परिस्थिती घोटाळ्याची होत चालली आहे तिचा नीट विचार केला पाहिजे. त्या मांडणीवरचं ते काळं पुस्तक इकडे दे. कायदा काय म्हणतो ते पाहू.'

---

## ३८ : कथा कुणाची, व्यथा कुणा ?

**दोन** तीन वेळा असे झाले की, होजाने सागुती घरी आणावी आणि त्याच्या बायकोने ती तिच्या मैत्रिणीला देऊन टाकावी. संध्याकाळी होजा घरी आला म्हणजे वाडगाभर भाताखेरीज त्याला दुसरे काही खाण्यास मिळत नसे.

शेवटी एके दिवशी होजा चिडून म्हणाला, 'ए बया ! अलीकडे मी कितीकदा चांगली सागुती घरी आणली पण मला तर तिची चवही चाखायला मिळाली नाही.'

होजाची पत्नी म्हणाली, 'काय करू बाई ! एक मेला बोका ती चोरून न्यायला अगदी सवकला आहे !' हे ऐकून होजा गप्प बसला. मात्र त्याने जवळची एक कुऱ्हाड उचलून पेटीत ठेवून दिली.

त्याच्या पत्नीने विचारले, 'कोणापासून लपवून ठेवीत आहात ही कुऱ्हाड ?'

होजा म्हणाला, 'दुसऱ्या कोणापासून ? तुझ्या त्या बोक्यापासून ग !'

त्याची पत्नी म्हणाली, 'अरिष्टच बाई हे ! तो बोक्या कुऱ्हाडीला तोंडही लावणार नाही.' होजाने तिच्याकडे रोखून पाहात उत्तर दिले.

आहे खरा आणि हे पक्षी जिवंत करण्याचा चमत्कार तू केलास हेही खरे; पण आता मला एवढेच सांग की, ' मी वापरलेले जळण, लोणी, मीठ, मिरी, मसाले आणि माझी सारी मेहनत यांचं तूं काय केलं आहेस ? '

## ३६ : आधी कळस मग पाया रे !

**होजाने** एकदा तो रहात असलेल्या घराचा अर्धा हिस्सा विकण्याचे ठरविले. आणि एका दलालाला बोलावणे पाठविले. तो दलाल म्हणाला, ' घर विकायला ही वेळ अनुकूल नाही. इतकी घाई करण्याचं तुम्हाला काय कारण आहे ? '

होजा म्हणाला, ' हे पाहा, या वाड्यात दुसऱ्या कोणाबरोबर राहणे मला आवडत नाही म्हणून माझा बेत आहे कीं, माझा हिस्सा विकून टाकून आलेल्या पैशाने तो दुसरा भाग विकत घ्यावा. यासाठीच ही योजना मी आखली आहे ! '

## ३७ : उद्धवा, अजब तुझे सरकार !

**एकदा** होजा न्यायाधीशाचे काम करीत असता एक शेतकरी त्याच्याकडे येऊन म्हणाला, ' रावसाहेब ! समजा तुमची गाय आमच्या गायीबरोबर एका शेतात चरत आहे आणि तिने आमच्या एका गायीवर हल्ला करून तिला ठार मारले तर त्याबद्दल कायद्यात काय तरतूद आहे ? '

होजा म्हणाला, ' छे ! काही नाही. कोणत्याही प्राण्याला त्याने केलेल्या प्राणहानीबद्दल जबाबदार धरता येत नाही असा कायदा आहे. '

‘असं काय! माझ्या छातीवरचं एक मोठे ओझं उतरलं. आता तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही कारण माझ्या गायीने तुमच्या गायीला ठार केलं आहे.’

होजा घाईघाईने म्हणाला, ‘थांब, थांब, आता ही परिस्थिती घोटाळ्याची होत चालली आहे तिचा नीट विचार केला पाहिजे. त्या मांडणीवरचं ते काळं पुस्तक इकडे दे. कायदा काय म्हणतो ते पाहू.’

---

## ३८ : कथा कुणाची, व्यथा कुणा ?

**दोन** तीन वेळा असे झाले की, होजाने सागुती घरी आणावी आणि त्याच्या बायकोने ती तिच्या मैत्रिणीला देऊन टाकावी. संध्याकाळी होजा घरी आला म्हणजे वाडगाभर भाताखेरीज त्याला दुसरे काही खाण्यास मिळत नसे.

शेवटी एके दिवशी होजा चिडून म्हणाला, ‘ए बया! अलीकडे मी कितीकदा चांगली सागुती घरी आणली पण मला तर तिची चवही चाखायला मिळाली नाही.’

होजाची पत्नी म्हणाली, ‘काय करू बाई! एक मेला बोका ती चोरून न्यायला अगदी सवकला आहे!’ हे ऐकून होजा गप्प बसला. मात्र त्याने जवळची एक कुऱ्हाड उचलून पेटीत ठेवून दिली.

त्याच्या पत्नीने विचारले, ‘कोणापासून लपवून ठेवीत आहात ही कुऱ्हाड?’

होजा म्हणाला, ‘दुसऱ्या कोणापासून? तुझ्या त्या बोक्यापासून ग!’

त्याची पत्नी म्हणाली, ‘अरिष्टच बाई हे! तो बोक्या कुऱ्हाडीला तोंडही लावणार नाही.’ होजाने तिच्याकडे रोखून पाहात उत्तर दिले.



‘ हे पाहा पावलीची सागुती जर हा बोका खरोखर चोरीत असेल तर तिच्या दसपट किंमत असलेली कुऱ्हाड तो चोरणारच. नाही का ? ’

---

## ३९ : अन्न हे पूर्णब्रह्म !

**एकदा** एका गृहस्थाने होजाला भोजनास बोलविले होते. यजमानाने नोकरास जे पदार्थ आणावयास सांगितले त्यातील शेवटची वस्तू म्हणजे उकडलेले अंजीर आणि मलई.

इतर सर्व पदार्थ बरोबर आले, पण मुखशुद्धीसाठी अंजिरे मात्र आली नाहीत.

जेवण झाल्यावर यजमान होजाला म्हणाला, झोपी जाण्यापूर्वी चित्त-शुद्धीसाठी आम्हाला कुराणातील एखादा भाग वाचून दाखवा.

होजाने कुराण उघडले. त्यातील एक उतारा असा होता—

‘ सिनाई पर्वतावरील अंजीर आणि ऑलिव्ह या झाडांच्या बाजूने....’

होजाने सुरुवात केली, दयाळु परमेश्वराचे नाव घेऊन—

‘ सिनाई पर्वतावरील ऑलिव्ह झाडांच्या बाजूने....’

यजमानाने होजाला मध्येच हटकले. तो म्हणाला, ‘ अहो तुम्ही ‘अंजीर’ विसरलात. होजाने ताडकन् उत्तर दिले, ‘ अहो ‘ अंजीर ’ मी विसरलो नाही, तुम्हीच विसरलात. बघा कुठे आहेत ते ! अन् आणा ते मुखशुद्धीला ! ’

---

## ४० : जुगलबंदी !

**एकदा** होजाला वाटले की, भाजीपाल्याचा धंदा करून पाहावा. म्हणून आपल्या गाढवावर दोन्ही बाजूच्या कंठाळीत भाजीपाला भरून घेऊन तो शहरात विक्रीसाठी बाहेर पडला. मोठ्याने ओरडून आपल्या भाजीपाल्याकडे लोकांचे लक्ष वेधावे अशी होजाची इच्छा होती. परंतु प्रत्येक वेळी ‘ भाजी !’ म्हणून ओरडण्यासाठी होजाने तोंड उघडले म्हणजे गाढवच ओरडू लागे, आणि त्यामुळे होजाचा आवाज कोणाला ऐकू येईना आणि त्याची भाजीही खपेना.

शेवटी ते शहराच्या गर्दीच्या भागातील एका चौकात आले. ‘ भाजी ! ’ म्हणून होजाने ललकारी दिली पण तेवढ्यात गाढवही मोठ्याने ओरडले आणि होजाचा आवाज त्या ओरडण्यात लुप्त झाला. होजा रागाने गाढवाला म्हणाला, ‘ अरे, गाढवा ! भाजी कोण विकतोय तू का मी ? ’

---

## ४१ : जा घेउनि संदेश !

**एकदा** होजाच्या जवळच्या घरात एक लग्न समारंभ चालला होता. होजाने कागदाचा एक कोरा तुकडा एका पाकीटात बंद केला, तो घेऊन लग्नघराच्या द्वारावर त्याने थाप मारली. दरवाज्या उघडल्यावर तेथील नोकराला होजा म्हणाला, 'अरे तुझ्या मालकासाठी मी एक निरोप आणला आहे.' यावर त्या नोकराने होजाला आत सोडले.

होजाने ते पाकीट मालकाजवळ दिले, जवळच उंची खाद्यपेयांनी भरलेल्या एका टेबलाशी बसून तो त्या पदार्थांवर ताव मारू लागला. इकडे घरमालकाने ते पाकीट उघडून आतील कागद बाहेर काढला. तो आश्चर्याने उद्गारला, 'अरे यावर तर काहीच लिहिलेलं नाही, हा कागद अगदी कोरा आहे !'

खोजाने थंडपणे उत्तर दिले, 'हे पाहा मी फार घाईत होतो त्यामुळे कागदावर लिहायला तुमच्या मित्राला वेळच मिळाला नाही !'

---

## ४२ : आसुरी लालसा !

**एकदा** तैमूरलंगाची छावणी अक-शहीर येथे पडली असता तो भोवतालच्या आपल्या सेनेच्या देखरेखीसाठी बाहेर पडला. तो आठवड्या-नंतर परत आल्यावर त्याचा प्रवास कसा काय झाला असे होजाने त्याला विचारले.

क्रूरपणाबद्दल तैमूरलंगाची ख्याती होती. तो म्हणाला, 'वा ! फारच छान ! शनिवारी एक आग लागली, रविवारी एक पिसाळलेला कुत्रा दोन माणसांना चावला त्यामुळे त्यांच्या जखमा तापवून लाल केलेल्या उलथण्याने भाजून काढाव्या लागल्या. सोमवारी एका चक्री वादळाने

कैक घरे पडली आणि आतले लोक आतच राहिले. मंगळवारी एक मस्त बैल मोकळा सुटला आणि अनेक लोकांना त्याने शिंगावर घेतले, बुधवारी एका माणसाला वेडाचा झटका येऊन त्याने एक खून केला आणि त्याचे हाल हाल करावे लागले, गुरुवारी एका बाईनं एका झाडावर स्वतःला टांगून घेऊन जीव दिला. शुक्रवारी मी परत आलो. अशा रीतीने माझा हा आठवडा फार मजेत गेला.

इकडे हे सारे अनर्थ ऐकून होजाला तर कापरे भरले होते. आपले बाहू उंचावून तो परमेश्वराचे आभार मानू लागला. तैमूरने नवलाने विचारले, ‘ परमेश्वराचे हे आभार कशासाठी ? ’

होजा म्हणाला, ‘ तुम्ही परत आलात याबद्दल मी आभार मानीत आहे. जर तुम्ही अधिक काळ बाहेर राहिला असता तर भोवतालचा सारा प्रदेश तुमच्या या संचारामुळे वैराण बनला असता ! ’

---

## ४४ : दीवाना हूँ—मैं !

**एकदा** होजा एका धान्यदळण्याच्या चक्कीत गेला आणि तेथील गव्हाच्या पोत्यातून गहू काढून स्वतःच्या पोत्यात भरून घेऊ लागला.

त्याचे हे काम चालले असता एकाएकी तो चक्कीवाला तेथे येऊन पोहोचला. त्याने दरडावून विचारले,

‘ तुझं काय चाललं आहे तिथं ? ’ होजाने न डगमगता उत्तर दिले, ‘ अहो मी एक वेडगळ, मूर्ख मनुष्य आहे, एखादे वेळी माझ्या मनात भलतेच काही करण्याची लहर येते आणि मग तसे केल्यावाचून मला अगदी राहावतच नाही.’

चक्कीवाल्याने गोंधळून विचारले. ‘ तसं असलं तर तुझ्या पोत्यातलं धान्य माझ्या पोत्यात टाकण्याची तुला का लहर येत नाही ? ’

## ४१ : जा घेउनि संदेश !

**एकदा** होजाच्या जवळच्या घरात एक लग्न समारंभ चालला होता. होजाने कागदाचा एक कोरा तुकडा एका पाकीटात बंद केला, तो घेऊन लग्नघराच्या द्वारावर त्याने थाप मारली. दरवाज्या उघडल्यावर तेथील नोकराला होजा म्हणाला, 'अरे तुझ्या मालकासाठी मी एक निरोप आणला आहे.' यावर त्या नोकराने होजाला आत सोडले.

होजाने ते पाकीट मालकाजवळ दिले, जवळच उंची खाद्यपेयांनी भरलेल्या एका टेबलाशी बसून तो त्या पदार्थांवर ताव मारू लागला. इकडे घरमालकाने ते पाकीट उघडून आतील कागद बाहेर काढला. तो आश्चर्याने उद्गारला, 'अरे यावर तर काहीच लिहिलेलं नाही, हा कागद अगदी कोरा आहे !'

खोजाने थंडपणे उत्तर दिले, 'हे पाहा मी फार घाईत होतो त्यामुळे कागदावर लिहायला तुमच्या मित्राला वेळच मिळाला नाही !'

---

## ४२ : आसुरी लालसा !

**एकदा** तैमूरलंगाची छावणी अक-शहीर येथे पडली असता तो भोवतालच्या आपल्या सेनेच्या देखरेखीसाठी बाहेर पडला. तो आठवड्या-नंतर परत आल्यावर त्याचा प्रवास कसा काय झाला असे होजाने त्याला विचारले.

क्रूरपणाबद्दल तैमूरलंगाची ख्याती होती. तो म्हणाला, 'वा ! फारच छान ! शनिवारी एक आग लागली, रविवारी एक पिसाळलेला कुत्रा दोन माणसांना चावला त्यामुळे त्यांच्या जखमा तापवून लाल केलेल्या उलथण्याने भाजून काढाव्या लागल्या. सोमवारी एका चक्री वादळाने

कैक घरे पडली आणि आतले लोक आतच राहिले. मंगळवारी एक मस्त बैल मोकळा सुटला आणि अनेक लोकांना त्याने शिंगावर घेतले, बुधवारी एका माणसाला वेडाचा झटका येऊन त्याने एक खून केला आणि त्याचे हाल हाल करावे लागले, गुरुवारी एका बाईनं एका झाडावर स्वतःला टांगून घेऊन जीव दिला. शुक्रवारी मी परत आलो. अशा रीतीने माझा हा आठवडा फार मजेत गेला.

इकडे हे सारे अनर्थ ऐकून होजाला तर कापरे भरले होते. आपले बाहू उंचावून तो परमेश्वराचे आभार मानू लागला. तैमूरने नवलाने विचारले, ' परमेश्वराचे हे आभार कशासाठी ? '

होजा म्हणाला, ' तुम्ही परत आलात याबद्दल मी आभार मानीत आहे. जर तुम्ही अधिक काळ बाहेर राहिला असता तर भोवतालचा सारा प्रदेश तुमच्या या संचारामुळे वैराण बनला असता ! '

---

## ४४ : दीवाना हूँ—मैं !

**एकदा** होजा एका धान्यदळण्याच्या चक्कीत गेला आणि तेथील गव्हाच्या पोत्यातून गहू काढून स्वतःच्या पोत्यात भरून घेऊ लागला.

त्याचे हे काम चालले असता एकाएकी तो चक्कीवाला तेथे येऊन पोहोचला. त्याने दरडावून विचारले,

' तुझं काय चाललं आहे तिथं ? ' होजाने न डगमगता उत्तर दिले, ' अहो मी एक वेडगळ, मूर्ख मनुष्य आहे, एखादे वेळी माझ्या मनात भलतेच काही करण्याची लहर येते आणि मग तसे केल्यावाचून मला अगदी राहावतच नाही.'

चक्कीवाल्याने गोंधळून विचारले. ' तसं असलं तर तुझ्या पोत्यातलं धान्य माझ्या पोत्यात टाकण्याची तुला का लहर येत नाही ? '

होजा म्हणाला, 'हे पाहा, मी एक साधासुधा अर्धवट मनुष्य आहे. तुम्ही म्हणता तितका संपूर्ण वेड लागलेला माणूस मी नव्हे !'

## ४४ : हुकुमाचा मी बंदा स्वहिताचा माझा धंदा!

एके दिवशी होजा एक शिजविलेली कोंबडी खात बसला होता. दारावरून चाललेल्या एका माणसाने त्यातील एक तुकडा मागितला. होजा म्हणाला, 'मी दिला असता हो, पण काय करू ही कोंबडी माझी नसून माझ्या बायकोची आहे.'



तो माणूस म्हणाला, 'पण तुम्ही ती चक्क खाताहांत की !'

होजा उत्तरला, 'त्याला मी काय करू? माझ्या बायकोने तसं करण्याचा मला हुकूम केला. आणि मी ते काम करीत आहे एवढंच !'

## ४५ : सखे होजारिणी....!

एके दिवशी होजाला कडकडून भूक लागली. पण त्याच्या घरात काही अन्न नव्हते. त्याचे मनात विचार आला, 'माझ्याजवळ केवळ एक वाडगाभर रस्सा यावेळी असता तर मी किती सुखी झालो असतो ?'

तेवढ्यात त्याच्या दारावर एक थाप पडली. होजा दार उघडून पाहातो तो एक लहान मुलगा हातात एक वाडगा घेऊन उंबऱ्यावर उभा होता.

तो म्हणाला, 'माझ्या आईला आज बरं वाटत नाही. वाटीभर गरम रस्सा तिच्यासाठी देता का ?'

होजा उद्गारला, 'अरे देवा ! आता माझे विचारही माझ्या मालकीचे राहिलेले दिसत नाहीत. रश्श्याची मला केवळ कल्पना येण्याचा अवकाश की माझ्या शेजाऱ्यांना लगेच त्याचा वास देखील आला पाहा !'

---

## ४६ : कर न करीचा वसा !

होजा लहान असता फार हट्टी आणि वडिलांच्या आज्ञा मोडणारा होता. शेवटी त्याच्याकडून काही काम करून घ्यायचे असले तर त्याला जे पाहिजे त्याच्या अगदी उलट करायला सांगावे लागत असे. जर होजाने उजवीकडे जावे अशी त्याच्या वडिलांची इच्छा असली तर 'डावीकडे जा' असे त्याला सांगावे लागे.

एके दिवशी होजा आणि त्याचे वडील हे पिठाच्या चक्कीवरून घरी परत येत होते. वाटेत एक अरुंद पुल लागला. त्यांच्याबरोबर असलेल्या गाढवावर पिठाचे एक मोठे पोते बांधले असल्याने त्याला त्या पुलावरून

जाता येईना. पुलाखालील नदी फारशी खोल नव्हती. मग ठरलेल्या युक्तीप्रमाणे होजाच्या वडिलांनी होजाला बजाविले—

‘ हे पाहा ! या गाढवाला नदीतून पलीकडे मुळीच नेऊ नकोस बरं का ? ’

वडिलांचे हे शब्द ऐकल्याबरोबर होजाने गाढवाचा लगाम धरला आणि गाढवाला तो नदीतून पलीकडच्या काठाला नेऊ लागला.

त्याच्या वडिलांना दिसले की पिठाचे पोते गाढवाच्या डाव्या बाजूला जास्त खाली सरकले आहे. गाढव आणखी खोल पाण्यात गेले तर सारे पीठ भिजून जाईल म्हणून नेहमीप्रमाणे त्याने उलटा हुकूम दिला, ‘ पोरा ! ते पोतं गाढवाच्या पाठीवर मुळीच सरळ करू नकोस बरं का ! ते खाली पाण्याच्या दिशेने आणखी ओढून घे. ’

पण यावेळी नेहमीप्रमाणे उलट क्रिया करण्याऐवजी होजा वडिलांना म्हणाला, ‘ बाबा ! कैक वर्षे मी तुमची आज्ञा मोडीत आलो आहे. तुम्ही सांगितलेले कोणतेही काम मी केले नाही याबद्दल आता मला लाज वाटू लागली आहे. म्हणून यावेळी मात्र तुम्ही मला जे करायला सांगितले आहे ते खडा न् खडा मी करून दाखवीन. ’ आणि होजाने त्याप्रमाणे केले, आणि सारे पीठ भिजून चिंब झाले !

होजाच्या वडिलांनी कपाळाला हात लावला !

---

## ४७ : सुईच्या अग्रावरी वसे एक गाव !

**एकदा** एक व्यापारी एका धर्मशाळेत रात्री वस्तीला राहिला. त्या जागेच्या मालकाने त्याच्यासाठी रात्री शिजविलेली कोंबडी आणि सकाळी दोन उकडलेली अंडी तयार करून वाढली. त्या व्यापाऱ्याला

जाण्याची घाई असल्याने या जेवणाची किंमत परत प्रवासाच्या वेळी देण्याचे वचन दिले आणि मालकानेही याला रुकार दिला.

तीन महिन्यानंतर तो व्यापारी पुन्हा त्या धर्मशाळेत उतरला आणि त्या मालकाने पूर्वीप्रमाणे रात्री कोंबडी आणि सकाळी अंडी असा बेत केला. ही दोन जेवणे आणि यापूर्वीची दोन जेवणे मिळून किती आकार झाला असे त्या व्यापाऱ्याने मालकाला विचारले. सर्व मिळून फार तर पाच दहा रुपये होतील असा त्याचा अंदाज होता.

पण त्या मालकाने दोनशे रुपये मागितले. व्यापारी आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'दोनशे रुपये? हे कसं शक्य आहे.'

तो हिकमती मालक म्हणाला, 'या रकमेतील बराचसा भाग व्याजाचा आहे. आता असं बघा, माझ्याकडून तीन महिन्यांपूर्वी (मुदतीसाठी) तुम्ही एक कोंबडी आणि दोन अंडी घेऊन गेलात हे खरं ना?'

'आता त्या मुदतीत ती कोंबडी मोठी होऊन तिने कितीतरी अंडी दिली असती. त्या अंड्यांची पिले झाली असती आणि त्या पिलांच्या कोंबड्या होऊन त्यांनी अंडी घातली असती, त्यांच्या पुन्हा कोंबड्या झाल्या असत्या. या सर्व कोंबड्या आणि अंड्यांची किंमत सहज दोनशे रुपये होईल. खरं तर मी मागतो ती किंमत कमीच आहे असं मला वाटतं.'

त्या व्यापाऱ्याने रागाच्या भरात ही रक्कम देण्याचे नाकारले आणि त्या मालकाने त्याच्यावर फिर्याद लावली. न्यायाधीश त्याचा मित्रच होता म्हणून त्याने त्या व्यापाऱ्याला ती रक्कम भरण्याचा हुकूम दिला.

तो व्यापारी फार निराश झाला. त्याच्या एक मित्राने त्याला नसरद्दिन होजाचा सल्ला घेण्यास सुचविले. आणि होजाने त्यास मदत करण्याचे कबूल केले. इकडे त्या व्यापाऱ्याने अर्ज केला की हुकुमाची अंमलबजावणी होण्यापूर्वी आपल्या एका महत्त्वाच्या साक्षीदाराची तपा-

जाता येईना. पुलाखालील नदी फारशी खोल नव्हती. मग ठरलेल्या युक्तीप्रमाणे होजाच्या वडिलांनी होजाला बजाविले—

'हे पाहा! या गाढवाला नदीतून पलीकडे मुळीच नेऊ नकोस बरं का?'

वडिलांचे हे शब्द ऐकल्याबरोबर होजाने गाढवाचा लगाम धरला आणि गाढवाला तो नदीतून पलीकडच्या काठाला नेऊ लागला.

त्याच्या वडिलांना दिसले की पिठाचे पोते गाढवाच्या डाव्या बाजूला जास्त खाली सरकले आहे. गाढव आणखी खोल पाण्यात गेले तर सारे पीठ भिजून जाईल म्हणून नेहमीप्रमाणे त्याने उलटा हुकूम दिला, 'पोरा! ते पोतं गाढवाच्या पाठीवर मुळीच सरळ करू नकोस बरं का! ते खाली पाण्याच्या दिशेने आणखी ओढून घे.'

पण यावेळी नेहमीप्रमाणे उलट क्रिया करण्याऐवजी होजा वडिलांना म्हणाला, 'बाबा! कैक वर्षं मी तुमची आज्ञा मोडीत आलो आहे. तुम्ही सांगितलेले कोणतेही काम मी केले नाही याबद्दल आता मला लाज वाटू लागली आहे. म्हणून यावेळी मात्र तुम्ही मला जे करायला सांगितले आहे ते खडा न् खडा मी करून दाखवीन.' आणि होजाने त्याप्रमाणे केले, आणि सारे पीठ भिजून चिंब झाले!

होजाच्या वडिलांनी कपाळाला हात लावला!

---

## ४७ : सुईच्या अग्रावरी वसे एक गाव!

**एकदा** एक व्यापारी एका धर्मशाळेत रात्री वस्तीला राहिला. त्या जागेच्या मालकाने त्याच्यासाठी रात्री शिजविलेली कोंबडी आणि सकाळी दोन उकडलेली अंडी तयार करून वाढली. त्या व्यापाऱ्याला

जाण्याची घाई असल्याने या जेवणाची किंमत परत प्रवासाच्या वेळी देण्याचे वचन दिले आणि मालकानेही याला रुकार दिला.

तीन महिन्यानंतर तो व्यापारी पुन्हा त्या धर्मशाळेत उतरला आणि त्या मालकाने पूर्वीप्रमाणे रात्री कोंबडी आणि सकाळी अंडी असा बेत केला. ही दोन जेवणे आणि यापूर्वीची दोन जेवणे मिळून किती आकार झाला असे त्या व्यापाऱ्याने मालकाला विचारले. सर्व मिळून फार तर पाच दहा रुपये होतील असा त्याचा अंदाज होता.

पण त्या मालकाने दोनशे रुपये मागितले. व्यापारी आश्चर्यचकित होऊन म्हणाला, ' दोनशे रुपये ? हे कसं शक्य आहे. '

तो हिकमती मालक म्हणाला, ' या रकमेतील बराचसा भाग व्याजाचा आहे. आता असं बघा, माझ्याकडून तीन महिन्यांपूर्वी ( मुदतीसाठी ) तुम्ही एक कोंबडी आणि दोन अंडी घेऊन गेलात हे खरं ना ? '

' आता त्या मुदतीत ती कोंबडी मोठी होऊन तिने कितीतरी अंडी दिली असती. त्या अंड्यांची पिले झाली असती आणि त्या पिलांच्या कोंबड्या होऊन त्यांनी अंडी घातली असती, त्यांच्या पुन्हा कोंबड्या झाल्या असत्या. या सर्व कोंबड्या आणि अंड्यांची किंमत सहज दोनशे रुपये होईल. खरं तर मी मागतो ती किंमत कमीच आहे असं मला वाटतं. '

त्या व्यापाऱ्याने रागाच्या भरात ही रक्कम देण्याचे नाकारले आणि त्या मालकाने त्याच्यावर फिर्याद लावली. न्यायाधीश त्याचा मित्रच होता म्हणून त्याने त्या व्यापाऱ्याला ती रक्कम भरण्याचा हुकूम दिला.

तो व्यापारी फार निराश झाला. त्याच्या एक मित्राने त्याला नसरुद्दिन होजाचा सल्ला घेण्यास सुचविले. आणि होजाने त्यास मदत करण्याचे कबूल केले. इकडे त्या व्यापाऱ्याने अर्ज केला की हुकुमाची अंमलबजावणी होण्यापूर्वी आपल्या एका महत्त्वाच्या साक्षीदाराची तपा-

सणी व्हावी. त्याप्रमाणे न्यायाधीशाने अंमलबजावणी तीन दिवस लांबणीवर टाकली आणि फेर सुनावणीसाठी एक वेळ ठरविली.

सुनावणीची वेळ झाली तरी साक्षीदार न्यायालयात हजर झाला नाही, हे पाहून न्यायाधीशाला राग आला. होजाला घेऊन येण्यासाठी त्याने एक नोकर पाठविला आणि अखेर होजा दोन तास उशीर करून न्यायालयात आला.

न्यायाधीशाने रागाने विचारले, 'तुला इतका उशीर का झाला?'

होजा म्हणाला रावसाहेब, 'मी दिलगीर आहे. मी दिंडे करण्यासाठी काही धान्य उकडले होते पण मग मी विचार केला की तसे करण्याऐवजी हे धान्य आपण पेरावे आणि त्याच्यापासून खूपसे पीक काढावे असा विचार करून मी ते धान्य माझ्या शेतात पेरीत होतो तेव्हा तुमचा निरोप घेऊन हा माणूस आला.'

न्यायाधीश तुच्छतेने उद्‌गारला, 'दुनियेत काय एकेक मूर्ख असतात पाहा! उकडलेल्या धान्यातून कधी काही पीक येईल काय?'

होजा म्हणाला, 'शिजविलेल्या कोंबडीपासून आणि उकडलेल्या अंड्यापासून जितक्या कोंबड्या आणि अंडी निघतील तितकं पीक निघायला काही हरकत नाही, असे नाही तुम्हाला वाटत?'

यावर न्यायाधीश वरमला. आपला पूर्वीचा हुकूम रद्द करून त्याने ती फिर्याद काढून टाकली!

---

## ४८ : मौनं सर्वार्थ साधनम्

**एकदा** एका माणसाने होजाला विचारले 'सांगितलं रहस्य गुप्त ठेवू शकेल असा या गावातला एखादा माणूस तुमच्या ओळखीचा आहे काय?'

होजाने उत्तर दिले–' हे पाहा, मला फक्त एवढं कळतं की, माणसानं दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला आपल्या जवळचा माल ठेवण्याचं कोठार समजू नये. आपला माल आपल्याजवळच जास्त सुरक्षित राहतो. आपल्या जवळची रहस्ये आपल्या जवळच ठेवणं हा उत्तम मार्ग आहे!'

---

## ४९ : हे कधी होईल का?

एके दिवशी होजा आणि त्याचे मित्र हे ' शिरा ' या पक्वान्नाबद्दल बोलत होते.

होजा म्हणाला, ' मला शिरा फार आवडतो. पण आमच्या घरी तो कधीच होत नाही. '

त्याच्या मित्रांनी विचारले, ' असं का होतं? ' होजा म्हणाला, ' हे बघा, जेव्हा जेव्हा घरात पीठ असतं तेव्हा तूप नसतं. जेव्हा तूप असतं तेव्हा पीठ नसतं. '

होजाचे मित्र म्हणाले, ' काय म्हणता राव? इतक्या वर्षांत कधीही तुमच्या घरात पीठ आणि तूप एकाच वेळी कधीही नव्हतं यावर आम्ही विश्वास ठेवावा असं म्हणता का तुम्ही? '

होजा थंडपणे म्हणाला, ' हे बघा. केव्हा केव्हा असं झालं आहे खरं. पण त्याची भानगड अशी आहे की, जेव्हा तूप आणि पीठ या दोन्ही गोष्टी घरात होत्या त्यावेळी नेमका मी मात्र घरी नसे!'

---

# ५० : प्रभु तेरी महिमा । परम अपारा ॥

उन्हाळ्यातील एके दिवशी उन्हाने त्रस्त होऊन होजा आपल्या गाढवावरून खाली उतरला. वांगी लावलेल्या एका शेताच्या कडेला एक अक्रोडाचे झाड होते. त्या झाडाखाली तो पसरला; आणि पडल्या पडल्या उगीच विचार करू लागला. देवाची करणी किती विचित्र आहे पाहा ! वांग्यासारखं मोठं फळ एवढ्याशा बारीक देठाला लटकतं आणि उलट एवढ्या मोठ्या झाडाला अक्रोडासारखं लहानसं फळ येतं ! खरं म्हटलं तर, लहानशा देठाला अशी अक्रोडं लागायला पाहिजेत. आणि या मोठ्या झाडाला भली मोठी वांगी लागायला हवीत.'

आणि त्याच क्षणीं एक अक्रोड झाडावरून पडला आणि तो होजाच्या बरोबर डोक्यावर बसला.



आपले डोके चोळीत होजा खजील होऊन म्हणाला, 'जगात जे आहे ते सारं चांगल्यासाठीच आहे असं म्हणावं लागतं. जर एखादं भलं

मोठं वांगं या झाडाला लागलं असतं आणि ते इतक्या उंचावरून माझ्या टाळक्यावर पडलं असतं तर माझा कपाळमोक्षच झाला असता !

## ५१ : या लाडक्या मुलांनो !

एके दिवशी होजाने आपल्या गाढवावर दोन मोठ्या टोपल्या भरून द्राक्षे घेतली आणि तो बाजाराला निघाला. वाटेने जात असता त्याला त्याच्या ओळखीची काही मुले भेटली. इतकी द्राक्षे पाहून ती आनंदाने नाचू बागडू लागली.

ती म्हणाली, ‘ काका ! आम्हाला द्राक्षं ! आम्हाला द्राक्षं ! ’

होजाने विचार केला. ‘ ही पोरं तर चांगली दहा बारा आहेत. अन् ओळखीची असल्यानं त्यांना नाहीं म्हणणंही बरं दिसणार नाही. बरं प्रत्येकाला जरी एक द्राक्ष दिलं तरी ती बरीच होतील. आणि माझा तोटा होईल. म्हणून त्याने तीन लहान द्राक्षं असलेली एक डहाळी तोडली आणि ती त्या मुलांच्या म्होरक्याला दिली. इतर मुले ओरडू लागली. ‘ हे काय ? काका आम्हाला नाही काय ? ही एवढीच द्राक्षं ?’ होजाने त्यांची समजूत घातली. तो म्हणाला, ‘ हे बघा बाळांनो ! या टोपलीतल्या सर्व द्राक्षांची चव एकच आहे. मग ती एक खाल्ली काय शंभर खाल्ली काय ? हा मुलगा खाऊन तुम्हाला त्यांची चव सांगेल. ’

## ५२ : वाऱ्यावरची वरात !

एके दिवशी खूप वारा सुटला होता. कर्मधर्म संयोगाने तेव्हा होजा एका उंटाच्या पाठीवर बसून प्रवासाला निघाला होता. न्याहारीसाठी

त्याने बारीक लाही पीठ असलेली वाटी बाहेर काढली पण ते पीठ तोंडात टाकण्यासाठी त्याने बोटांनी घास वर केला की, ते पीठ त्याच्या तोंडात पडण्याआधीच वाऱ्याने कुठल्या कुठे उडून जाई.


जवळूनच होजाचा एक मित्र चालला होता. त्याने विचारले, ‘ होजा ! काय खाणं चाललं आहे तुझं वरं ? ’

होजा कुरकुरत म्हणाला, ‘ हाच प्रकार चालू राहिला तर वाऱ्याशिवाय दुसरं काहीच खायला मिळणार नाही मला ! ’

---

## ५३ : हे फळ काय मम तपाला ?

**एका** हिवाळ्यात होजाची परिस्थिती फार ओढगस्तीची झाली. होईल तितकी काटकसर करावी म्हणून त्याने ठरविले की, आपल्या गाढवाला थोडे कमी जव चारावे. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी गाढवाच्या नेहमीच्या चंदीतून त्याने मुठभर जव काढून घेऊन बाकीचे खाणे गाढवापुढे ठेवले. गाढवाने ते समाधानाने खाल्ले. दुसऱ्या दिवशी दोन



मुठी जव कमी केले. तरीही गाढव पूर्वीइतकेच समाधानी दिसत होते.

असा प्रकार काही दिवस चालल्यावर नेहमीपेक्षा अर्धी चंदीच त्या गाढवाला मिळू लागली. आता ते गाढव जरा सुस्त दिसे खरे पण होजाला वाटले की, ते अजून पूर्वीइतकेच धडधाकट आहे असे समजून त्याने पूर्वीचाच, धान्य कमी करण्याचा प्रकार चालू ठेवला. अखेर त्याची चंदी एक मूठ धान्यावर येऊन ठेपली. तेव्हा ते त्या धान्याला तोंडही लावीना.

एके दिवशी सकाळी होजा तबेल्यात जाऊन पाहतो तो ते गाढव मरून पडले होते. होजा म्हणाला, ' केवढें दुर्दैव हे ! गाढवाला खरी तपश्चर्या कशी असते ते मी जवळ जवळ पूर्णपणे शिकविले होते. पण ते त्याच्या अंगी पूर्णपणे येण्याच्या ऐन मोक्याच्या वेळी त्याला मृत्यूने मध्येच गाठून सारी घाण केली. '

---

## ५४ : माझे आहे मजपाशी !

एके दिवशी होजा काही झाडांची कलमे दिवसभर आपल्या बागेत लावीत होता.

संध्याकाळ झाली तेव्हा घाईघाईने ती सारी कलमे उपटून पोत्यात घालून त्याने घरात आणली.

ते पाहिल्यावर त्याच्या एका शेजाऱ्याने विचारले, ' अरे होजा ! हे काय भलतंच करीत आहेस तू ?'

होजा गंभीरपणे उत्तरला, ' काय करावं, काळ तर मोठा कठीण आला आहे. केव्हा अन् कसली चोरी होईल त्याचा नेम राहिला नाही. म्हणून मी म्हटलं आपली सारी चीजवस्त आपल्या डोळ्यासमोर असलेली बरी. म्हणून ही किंमती कलमं आत आणली झालं ! '

---

## ५५ : श्रेष्ठ कोण ? बायको की गाढव ?

एके दिवशी होजाची पत्नी वारली. पण त्याने दुःखाचे काहीच चिन्ह दाखविले नाही.

त्यानंतर काही दिवसांनी त्याचे गाढव मेले तेव्हा मात्र त्याने मोठ्याने गळा काढला आणि तो आपला ऊर बडवून घेऊ लागला.

हे पाहून त्याच्या मित्राने विचारले, 'अरे होजा, तुझी प्रत्यक्ष बायको वारली तेव्हा तुला काहीच दुःख झालेलं दिसलं नाही. अन् आता हे क्षुल्लक गाढव मेलं तर तुझ्या डोळ्याला धारा लागल्या आहेत ही काय भानगड आहे बुवा ?'

होजा म्हणाला, 'मित्रा ! माझी बायको वारल्यावर अनेक लोकांनी माझ्या भेटीस येऊन माझे सांत्वन केले. ते म्हणाले, 'अहो त्यात काय आहे, या बायकोपेक्षा अधिक चांगली बायको आणून देऊ तुम्हाला पण माझं हे गाढव मेल्यावर मात्र कोणीही माझ्याकडे येऊन दुसरं गाढव आणून देण्याची तयारी दाखविली नाही हो !' असे म्हणून होजाने पुन्हा गळा काढला.

---

## ५६ : जन खुळे नादावले

एका हिवाळ्यात सारे लोक थंडी किती कडक आहे म्हणून तक्रार करीत होते. आपल्याला शहाणा समजणारा एक माणूस होजाजवळ येऊन तुच्छतेने म्हणाला, 'या मूर्ख लोकांचं कधी समाधान म्हणून होत नाही. हिवाळा आला की, हे म्हणणार थंडी किती आहे; आणि उन्हाळा आला की हे म्हणणार, 'किती उकडतं बुवा !' हे लोक म्हणजे असेच.'

होजाने त्याला गप्प बसविण्यासाठी उत्तर दिले, 'तू म्हणतोस ते खरे आहे. पण एक गोष्ट मात्र तुझ्या लक्षात आलेली दिसत नाही. ती म्हणजे वसंत ऋतूत तू म्हणतोस तशा तक्रारी फारसे कोणी करताना दिसत नाहीत. हे खरं की नाही ?'

आणि तो अहंमन्य माणूस चूप राहिला.

---

## ५७ : नरो वा कुंजरो वा !

**एकदा** होजाचा एक मित्र एका खटल्यात गुंतून पडला होता. गव्हाच्या काही पोत्यांची ती भानगड होती. होजाने आपल्या बाजूने खोटी साक्ष द्यावी म्हणून त्या मित्राने त्याला फार गळ घातली. अखेर होजा न्यायालयात येण्यास कबूल झाला.

होजाला प्रश्न विचारल्यावर तो सारखा म्हणू लागला, 'हो त्या जवाच्या पोत्याचं असं आहे– जवाच्या पोत्याचं–'

न्यायाधीशाने शेवटी त्याला अडवून म्हटलं, 'अहो ही साक्ष **गव्हाच्या पोत्याबद्दल** चालली आहे....**जवाच्या पोत्याबद्दल नव्हे.**'

होजाने शांतपणे उत्तर दिले, 'रावसाहेब हे बघा एकदा माणसानं खोटं बोलायचंच असं ठरविले म्हणजे मग गहू काय अन् जव काय ! सारे एकच !'

---

## ५८ : शशिसूर्य प्रभा गगनाची ?

**एकदा** कोणी एकाने होजाला प्रश्न विचारला, 'काय हो ? सूर्य आणि चंद्र या दोघांपैकी अधिक उपयोग कोणाचा ?'

होजाने ताड्कन उत्तर दिले, 'अर्थात् चंद्राचा. कारण असं की,

## ५५ : श्रेष्ठ कोण ? बायको की गाढव ?

**एके** दिवशी होजाची पत्नी वारली. पण त्याने दुःखाचे काहीच चिन्ह दाखविले नाही.

त्यानंतर काही दिवसांनी त्याचे गाढव मेले तेव्हा मात्र त्याने मोठ्याने गळा काढला आणि तो आपला ऊर बडवून घेऊ लागला.

हे पाहून त्याच्या मित्राने विचारले, 'अरे होजा, तुझी प्रत्यक्ष बायको वारली तेव्हा तुला काहीच दुःख झालेलं दिसलं नाही. अन् आता हे क्षुल्लक गाढव मेलं तर तुझ्या डोळ्याला धारा लागल्या आहेत ही काय भानगड आहे बुवा ?'

होजा म्हणाला, 'मित्रा ! माझी बायको वारल्यावर अनेक लोकांनी माझ्या भेटीस येऊन माझे सांत्वन केले. ते म्हणाले, 'अहो त्यात काय आहे, या बायकोपेक्षा अधिक चांगली बायको आणून देऊ तुम्हाला पण माझं हे गाढव मेल्यावर मात्र कोणीही माझ्याकडे येऊन दुसरं गाढव आणून देण्याची तयारी दाखविली नाही हो !' असे म्हणून होजाने पुन्हा गळा काढला.

---

## ५६ : जन खुळे नादावले

**एका** हिवाळ्यात सारे लोक थंडी किती कडक आहे म्हणून तक्रार करीत होते. आपल्याला शहाणा समजणारा एक माणूस होजाजवळ येऊन तुच्छतेने म्हणाला, 'या मूर्ख लोकांचं कधी समाधान म्हणून होत नाही. हिवाळा आला की, हे म्हणणार थंडी किती आहे; आणि उन्हाळा आला की हे म्हणणार, 'किती उकडतं बुवा !' हे लोक म्हणजे असेच.'

होजाने त्याला गप्प बसविण्यासाठी उत्तर दिले, 'तू म्हणतोस ते खरे आहे. पण एक गोष्ट मात्र तुझ्या लक्षात आलेली दिसत नाही. ती म्हणजे वसंत ऋतूत तू म्हणतोस तशा तक्रारी फारसे कोणी करताना दिसत नाहीत. हे खरं की नाही?'

आणि तो अहंमन्य माणूस चूप राहिला.

## ५७ : नरो वा कुंजरो वा !

**एकदा** होजाचा एक मित्र एका खटल्यात गुंतून पडला होता. गव्हाच्या काही पोत्यांची ती भानगड होती. होजाने आपल्या बाजूने खोटी साक्ष द्यावी म्हणून त्या मित्राने त्याला फार गळ घातली. अखेर होजा न्यायालयात येण्यास कबूल झाला.

होजाला प्रश्न विचारल्यावर तो सारखा म्हणू लागला, 'हो त्या जवाच्या पोत्याचं असं आहे– जवाच्या पोत्याचं–'

न्यायाधीशाने शेवटी त्याला अडवून म्हटलं, 'अहो ही साक्ष **गव्हाच्या पोत्याबद्दल** चालली आहे....**जवाच्या पोत्याबद्दल नव्हे.**'

होजाने शांतपणे उत्तर दिले, 'रावसाहेब हे बघा एकदा माणसानं खोटं बोलायचंच असं ठरविले म्हणजे मग गहू काय अन् जव काय! सारे एकच!'

## ५८ : शशिसूर्य प्रभा गगनाची ?

**एकदा** कोणी एकाने होजाला प्रश्न विचारला, 'काय हो? सूर्य आणि चंद्र या दोघांपैकी अधिक उपयोग कोणाचा?'

होजाने ताड्कन उत्तर दिले, 'अर्थात् चंद्राचा. कारण असं की,

सूर्य दिवसा प्रकाश देतो त्या वेळी आधीच खूपसा उजेड असतो. पण चंद्र मात्र रात्री अंधार असतानाच प्रकाश देतो. मग सूर्यापेक्षा चंद्राचाच आपल्याला अधिक उपयोग आहे, हे स्पष्ट होत नाही का?'

---

## ५९ : दिसे अजब कट्यार

एके दिवशी होजा बाजारात गेला असता त्याला एक मौल्यवान कट्यार दिसली, तिची किंमत सुमारे चार-पाचशे रुपये ठेवलेली होती. होजाने ती कट्यार खूप बारकाईने पाहिली पण तिची किंमत इतकी अधिक का असावी हे त्याला कळेना. जवळच्या कॉफीच्या दुकानात गप्पा मारीत बसलेल्या काही लोकांना त्याने याचे कारण काय असेल म्हणून विचारले.

त्यातला एक म्हणाला, 'अहो, या कट्यारीचा एक विशेष आहे, ती घेऊन तुम्ही शत्रूवर चाल केलीत तर तिची लांबी आहे तिच्या-पेक्षा पाचपट झालेली वाटू लागते.'

हे ऐकून होजाने घरी जाऊन आपल्या स्वयंपाकघरातला लोखंडी चिमटा घेतला. बाजारात त्याच दुकानाजवळ जाऊन तो ओरडू लागला, 'आठशे रुपयाला कोणाला हवा आहे का?'

कॉफीच्या दुकानात बसलेल्या त्या लोकांनी होजाला हाक मारून तपासण्यासाठी तो चिमटा मागून घेतला. 'ते म्हणाले, अरे, हा चिमटा तर अगदी साधा आहे. त्याच्यासाठी एवढी मोठी रक्कम का मागतोस तू?' होजा म्हणाला, 'अहो, या चिमट्याचाही एक विशेष आहे. हा चिमटा हातात घेऊन, माझी बायको रागावून जेव्हा माझ्या अंगावर धावून येते तेव्हा तर हा चिमटा आहे त्याच्यापेक्षा दसपट लांब दिसू लागतो. पाचपट लांबीच्या कट्यारीचं काय घेऊन बसलात?'

## ६० : मसाला-मुर्गी

खेड्यातला एक गप्पीदास नेहमी दुसऱ्याच्या खर्चाने मौज-मजा करीत असे; उसनवारी करीत असे. होजाला रस्त्यात थांबवून तो त्याला म्हणाला, 'अहो एक छानशी मसाला भरलेली कोंबडी आताच एका ताटातून तिकडून गेली.' होजा तुटकपणे म्हणाला, 'मग त्याच्याशी माझा काय संबंध?'

तो गप्पीदास जिभल्या चाटीत म्हणाला, 'अहो, पण ते कोंबडीचं ताट तुमच्याच घरात गेलंय आता. मग?' असे म्हणून तो होजाकडे आशाळभूतपणे पाहू लागला. होजाने त्याला कटविले, 'असेल! पण त्याचा तुमच्याशी काय संबंध?' असे म्हणून तो पुढे चालू लागला.

---

## ६१ : मी तो हमाल, भारवाही

एके दिवशी होजाने आपली पिशवी एका हमाला जवळ दिली. आणि तो हमालामागून बाजारातून निघाला. बाजारात फारच गर्दी होती. त्या गर्दीत तो हमाल दिसेनासा झाला. होजाने सगळीकडे शोधाशोध केली. पण त्याला तो हमाल दिसला नाही आणि त्याची पिशवीही सापडली नाही. यानंतर एक आठवडा उलटल्यावर होजा आपल्या मित्रासह बाजारातून चालला असता, एकाएकी तो मित्र म्हणाला, 'होजा! तू ज्याचा शोध करीत होतास तो हमाल चालला आहे बघ.'

हे एकून होजा चट्कन शेजारच्या गल्लीत वळून लपून बसला. त्याच्या मागे जाऊन त्याच्या मित्राने विचारले, 'अरे होजा! तू का लपला आहेस? गेला आठवडाभर तू या हमालाच्या शोधात होतास.

आणि आता तुला तो सापडला असता तूच पळून जातोस हे कसे काय ?'

होजा म्हणाला, 'अरे बाबा, मी इतका मूर्ख नाही. या हमालानं आता मला पाहिलं तर तो म्हणेल, 'ही तुमची पिशवी मी आठवडाभर वागवली आहे. त्याची आठवड्याची मजुरी टाका.' म्हणून नको तो व्याप.'

---

## ६२ : वैद्यराज, नमस्तुभ्यम्

एके दिवशी होजाच्या पत्नीला बरे वाटत नसल्याने तिने होजाला एखादा वैद्य घेऊन येण्यास सांगितले. होजा घाबरला आणि दारातून निघून पळतच वैद्याकडे जाऊ लागला. तेवढ्यात घराच्या खिडकीतून डोके बाहेर काढून त्याची बायको त्याला म्हणाली, 'अहो, देवाची कृपा, आता मला पुष्कळ बरं वाटतंय. आता वैद्याला बोलावण्याची गरज नाही.'



पण होजा पुढे धावतच होता. तो थेट वैद्याच्या दाराशी जाऊन थांबला आणि त्याने दारावर थाप मारली. धापा टाकीत तो म्हणाला, ' वैद्यबुवा, माझ्या बायकोला बरं वाटत नव्हतं म्हणून तिनं मला तुम्हाला बोलवून आणायला पाठविलं होतं....पण हो ! आता आठवलं मी तुमच्याकडे येत असता तिला एकाएकी बरं वाटू लागलं. आणि तिनं निरोप सांगितला की, आता वैद्यबुवांना बोलवायाचे काही कारण नाही म्हणून मी तुम्हाला घाईघाईनं सांगायला आलो की, तुम्ही आमच्याकडे येण्याची जरूर नाही ! '

---

## ६२ : समसमा संयोग की जाहला

एकदा होजाने आपले गाढव विकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ते गाढव घेऊन त्याने एका दलालाजवळ विक्रीसाठी दिले. व्यापाऱ्याने लगेच गिऱ्हाईकाजवळ त्या गाढवाचे गुणवर्णन करण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, ' या ! या ! या उमद्या जनावराकडे बघा. हे सिंहासारखे बळकट, एखाद्या कोकरासारखे गरीब, गरुडासारखे वेगवान आणि जॉब या प्रेषितासारखे सोशिक आहे. बोला तुमचा सवाल ! '

विक्रेत्याच्या वर्णनाने मोहित होऊन गिऱ्हाईक सवाल बोलू लागले आणि भराभर त्या गाढवाची किंमत चढत गेली.

हे पाहून होजाही मनात म्हणू लागला, ' काय देवाची करणी पाहा. माझं हे गाढव लाखात एक आहे असं दिसतं.' असे म्हणून तो स्वतःही इतरांबरोबरच चढत्या किंमतीने सवाल बोलू लागला. अखेर इतर सर्वांपेक्षा वरचढ किंमतीला त्याने स्वतःचेच गाढव विकत घेतले. आश्चर्यचकित झालेल्या व्यापाराच्या हातात रक्कम कोंबून ते गाढव

बरोबर घेऊन आपण केवढा मोठा सौदा केला हे बायकोला सांगण्यासाठी तो घराकडे निघाला.

होजाची बायको देखील त्याच्यापेक्षा तसूभराने कमी नव्हती. होजा आल्याबरोबर ती त्याला आधी स्वतःचाच पराक्रम सांगू लागली. ती म्हणाली, 'आज किनई दारावर एक लोणीवाला आला होता. तेव्हा मी शेरभर लोणी घेतलं. तो ते लोणी पारड्यात घालून वजन करीत होता तेवढ्यात मी माझी सोन्याची बांगडी वजन असलेल्या पारड्यात हळूच ठेवून दिली अन् अशी मज्जा झाली की, शेराहून कितीतरी अधिक लोणी मला मिळालं. मग मी काय केलं, ते लोण्याचं भांडं उचललं अन् धूम ठोकली घरात अन् घेतलं दार लावून. माझी बांगडी केव्हा तरी त्याला दिसेल आणि मी त्याला वजनात फसवलं हे पुढे त्याच्या केव्हा तरी लक्षात येईल, त्याआधीच मी माझं काम उरकून घेतलं. आहे की नाही माझी चतुराई?'

होजा आनंदाने म्हणाला, 'खरोखर परमेश्वराने आपल्याला एवढी अक्कल दिली याबद्दल त्याचे आभारच मानायला पाहिजेत. आपल्या जोडीला कुठे तोड मिळायची नाही!'

---

## ६४ : साहे ओझे त्यासी । तेच द्यावे

**एकदा** होजाने बाजारात जाऊन एक पोतंभर भाजी विकत घेतली. ते पोते खांद्यावर घेऊन तो आपल्या गाढवावर बसला. आणि घराकडे निघाला.

रस्त्यात त्याला त्याचे काही मित्र भेटले. ते म्हणाले, 'अरे होजा! हे एवढं मोठं पोतं तू एका हाताने खांद्यावर सारखा सावरतोस आणि

दुसऱ्या हातानं गाढवाला वळवीत जातोस. तर ते पोतं गाढवाच्या पाठीवर बांधून टाकून आरामात का जात नाहीस ? '

होजा हसत म्हणाला, ' वा राव ! बरेच आहात की, माझं एकट्याचं ओझं या गाढवाला झेपेनासे झालं आहे. म्हणून मी ठरविलं की, ते जड पोतं स्वतःच्याच खांद्यावर वाहून न्यावं म्हणजे आपलं गाढवाला जादा वजन वाटायला नको ? खरं का नाही ? '

---

## ६५ : जशास तसे

एके दिवशी होजा ' हमाम '—म्हणजे सार्वजनिक स्नानगृहात गेला. त्याचा सामान्य वेष पाहून तेथील नोकराने त्याला एक फाटका पंचा आणि जीर्ण झालेला अंग पुसण्याचा रुमाल दिला. कोणीच त्याच्याकडे लक्ष दिले नाही.

आपले स्नान आटपून होजा बाहेर पडला. जाताना त्यानं चांगली तीन रुपयांची बक्षिसी त्या नोकराच्या हातावर ठेवली. ती पाहून त्या नोकराला आश्चर्य वाटले आणि मोठा आनंदही झाला.

आठवड्यानंतर होजा पुन्हा त्या हमाममध्ये गेल्यावर लगबगीने त्या नोकराने अगदी उत्तम असे वस्त्र आणि कशीदा काढलेला मऊ अंग पुसण्याचा रुमाल त्याला दिला. गरम पाणी, तेल, अंग रगडणे वगैरे सारे विलासी सोपस्कार करून त्याची अगदी राजासारखी तैनात ठेवली. स्नान वगैरे आटपून बाहेर पडत असताना होजाने त्या नोकराच्या हातावर बक्षिस म्हणून फक्त पावली ठेवली.

हे पाहून तो नोकर उद्गारला, ' रावसाहेब ! याचा काय अर्थ ? '

होजा म्हणाला, ' अरे यात नवल वाटण्यासारखं काहीच नाही.

आता मी दिलेली बक्षिसी ही माझ्या मागच्या आठवड्याच्या स्नानाची आहे आणि मागच्या वेळी दिलेली बक्षिसी आजच्या स्नानाची आहे असं समज म्हणजे झालं ! '

## ६६ : आप लिखे -- खुदा पढे

**एकदा** एक निरक्षर मित्र होजाकडे येऊन बगदाद येथील आपल्या मित्राला त्याने पत्र लिहावे म्हणून गळ घालू लागला. होजा म्हणाला, ' बाबा रे ! बगदादला जायला मला वेळ नाही. '

त्याचा मित्र गोंधळून म्हणाला, ' अरे, तुला बगदादला जायला कोण सांगतंय् ? मी तुला नुसतं एक पत्र लिहायला सांगतोय् ! '

होजा शांतपणे म्हणाला, ' असं पाहा ! माझं हस्ताक्षर इतकं वाईट आहे की, मी लिहिलेलं वाचण्यासाठी माझी स्वतःची मदत घ्यावी लागेल. म्हणून मला तिथं जाणं अवश्य ठरेल.'

## ६७ : चंद्रकिरणांचा झोला

**एके** रात्री होजा बिछान्यात झोपला असता एक चोर छपरावर चढला आहे, हे त्याच्या लक्षात आले. मग आवाज चढवून तो आपल्या बायकोला सांगू लागला, ' अग, आज एक गंमत सांगतो तुला. मी घरी आलो तर दार लागलं होतं, तुला माझी हाक ऐकू आली नाही. मी काय केलं म्हणून सांगू, माझ्याजवळ महाप्रतापी मंत्र आहे तो असा—तो मंत्र मी म्हटला, चंद्र किरणाचा दोर धरून डोळे मिटले अन् पहातो तो घरात पोचलो की. '

त्या चोराने होजाचे बोलणे ऐकले. तो मंत्रही त्याने उच्चारला आणि दोन हातात दोरासारखे चांदणे पकडून छपराखाली उडी मारली. तो खाली आला खरा पण एवढ्या जोराने आपटला की त्याची हाडेच मोडली. त्यात होजाने त्याला पकडून चांगले बदडून काढले. तो म्हणाला, 'अग ए, या चोराला बांधायला एक दोर घेऊन ये.' तो चोर कण्हत म्हणाला, 'अहो गुरुजी दोर कशाला? तुमचा मंत्र भलताच प्रतापी असला पाहिजे. नाहीतर त्यावर विश्वास ठेवणारा मी तरी महामूर्ख असलो पाहिजे!'

---

## ६८ : तुम्ही आम्ही एक। कंठाळीला मेख॥

**एके** दिवशी एका शेजाऱ्याने होजाला विचारले, 'काय हो मी ऐकतो की, तुमच्याजवळ चाळीस वर्षांचा जुना, बहुमोल आणि औषधी असा शिरका आहे हे खरं काय?'

होजा म्हणाला, 'होय, आहे खरा.'

तो शेजारी म्हणाला, 'मग मला त्यातला थोडा द्या वरं!'

होजा म्हणाला, 'तो मला देता येत नाही. कारण तो तत्त्वाचा प्रश्न आहे.' तो शेजारी उसळला, 'काय राव, एवढासा शिरका देण्याची बात, अन् त्यात कसलं आलं आहे तत्त्व?'

होजाने शांतपणे म्हटले, 'गोष्ट अगदी उघड आहे. तुमच्यासारख्या प्रत्येक मागणाऱ्याला जर मी ही वस्तु देत गेलो असतो तर हा चाळीस वर्षांचा जुना शिरका माझ्याजवळ राहिलाच नसता!'

---

आता मी दिलेली बक्षिसी ही माझ्या मागच्या आठवड्याच्या स्नानाची आहे आणि मागच्या वेळी दिलेली बक्षिसी आजच्या स्नानाची आहे असं समज म्हणजे झालं ! '

## ६६ : आप लिखे -- खुदा पढे

**एकदा** एक निरक्षर मित्र होजाकडे येऊन बगदाद येथील आपल्या मित्राला त्याने पत्र लिहावे म्हणून गळ घालू लागला. होजा म्हणाला, ' बाबा रे ! बगदादला जायला मला वेळ नाही. '

त्याचा मित्र गोंधळून म्हणाला, ' अरे, तुला बगदादला जायला कोण सांगतंय् ? मी तुला नुसतं एक पत्र लिहायला सांगतोय् ! '

होजा शांतपणे म्हणाला, ' असं पाहा ! माझं हस्ताक्षर इतकं वाईट आहे की, मी लिहिलेलं वाचण्यासाठी माझी स्वतःची मदत घ्यावी लागेल. म्हणून मला तिथं जाणं अवश्य ठरेल.'

## ६७ : चंद्रकिरणांचा झोला

**एके** रात्री होजा बिछान्यात झोपला असता एक चोर छपरावर चढला आहे, हे त्याच्या लक्षात आले. मग आवाज चढवून तो आपल्या बायकोला सांगू लागला, ' अग, आज एक गंमत सांगतो तुला. मी घरी आलो तर दार लागलं होतं, तुला माझी हाक ऐकू आली नाही. मी काय केलं म्हणून सांगू, माझ्याजवळ महाप्रतापी मंत्र आहे तो असा--तो मंत्र मी म्हटला, चंद्र किरणाचा दोर धरून डोळे मिटले अन् पहातो तो घरात पोचलो की. '

त्या चोराने होजाचे बोलणे ऐकले. तो मंत्रही त्याने उच्चारला आणि दोन हातात दोरासारखे चांदणे पकडून छपराखाली उडी मारली. तो खाली आला खरा पण एवढ्या जोराने आपटला की त्याची हाडेच मोडली. त्यात होजाने त्याला पकडून चांगले बदडून काढले. तो म्हणाला, 'अग ए, या चोराला बांधायला एक दोर घेऊन ये.' तो चोर कण्हत म्हणाला, 'अहो गुरुजी दोर कशाला? तुमचा मंत्र भलताच प्रतापी असला पाहिजे. नाहीतर त्यावर विश्वास ठेवणारा मी तरी महामूर्ख असलो पाहिजे!'

---

## ६८ : तुम्ही आम्ही एक। कंठाळीला मेख ॥

एके दिवशी एका शेजाऱ्याने होजाला विचारले, 'काय हो मी ऐकतो की, तुमच्याजवळ चाळीस वर्षांचा जुना, बहुमोल आणि औषधी असा शिरका आहे हे खरं काय?'

होजा म्हणाला, 'होय, आहे खरा.'

तो शेजारी म्हणाला, 'मग मला त्यातला थोडा द्या बरं!'

होजा म्हणाला, 'तो मला देता येत नाही. कारण तो तत्त्वाचा प्रश्न आहे.' तो शेजारी उसळला, 'काय राव, एवढासा शिरका देण्याची बात, अन् त्यात कसलं आलं आहे तत्त्व?'

होजाने शांतपणे म्हटले, 'गोष्ट अगदी उघड आहे. तुमच्यासारख्या प्रत्येक मागणाऱ्याला जर मी ही वस्तु देत गेलो असतो तर हा चाळीस वर्षांचा जुना शिरका माझ्याजवळ राहिलाच नसता!'

---

# ६९ : तुझी रे सारी उलटी तऱ्हा !

एके दिवशी होजा आपल्या शिष्यांना मशिदीत घेऊन जात होता. त्या वेळी तो आपल्या गाढवावर बसून पुढे झाला. पण तो गाढवाच्या



शेपटीकडे तोंड करून बसला. जाता जाता शिष्यांनी त्याला विचारले, 'गुरुजी, तुम्ही असे विचित्र स्थितीत का बसला आहात ?'

होजा म्हणाला, 'हे पाहा, मी असा बसलो नाही तर तुम्ही सारे माझ्या पाठीमागे राहाल आणि मग तुमच्यावर लक्ष कोण ठेवणार ? बरं, तुम्हाला पुढे ठेवून मी मागून आलो तर सारे म्हणणार की, अहा रे गुरुजी ! हे मागे अन् त्यांचे शिष्यच त्यांच्यापुढे गेले. अशा बसण्याने मात्र दोन्ही हेतू साध्य होतात !'

# ७० : मरण बरे बा, दरिद्रता खोटी

**रमजान** महिन्याचे उपवास संपल्यावर होजा नेहमीप्रमाणे विद्वान् धर्मगुरूंना देण्यात येणारी दक्षिणा गोळा करण्यासाठी बाहेर पडला. बरीच पायपीट केल्यावर, रिकाम्या हाताने, रिकाम्या पोटाने तो अक–शहिर या गावात बरीच रात्र झाल्यावर येऊन पोचला. तेथील एका श्रीमंत घरंदाज नागरिकाच्या देवडीवर त्याने तशीच तळमळत रात्र काढली. सकाळ झाल्यावर त्या गृहस्थाने होजाला बोलावून कुराणातील काही भाग वाचून दाखविण्यास सांगितले. होजाने तसे केले. त्याचे वाचन संपल्यावर त्या गृहस्थानेही तोच भाग ऐटीने फाडफाड वाचून दाखविला. त्यानंतर त्याने होजाला काही कवितेच्या ओळी लिहिण्यास सांगितले. होजाने तसे केल्यावर त्या गृहस्थानेही त्याच ओळी मोठ्या फर्ड्या अक्षरांत लिहून दाखविल्या.

नंतर तो गृहस्थ होजाला ऐटीने म्हणाला, ' बघा आता ! मी तुमच्या-सारख्या विद्वानाइतकाच सफाईने वाचू, लिहू शकतो. मला माहित आहे की, आता तुम्ही माझ्याजवळ दक्षिणा मागणार. पण मी ती का द्यावी ? खरं म्हटलं तर या बाबतीत आपल्या दोघांची बरोबरीच आहे.'

होजाने एक उसासा टाकून म्हटले–

' तुम्हाला लिहिता वाचता येत आहे ही गोष्ट खरी, पण एवढ्याने तुमची माझी बरोबरी होत नाही. '

त्या गृहस्थाने रागाने विचारले, ' ते कसं ? '

होजा उदासपणे विटून म्हणाला, ' हे बघा श्रीमंत ! माझ्यासारखी तुम्ही तीस मैलाची पायपीट करून दमून थकून रिकाम्या हाताने, रिकाम्या पोटाने अगदी विटून घरी आलात तरच माझी बरोबरी होईल.' यावर तो श्रीमंत विरमला हे सांगणे नकोच.

## ७१ : खेड्यामधले घर कौलारू

एके दिवशी भल्या पहाटेस होजाच्या खिडकीखाली गाडीवानांचे आवाज ऐकू आले. त्यावरून होजाला कळले की, ही एक गाडी सिक्री हिस्मार या आपल्या जन्मग्रामी चालली आहे. यावर तो इतका उत्सुक झाला की अंगावर काही वस्त्र नसता तसाच उडी मारून त्या गाडीत बसला. होजाच्या विद्वत्तेबद्दल या सर्व लोकांना आदर असल्याने कोणी काहीही बोलण्यास धजेना.

सिक्री-हिस्मार या गावाच्या वेशीजवळ आल्यावर गाडीवानाने होजाच्या आगमनाची वातमी एका सोबत्याबरोबर गावात पाठविली. गावातील शेतकरी जमून मोठ्या आनंदाने होजाचे स्वागत करण्यासाठी बाहेर धावले. पण गाडीत बसलेला उघडा वागडा होजा पाहून त्यांना धक्काच बसला. त्यांनी विचारले, ‘ होजाजी, हा काय प्रकार आहे ?’

खरी गोष्ट अशी होती की, या फुकट प्रवासाची संधी चालून आली म्हणून होजा इतक्या गडबडीने उघडाच गाडीत चढला होता परंतु ही गोष्ट लपवून तो गावकऱ्यांना म्हणाला, ‘ गाववाले ! काय सांगू तुम्हाला ! तुमची भेट होणार या विचारानेच मी इतका बेभान झालो होतो की त्या बेहोषीच्या भरात अंगावर कपडे आहेत की नाहीत याचीही मला शुद्ध राहिली नाही !’

---

## ७२ : भट समरि जरी तू ! मी महावादी जेता ! !

एके दिवशी तैमूरलंगाने मुद्दाम कुचेष्टा करण्यासाठी होजाला आपल्या-बरोबर पोलोचा खेळ खेळण्यासाठी बोलावणे धाडले. या खेळासाठी

अगदी चपळ आणि वेगवान् किंमती घोड्याची आवश्यकता असते. बिचाऱ्या होजाजवळ असला घोडा कुठून असणार? तो आपला एका थोराड बैलावरच बसून आला.

हे दृश्य पाहून क्रीडांगणावरील सारे प्रेक्षक हसू लागले.

तैमुरलंगही उपहासाने म्हणाला, 'अरे, होजा, या खेळासाठी एखादा चपळ वेगवान् पक्ष्यासारखा घोडा लागतो अन् तू या डुलणाऱ्या बैलावर का बसून आला आहेस?'

होजाला अगदी लाजल्यासारखे झाले खरे, तरीही त्याने तोडीस तोड उत्तर दिले. महाराज, 'हा खेळ खेळल्याला मला पंधरा वर्षे झाली. पण त्यावेळी मी आता ज्या बैलावर बसलो आहे तो अगदी लहान वयाचा होता, आणि चपळ तर इतका की, एखाद्या बहिरी ससाण्याला देखील त्याला मागे टाकता आले नसते आणि आज त्याच बैलावर मी पुन्हा बसून आलो आहे!'

---

## ७३ : नोहे हा पवन, जवन वारु भासतो!

**दुसऱ्या** एका प्रसंगी तैमूरलंगाने होजाला शिकारीसाठी बोलाविले व त्याला एक मरतुकडे घोडे देऊन आपल्याबरोबर घेतले. हे शिकारी थोडे दूर जातात तोच इतक्या जोराचा पाऊस सुरू झाला की, साऱ्यांनी घोड्यांची तोंडें मागे वळविली आणि ते सारे दरबारात परत गेले. होजाच्या घोडयाला तितक्या वेगाने धावत येईना. त्याच्या ध्यानात आले की, आपण असे रखडत निघालो तर आपले कपडे भिजून चिंब होतील. म्हणून त्याने ते कपडे काढून आपल्या खोगिराखाली ठेवले. होजा दरबारात येईपर्यंत पाऊस थांबला होता. तो खाली उतरला आणि नीट कपडे करून तैमूरलंगाकडे गेला. तैमूरलंगाने पाहिले तेव्हा त्याच्या

लक्षात आले की, साऱ्या मानकऱ्यांपैकी न भिजलेला माणूस म्हणजे एकटा होजाच होय. त्याने विचारले, 'काय रे होजा, आम्ही सारे भिजलो आणि तू तेवढा कोरडा कसा?'

होजा म्हणाला 'महाराज! ही सारी करणी तुम्ही मला दिलेल्या उत्तम घोड्याची. मी त्याला एकदा नुसती टाच मारण्याचा अवकाश की, तो वायूवेगाने असा धावला की, पावसाचा एक थेंबही त्याच्या माझ्यावर पडला नाही.'

तैमूरलंगाला याचे फार आश्चर्य वाटले आणि त्याने होजाच्या घोड्याला आपल्या सर्वात उत्तम तबेल्यात ठेवून त्याची उत्कृष्ट बड-दास्त ठेवण्यास फर्माविले.

काही दिवसानंतर तैमूरने दुसऱ्या एका शिकारीचा बेत आखला आणि होजाला पुन्हा बोलावणे पाठविले. मात्र यावेळी तैमूरलंगाने होजाचा घोडा स्वतः घेतला. कर्मधर्मसंयोगाने या खेपेसही पुन्हा जोराचा पाऊस आला. आता होजा इतर दरबारी लोकांबरोबर भरधाव घोड्या-वर दरबारात परत आला. इकडे तैमूर मात्र त्या मरतुकड्या घोड्यावर पावसात चिंब भिजत रखडत रखडत बऱ्याच वेळाने परत आला. रागाने अगदी धुमसतच तो ओरडला, 'ए होज्या! मला का खोटं सांगितलंस? या मरतुकड्या घोड्यामुळे मला अगदी सचैल स्नान घडलं आहे.' होजा म्हणाला 'पण महाराज, हा सारा दोष आपलाच आहे. पाऊस आल्याबरोबर माझे कपडे मी खोगिराखाली घडी करून ठेवले होते. तुम्हीही तसेच केले असते तर, तुमचे कपडेही माझ्यासारखेच कोरडे राहिले असते!'

तो गिळताना त्याचा आग डोंब उडाला आणि त्याच्या डोळ्याला धारा लागल्या. हे पाहून त्याच्या बायकोला आनंद झाला आणि विजयाच्या भरात तिने प्रश्न केला.

'काय हो ! आता तुम्हाला रडायला काय झालं ?' होजा रागाने धुमसत म्हणाला, 'मी रडतो याच्यासाठी की तुझी ती बिचारी प्रेमळ आई बापडी मरून गेली आणि तुझ्यासारखी बेकार, लबाड मुलगी मात्र जिवंत राहिली ! तूही का नाही मेलीस तिच्याबरोबर ?'

## ७५ : याहून आंधळा बराच मी !

एके दिवशी एका मित्राने होजाजवळ तक्रार केली. 'काय करावं, माझे डोळे दुखतात हो ! तुम्ही तरी काही उपाय सांगा ?' होजा त्याला उपहासाने म्हणाला, 'हे पाहा मागे एकदा माझा दात दुखत होता तेव्हा तो उपटून काढल्याखेरीज मला काही आराम वाटला नाही. यावरून तुम्हाला वाटेल ते समजा.'

## ७६ : जसा प्रश्न तसे उत्तर

लोक होजाला वाटेल ते प्रश्न विचारीत आणि मग होजाही त्यांना तसेच उत्तर देई. एकाने विचारले की, 'का हो, पहाट झाली म्हणजे सारे लोक कामाला जातात. काही या दिशेला काही त्या दिशेला हे असे का ?' होजा शांतपणे म्हणाला, सारेच लोक एकाच दिशेला गेले तर पृथ्वीचा तोल जाऊन ती उलटसुलट होणार नाही का ?' आणि साऱ्या श्रोत्यांनी माना हलविल्या.

## ७७ : मी समजू तरी काय ?

**एकदा** होजाची बायको एकाएकी उर बडवून घेऊ लागली, तटातट केस तोडून रडत, ओरडत ती शेजाऱ्यांकडे धावली आणि किंचाळली, ‘ माझे मालक वारले हो. ’ सारे शेजारी आश्चर्याने विचारू लागले, ‘ केव्हा अन् कोठे ? ’

ती म्हणाली, ‘ गावाबाहेरच्या झाडीत. ’ शेजाऱ्यांनी विचारले, ‘ अहो, तुम्हाला हे कोणी सांगितले ? ’

ती भाबडेपणाने म्हणाली, ‘ अहो सर्वांत भयंकर गोष्ट आहे ती हीच. हे वारले तेव्हा त्यांना मदत करायला त्यांच्याजवळ एकही माणूस नव्हतं. त्यांची ही अशी अवस्था झालेली असून त्यांना बापड्यांना इतक्या लांब येऊन मला ही बातमी स्वतःच सांगावी लागली. ’

आणि सारे शेजारी का हसत आहेत हे त्या बापडीला कळेना !

---

## ७८ : मुद्रिके ! शोधू कुठे तुजला ?

**एके** दिवशी होजाची अंगठी घरात कोठेतरी पडली. तो मात्र बाहेर जाऊन दाराजवळ शोधाशोध करू लागला. एका शेजाऱ्याने त्याला सहज विचारले, ‘ का हो ! काय शोधणं चाललं आहे ? ’

होजा म्हणाला, ‘ माझी अंगठी हरवली आहे हो ! ’

शेजाऱ्याने विचारले, ‘ कुठेशी हरवली ती ? ’

होजाने उत्तर दिले, ‘ माझ्या शेजघरात. ’

‘ अन् मग तुम्ही इथे बाहेर येऊन तिचा शोध चालविला आहे, तो कसा काय ? ’ शेजाऱ्याने गोंधळून प्रश्न केला.

होजा म्हणाला, ‘ अहो, इथे अधिक चांगला उजेड आहे म्हणून तर ! ’

---

## ७९ : आग रामेश्वरी । बंब सोमेश्वरी

एके दिवशी होजा आपल्या गाढवावर बसून घरी परत येत होता. वाटेत तो एका जंगलाशी उतरला आणि आपला झब्बा गाढवाच्या खोगिरावर ठेवून झुडपात गेला. तो जरा दूर गेल्यावर एक चोर हलक्या पावलानी तेथे आला आणि खोगिरावरील झब्बा हळूच उचलून पळून गेला.

होजा परत आल्यावर त्याला दिसले की, आपला झब्बा नाहीसा आहे. त्याची समजूत झाली की, आपल्या गाढवानेच तो कोठेतरी लपवून ठेवला असावा. म्हणून त्याने गाढवाच्या पाठीवरील खोगीर काढून आपल्या पाठीवर बांधले. मग गाढवाला चाबकाचा एक फट-कारा मारून तो म्हणाला, ‘ चोर कुठला ! चल, माझा झब्बा परत दे मग मी तुझं खोगीर परत देईन.’

---

## ८० : कोणता मानू चंद्रमा ?

एके दिवशी अंधार पडल्यावर होजाला विहिरीत चंद्राचे प्रतिबिंब दिसले. त्यावर तो घाबरून म्हणाला, ‘ अरे बापरे ! हा चंद्र तर माझ्या विहिरीतच पडला. आता मी त्याला बाहेर काढलं नाही तर जगबुड होईल आणि सारे मलाच दोष देतील. काही तरी केलं पाहिजे.

असे म्हणून त्याने दोराच्या टोकाला एक गळ बांधला आणि तो चंद्राचे प्रतिबिंबाखाली गेलेला पाहून त्याने तो दोर ओढण्यास सुरुवात केली. परंतु, तो गळ तळाशी असलेल्या एका दगडाखाली अडकल्याने वर येईना. इकडे होजा मारे जोर करून दोर ओढीत होता. अखेर



त्यामुळे तो दगड सैल होऊन बिहिरीतून जोराने बाहेर वर उडून गेला. दोरही वर आला आणि त्या धक्क्याने होजा पार उताणा होऊन खाली पडला.

तो तसा जमिनीवर पडला असता त्याला आकाशातला चंद्र दिसला. त्यावर तो आनंदाने ओरडला, 'परमेश्वराची कृपा ! मला फार श्रम पडले हे खरं पण अखेर या चंद्राला मी त्याच्या पूर्वीच्या जागी नेऊन ठेवू शकलो हे काय थोडं झालं ?'

---

## ८१ : ईशेच्छा प्रमाण

**एकदा** कोणा एकाने होजाला प्रश्न केला, 'काय हो, परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे नेहमीच घडतं हे खरं आहे का ?'

होजाने उत्तर दिले, 'माझ्या आठवणीप्रमाणे पाहिलं तर, हे घडत आलं आहे. जर तसं नसतं तर एखादे वेळी तरी माझ्या इच्छेप्रमाणे

काही गोष्टी घडल्या नसत्या का? तसं कधीच झालं नाही. यावरून 'परमेश्वराची इच्छा प्रमाण हे सिद्ध होत नाही का?'

---

## ८२ : हसत हसत फसवुनि !

**एकदा** होजाचे खेचर मेले त्यामुळे दुसरे खेचर विकत घेण्यासाठी तो बाजारात गेला. तेथे एक वळकटसे खेचर खरीद करून तो घराकडे निघाला. पण घडले असे की, ज्या दोन माणसांकडून होजाने हे खेचर विकत घेतले होते ते दोघेही फार लबाड आणि हिकमती होते. ते होजाच्या मागोमाग निघाले. जवळपास कोणी नाही असे पाहून एकाने त्या खेचराच्या गळ्याला बांधलेला दोर कापून टाकला आणि तोच दोर आपल्या गळ्याला गुंडाळून तो स्वतः होजाच्या मागून मुकाट्याने चालू लागला. इकडे तो दुसरा चोर त्या खेचराला घेऊन बाजारात परत गेला.

होजाला मात्र याचा काहीच पत्ता नव्हता. थेट आपल्या गोठ्याशी गेल्यावर त्याने मागे पाहिले तर त्याला दिसले की, दोराच्या टोकाला खेचराऐवजी एक माणूस बांधलेला आहे. होजाने आश्चर्याने विचारले, 'अरे, तू इथे कसा?'

तो माणूस डोळ्यात पाणी आणून म्हणाला, 'गुरुजी माझ्या आईला मी छळलं त्याचा राग येऊन तिने जादूने माझे रूपांतर या खेचरात करून टाकले होते. पण माझे सुदैव असे की तुमच्यासारख्या संत सज्जनाने मला विकत घेतले. त्यामुळे त्या जादूचा प्रभाव नष्ट झाला आणि मी पुन्हा माणूस बनलो.' होजा उद्‌गारला! 'खरोखर परमेश्वराची करणी अगाध आहे.' त्या माणसाच्या गळ्यातला दोर काढून तो त्याला म्हणाला, 'जा बाबा तुझ्या घरी. पण माझं एवढं ऐक. पुन्हा तुझ्या आईला राग येईल असं मात्र काही करू नकोस.'

दुसऱ्या दिवशी खेचर खरीदी करण्यासाठी होजा पुन्हा बाजारात गेला. कालचेच खेचर धरून तो दुसरा चोर उभा राहिलेला त्याला दिसला. हे पाहून होजा लगबगीने त्या खेचराजवळ गेला आणि सहानभूतीने त्याला म्हणाला, ' अरेरे ! झाली का तुझी पुन्हा कालचीच अवस्था ! तरी तुला मी बजावलं होतं की, तुझ्या आईला राग येईल असं पुन्हा काही करू नको म्हणून ! भोग आता त्याची फळे ! '

## ८३ : बालपणीचा काळ सुखाचा

**एके** दिवशी खेड्यातली काही वात्रट पोरे एका मोठ्या झाडाखाली खेळत होती. तेवढ्यात त्यांना दुरून होजा त्या झाडाकडे येताना दिसला. यावर त्यांनी कट केला. तो असा की, काहीतरी करून होजाला त्या झाडावर उंच चढवावे आणि त्याचे खाली ठेवलेले जोडे चोरून पळून जावे.

होजा जवळ आल्यावर ती पोरे नाचत नाचत ओरडू लागली, ' या झाडावर कोणीही चढू शकत नाही—कोणीही चढू शकत नाही.'

हे ऐकून होजा म्हणाला, ' मी चढून दाखवितो. '

असे म्हणून त्याने आपला झब्बा वर करून आपल्या पट्ट्याला खोचला आणि त्या झब्ब्याच्या घड्यात आपले जोडेही बांधून घेतले. ते पाहून ती वात्रट पोरे खजील झाली. तरी त्यांनी विचारले, ' अहो होजा गुरुजी ! झाडावर चढताना जोडे कशाला नेता बरोबर ? '

होजा हसत हसत म्हणाला— ' बरं का रे पोरांनो ! कुणाला ठाऊक वर गेल्यावर या झाडाच्या पानाआड एखादा रस्ता दडलेला आढळायचा. म्हणून म्हटलं आपले जोडे असू द्यावेत बरोबर ! '

## ८४ : झणि हे कर या दीना

एके दिवशी होजा माडीवर खिडकीशी बसला असता एका अनोळखी माणसाने त्याच्या दारावर थाप मारली.

होजाने खिडकीतून खाली ओणवून विचारले,

'काय हो, काय हवंय तुम्हाला ?'

तो माणूस म्हणाला, 'जरा खाली येता का मी सांगतो तुम्हाला !'

होजा कुरकुरतच खाली गेला. त्याने दार उघडल्यावर तो माणूस म्हणाला– 'मालक, काही धर्म करा की गरिबाला !'

होजा त्याला म्हणाला, 'माडीवर चल.' तो भिकारी मोठ्या आशेने होजाच्या मागून माडीवर गेला. होजा पूर्वी जेथे बसला होता त्या खिडकीशी जाऊन पुन्हा आरामात बसला आणि म्हणाला, 'मी तुला काही एक देणार नाही, देवाकडे मदत माग जा.'

तो भिकारी चिडून म्हणाला, 'नाहीच म्हणायचं होतं तर ते खालीच म्हणता आलं नसतं का तुम्हाला ? मला माडीवर येथवर का ओढून आणलंत उगीच ?

होजाने टोला हाणला. 'भल्या गृहस्था, ज्या कारणासाठी तू मला खालच्या मजल्यापर्यंत ओढून नेलंस त्याच कारणाकरिता मी तुला वर ओढून नेलं. आता तरी समजलं का ?'

---

## ८५ : बघुनि त्या भयंकर भूता !

एके दिवशी होजा डोंगर कपारीतून हिंडत असता त्याला अचानक एक राक्षसासारखा दिसणारा, दांडगेश्वर असा धनगर भेटला. होजाकडे रागाने आणि तुच्छतेने पाहून म्हणाला, 'हं, तू एखादा विद्वान पंडित दिसतोस नाही का ?'

होजा म्हणाला–' होय. '

तो दांडगेश्वर म्हणाला, ' या दरीच्या तळाशी असलेली ती प्रेते आणि हाडे दिसताहेत तुला ? '

होजाने त्या दिशेला वाकून पाहिले आणि त्याला कापरेच भरले.

तो दांडगेश्वर मिशीला पीळ देत म्हणाला, ' मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर ज्यांना देता आलं नाहीत त्यांना मी मारून टाकलं आणि दिलं त्या दरीत फेकून. त्यांचीच ही हाडं आहेत. आता तुझी पाळी आहे. तुला मी तोच प्रश्न विचारणार आहे. '

होजा धैर्याने म्हणाला, ' विचार तुझा प्रश्न ! '

तो दांडगेश्वर सांगू लागला, ' हे पाहा प्रतिपदेची चंद्रकोर अगदी बारीक असते. वाढता वाढता ती एखाद्या चाकासारखी गोल होते. पौर्णिमेनंतर मात्र तो वाटोळा चंद्र लहान, लहान होत जाऊन अखेर नाहीसा होतो. नंतर नवा चंद्र उगवतो. आता माझा प्रश्न असा आहे की, त्या जुन्या चंद्राचं काय होतं ? बोल लौकर.'

होजा ताबडतोब म्हणाला, ' अरे, एवढंसुद्धा माहित नाही का तुला ? त्या वाटोळ्या चंद्राचा धार लावण्याच्या चाकासारखा उपयोग करतात. वादळ झालं म्हणजे वीज चमकते ती तू पाहिली नाहीस काय ? त्या चाकावरच्या ठिणग्या त्या याच ? ' यावर तो दांडगेश्वर मोठ्याने हसून म्हणाला, ' बरोबर ! माझ्या मनात हेच होतं. '

---

## ८६ : मान ना मान । मै तेरा मेहमान ॥

एके दिवशी एका शेतकऱ्याने होजाला एक ससा आणून दिला आणि तो निघून गेला ! त्यानंतर तो एका आठवड्याने परत आला

पण होजाने त्याला ओळखले नाही. त्यावर तो शेतकरी म्हणाला, ‘अवं, रावसाब ! तो ससा म्याच दिला की तुम्हाला सवता !’

होजाने त्याला घरात बोलाविले. शेतकऱ्याचा तो ससा पूर्वीच खाऊन संपला होता तरीही त्या शेतकऱ्यापुढे त्याने एक वाडगाभर रस्सा ठेवून म्हटले, ‘हा रस्सा तुमच्या सशाचाच बरं का !’

काही दिवसांनंतर शेतकऱ्यांचे एक टोळकेच होजाच्या घरात शिरले. आरामात बैठक मारून त्याचा म्होरक्या म्हणाला, ‘अव तुम्हाला त्यो ससा दिला न्हवता का ? त्या देणाऱ्याचं आम्ही भाऊबंद.’ होजाला चरफडतच का होईना त्यांना देखील वाडगा, वाडगा रस्सा वाढावा लागला.

आणखी एक आठवडा उलटला तेव्हा पूर्वीपेक्षाही मोठे शेतकऱ्यांचे एक टोळके होजाच्या दाराशी येऊन ठेपले.

हे लोक कोण आहेत याची होजाला अंधुकशी कल्पना आली होतीच. तरीही त्याने विचारले, ‘कोण तुम्ही ?’

ते लोक म्हणाले ‘आम्ही व्हंय ? अवं, तुम्हाला ससा देणाऱ्या शेतकऱ्यांच्या भाऊबंदाचं आम्ही सारं शेजारी न्हवं का ?’

आता मात्र होजाला या लोकांच्या लोचटपणाचा सपाटून राग आला. तरी वरकरणी हसून तो म्हणाला, ‘या की आत !’ ते सारे पंगतीने बसल्यावर त्याने प्रत्येकापुढे पाण्याने भरलेला एक एक वाडगा ठेवला. त्याची चव घेतल्यावर तोंडं वाकडी करून ते सारे म्हणाले, ‘अवं, ह्ये काय वाढलं तुम्ही ?’

होजा दात खाऊन म्हणाला, ‘हें होय ? मला ससा देणाऱ्या शेतकऱ्याला मी जो रस्सा दिला आणि त्याच्या भाऊबंदांना त्याचं पातळ पाणी दिलं त्या रस्स्याच्या फुळकावणीचं हे साधं पाणी तेवढं तुमच्यासारख्या त्यांच्या शेजाऱ्यांसाठी आता उरलं आहे. हवं तर ते प्या आणि मुकाट्याने आपली वाट सुधारा !’

## ८७ : मद्दा घोर मरणातून सुटला !

एके दिवशी होजा हा शेतातून चालला असता एक मस्त बैल फुत्कार सोडीत, शिंगे रोखून त्याच्या रोखाने धावत आला. होजाने आपला अंगरखा सावरून जीव बचावण्यासाठी कुंपणाकडे धूम ठोकली. त्या कुंपणातून त्याने जवळ जवळ सूर मारून पलीकडील बाजू गाठली खरी पण त्याचे अंग ओरखाड्यांनी थोडेबहुत जाया झालेच. या नंतर एक आठवडा लोटला.

त्यानंतर एके दिवशी होजा खेड्यातल्या रस्त्यावरून चालला असता, तोच मस्त बैल एका गाड्याला जुंपलेला त्याला दिसला.

यावर होजाने आपली काठी उगारली. तो त्या बैलाला बडवून काढू लागला.

ते पाहून त्या गाड्यावर बसलेल्या शेतकऱ्याने रागाने विचारले, 'ए हे काय चालविले आहेस तू? माझ्या बैलाला हात लावू नकोस.'

धापा टाकीत टाकीत होजाने उत्तर दिले, 'आमच्या दोघांच्या भांडणात तू पडू नकोस. मी याला का बडवीत आहे हे तुझ्यापेक्षा तुझ्या बैलाला अधिक चांगले ठाऊक आहे.'

---

## ८८ : वारुवरि होऊनि स्वार....

एके दिवशी होजा एका खूपशा उंच घोड्यावर चढण्याचा प्रयत्न करीत होता. ते त्याला जमेना. तो सारखा घसरून खाली येऊ लागला. आपली अब्रू वाचविण्यासाठी लोकांना उद्देशून तो म्हणाला, 'काय करावं, वय झालं म्हणजे अस्सं होतं माणसाचं. नाही तर आम्ही ऐन भरात असताना....' असे म्हणत भोवतालच्या लोकांना त्यावर काय

वाटते आहे ते पाहाण्यासाठी त्याने भोवताली नजर फिरविली, पण भोवताली चिट्पाखरूही नव्हते.

हे पाहून होजा स्वतःशीच पुटपुटला, ‘आता खरं बोलायचं झालं तर, माझ्या तरुणपणी देखील माझी हीच अवस्था होत असे म्हणा?’

## ८९ : उधार-उसनवार

**एकदा** एका शेजाऱ्याने होजाला विचारले, ‘काहो कपडे वाळत घालायची तुमची दोरी मोकळी असली तर जरा देता का मला.’

होजा म्हणाला, ‘पाहतो हं!’ असे म्हणून तो घरात गेला. जरा वेळाने बाहेर येऊन तो म्हणाला, ‘काय करावं, आमची दोरी मोकळी नाही हो! माझ्या बायकोनं त्यावर पीठ टांगून ठेवलं आहे.’

शेजारी उसळला, ‘काय सांगता राव, कपडे वाळत घालायच्या दोरीवर पीठ टांगलेलं या दुनियेत कोणी ऐकलं आहे का?’

होजा थंडपणे उत्तरला, ‘ऐकलं आहे तर, ज्या लोकांना एखादी वस्तू देण्याची इच्छा नसेल, त्यांच्यासाठी ही खबरदेखील ऐकण्यासारखी असते.’

## ९० : बुभुक्षितः किं न करोति पापम्?

**एके** दिवशी एका फळबागेतील पिकलेली लुसलुशीत फळे पाहून होजाच्या तोंडाला पाणी सुटले. हळूच बागेच्या भिंतीला एक शिडी लावून तो त्या भिंतीवर चढला आणि त्याने ती शिडी वर उचलून घेतली.

होजाच्या दुर्दैवाने त्याची ही सारी हालचाल बागेतील माळी दुरून पाहात होता. त्याने भिंतीशी येऊन विचारले, ‘ काय राव? काय चाललं आहे तुमचं वर ही शिडी घेऊन? ’

होजा थोडा गडबडला खरा, पण लगेच स्वतःला सावरून घेऊन म्हणाला, ‘ अहो, मी या अशा शिड्या विकतोय. ’

माळी म्हणाला, ‘ काय थापा मारता राव? शिड्या विकायला ही जागा साजेशी आहे का? ’

होजा म्हणाला, ‘ काही तरी तुमचं विचारणं, शिड्या फक्त एकाच जागी विकाव्या असा काही कायदा आहे का कुठे? ’

---

## ९१ : धन्य ते गायनी कळा!!

एके दिवशी होजा शहरातील सार्वजनिक स्नानगृहात गेला असता, तेथे दुसरे कोणी नव्हते म्हणून अगदी रंगात येऊन, स्नान करीत असता तो मोठमोठ्याने गाऊ लागला.

आपल्या भरदार आणि पल्लेदार आवाजावर तो भलताच खूष झाला होता. तो इतका की, बाहेर पडल्यावर जवळच्या मशीदीच्या मिनारावर चढून नेहमीच्या बांग देणाऱ्या ऐवजी दुपारच्या प्रार्थनेसाठी स्वतःच तो गाण्याच्या सुरात बांग देऊ लागला.

या नव्या आवाजाने मिनाराखाली, चौकात लोकांची गर्दी जमली. होजाला धन्यता वाटू लागली. तेवढ्यात घोळक्यातील एका माणसाने ओरडून म्हटले, ‘ अरे होजा! तुझं या मिनारावर काय काम आहे? बकऱ्यासारख्या आवाजात कशाला ओरडतोस? नेहमीच्या बांग देणाऱ्याला त्याचं काम करू दे. ’ कठड्यावरून वाकून होजा त्या माणसाला आव्हान देत म्हणाला, ‘ अरे जा जा, माझा खरा भरदार आवाज

कसा आहे याची प्रचिती पाहायची असेल तर, या इथे कुणी तरी एक स्नानगृह बांधून काढा. अन् मग माझा आवाज कसा घुमतो; गर्जतो ते बघून घ्या.'

---

## ९२ : वेड्याचे घर उन्हात!

**एकदा** एका माणसाने होजाजवळ तक्रार केली. 'काय करावे? माझ्या घरात, सूर्यप्रकाशच म्हणून कसा तो येत नाही.'

होजाने त्याला विचारले, 'काय हो तुमच्या बागेत तरी सूर्यप्रकाश येतो का?'

त्या माणसाने उत्तर दिले, 'हो, येतो तर?'

होजा म्हणाला, 'मग झालं तर, तुमचा प्रश्न सुटला. तुमचं घरंच उचलून बागेत ठेवा, म्हणजे झालं.'

---

## ९३ : वारा फोफावला

**एके** दिवशी सकाळी होजा हळूच एका भाजीपाल्याच्या मळ्यात शिरला. गाजरे, भोपळे, शेंगा, कलिंगड हाती लागेल ते सारे पोत्यात भरून घेऊ लागला.

तेवढ्यात त्या मळ्याचा मालक तेथे आला आणि म्हणाला, 'काय चाललंय तुझं इथं? तू कसा इथं?'

होजाने लगेच थाप मारली, 'अहो काल संध्याकाळी एक खूप मोठी वावटळ सुटली आणि तिनं मला गावातून उचलून थेट इथे आणून टाकलं.'

मालक म्हणाला, ‘ अस्सं का ? अन् मग हा सारा पोतंभर भाजीपाला कोणी तोडला ? ’

होजा म्हणाला, ‘ अहो, ती वावटळ मला सारखी इकडून तिकडे आणि तिकडून इकडे गडबडा लोळवीत होती. मग काय, आधारासाठीं माझ्या हातात येईल ती वस्तू मी पकडून ठेवू लागलो. तोच हा भाजीपाला.’

त्या मालकाने रागाने विचारले, ‘ असं काय, ठीक आहे. तो सारा भाजीपाला या पोत्यात कोणी भरला एवढं सांग. ’


आता मात्र होजाने हात टेकले. तो म्हणाला, ‘ हे बघा, इतक्या झटपट मला प्रश्न विचारून घाबरून सोडू नका. तुमच्या मागच्या प्रश्नाचं उत्तर आताशी मी मनात तयार करीत आहे. तोच तुमचा नवा प्रश्न आला. मला जरा दम खाऊ द्या. अन् मग बघा. माझ्या उत्तराची करामत. अन् हे पाहा क्षुल्लक भाजीपाला काय घेऊन बसलात, काही मोठे महत्त्वाचे प्रश्न काढा. म्हणजे आपण चर्चा करू.’

---

# १४ : दुनिया क्या है ?

एके दिवशी शहराबाहेर लांबवर असलेल्या एका कबरस्तानाजवळ होजा एकटा फिरत होता. तेवढ्यात त्याला दुरून घोडेस्वारांची एक टोळी भरधाव त्याच्याकडे येताना दिसली. होजा घाबरला. त्याला वाटले या दरोडेखोरांच्या हाती सापडलो तर आपली शंभर वर्षे भरली. लगेच त्याने आपला झब्बा, सदरा वगैरे कपडे काढून एका रिकाम्या कबरीत आश्रय घेतला. तेथे तो एका प्रेतासारखा पडून राहिला.

ते घोडेस्वार जवळ आल्यावर त्यांना त्या कबरीत पसरलेला होजा दिसला. त्या घोडेस्वारांना होजा माहीत असल्याने ते तेथे थांबले.



एकानं विचारले, 'अहो होजा गुरुजी, या कबरीत पडल्या पडल्या काय चाललंय तुमचं ?'

यानंतरच्या काळात या प्रश्नाला आपण कसे समयोचित उत्तर दिले ते होजा नेहमी मोठ्या अभिमानानं सांगत असे. ते उत्तर असे–

'खरं तर मी मेलो होतो. पण मनात सहज विचार आला की, या जगाकडे पुन्हा एकदा एक नजर टाकावी, म्हणून परत आलो झालं.'

---

## ९५ : जमविला रानचा मेवा !

**मोंगल** जमातीचा नायक तैमूरलंग हा मोठा पराक्रमी आणि क्रूर योद्धा होता. ऑटोमन साम्राज्यातील तुर्कांचा त्याने अक-शहीर येथे

पराभव केला होता. त्या शहरात तो राहात असता होजाशी त्याची मैत्री जमली होती.

एके दिवशी तैमूरलंगाच्या भेटीस जाताना बरोबर काही भेट न्यावी म्हणून, आपल्या परिस्थितीप्रमाणे होजाने बीटरूटची एक जुडी बरोबर घेतली. रस्त्यात त्याला भेटलेला एक माणूस म्हणाला कीं, बीटरूटची ही भाजी देणगी म्हणून देणे योग्य नव्हे, तैमूरलंगला अंजीर आवडतात. हे ऐकल्यावर होजाने परत जाऊन चांगलं पिकलेले अंजीर भेटीसाठी आणले.

परंतु दरबारात तैमूरलंगाला सोने, चांदी, रत्ने वगैरेच्या नजराण्याची संवय झाली होती. त्यामुळे त्याला पूर्वीं आवडत असलेल्या अंजीरांची आता किंमत वाटेना. होजाने अंजिरे पुढे केल्यावर त्याने आपल्या नोकराना तीच अंजिरे होजाच्या अंगावर फेकून मारण्यास आज्ञा केली.

इकडे होजाच्या मस्तकावर, अंगा-खांद्यावर अंजिरांचा वर्षाव चालला असता होजा मात्र हात जोडून परमेश्वराचे आभार मानीत होता. हा प्रकार पाहून तैमूरलंगाने आपल्या नोकरांना थांबण्यास सांगितले. तो म्हणाला, ‘ होजा, अरे झालेल्या प्रकाराने तू अगदी शरमिंदा व्हायला पाहिजेस अन् तू परमेश्वराचे आभार मानतोस ते कशासाठी ? ’

होजा म्हणाला, ‘ मी बीरूटटच्या गड्डया आणल्या नाहीत, यासाठी परमेश्वराचे आभार मानीत आहे.’

---

## १६ : ज्या गावच्या बोरी–

दुसऱ्या एका प्रसंगी होजा तैमूरलंगाच्या भेटीस आला असता त्याला असे दिसले की, तैमूरलंगाने आपला लंगडा, दुखरा पाय पुढे

पसरला आहे. होजा आत आल्यावर चालीरीतींप्रमाणे उठून उभा राहण्याऐवजी तैमूरलंग तसाच मख्खपणे बसून राहिला आणि त्याने होजाला आपल्या शेजारी बसण्यास सांगितले. होजाची अशी कल्पना झाली की, तैमूरलंगाच्या मनात मुद्दाम आपला अपमान करण्याचा हेतू आहे. म्हणून खाली बसताना तैमुरप्रमाणेच आपला एक पाय पुढे लांबवून तो खाली बसला. ही आपली नक्कल केलेली पाहून तैमूर रागाने लाल झाला. तो म्हणाला, 'होजा ! तुझ्यात आणि गाढवात फारसं अंतर नाही, हे स्पष्ट दिसतंय !'

होजाने लगेच उत्तर दिले, 'होय महाराज ! फक्त दोन चार हाताचंच ते अंतर आहे.'

---

## १७ : वीतभर लाकूड, हातभर ढलपी

**एकदा** एक इराणी मनुष्य अक्-शहीर येथे येऊन होजा जवळ इस्पहान येथील बादशहाच्या राजवाड्याची अत्यंत प्रशंसा करू लागला. तो म्हणाला, 'अशा काही राजवाड्यात तर दोनशे खोल्या आहेत आणि एक हजार चौरस फूट असा त्याचा विस्तार आहे.'

होजा त्याला म्हणाला, 'अरे हे काहीच नाही. बर्सा येथील सुलतानाने नुकतेच एक इस्पितळ बांधले आहे ते तर दहा हजार फूट लांब आणि...'

त्याच क्षणी बर्साहून नुकताच परत आलेला दुसरा इराणी माणूस तेथे आला. त्याला पाहिल्यावर होजाने आपले पहिले वाक्य पुढे करताना पुस्ती जोडली '....आणि शंभर फूट रुंद'

हे ऐकून पहिला इराणी म्हणाला, 'ही इमारत अगदी विचित्र दिसते. तिची रुंदी लांबीच्या योग्य प्रमाणात का नाही ?

होजा म्हणाला, ' अहो हा आपला मित्र एकदम इथे येऊन ठाकला नसता तर ती रुंदीही त्याच प्रमाणात राहिली असती ! '

---

## ९८ : शर लागला

**एकदां** तैमूरलंगाने आपल्या सैनिकांची तिरंदाजी दाखविण्यासाठी होजाला मैदानात नेले. होजाने बढाई मारली, ' त्यात काय? मी देखील तिरंदाजीत प्रवीण आहे.' लगेच तैमूरने त्याला ते सिद्ध करून दाखविण्यास फर्माविले. होजाने धनुष्य घेऊन निशाणाकडे एक बाण मारला. पण तो कैक फूट पलीकडे गेला.

होजा म्हणाला, ' आपले न्यायाधीश कसे तीर मारतात हे आता मी तुम्हाला दाखविले.' त्याचा दुसरा तीर देखील चुकला. त्यावर तो म्हणाला, ' आपले नगराध्यक्ष असा तीर मारतात.' योगायोगाने त्याचा तिसरा तीर बरोबर निशाणावर बसला. तेव्हा होजा म्हणाला, ' आणि आता होजा कसा तीर मारतो हे मी तुम्हाला दाखविले आहे ! '

---

## ९९ : उपरसे तो खूप बनी

**होजाच्या** एका मित्राने आपले घर बांधले आणि ते पाहण्यासाठी मोठ्या दिमाखाने होजास आमंत्रण केले. घर बांधणीचा तपशील, किंमत, जागा घरातल्या सुखसोयी या साऱ्यांचे त्याने तासन् तास चऱ्हाट वळले. पण होजाला फराळासाठी त्याने.... काहीच दिले नाही. इकडे होजा तर भुकेने अगदी व्याकूळ झाला होता. सारे घर एकदा दाखवून झाले असताही त्या मित्राने पुन्हा दुसरी फेरी काढून

होजाला जेवणघर दाखविले. तेथेच थांबून होजा त्या खोलीची लांबी-रुंदी उंची मोजू लागला; आणि दारे खिडक्या वगैरे सर्व सामानाची पाहणी करून तो तपशील आपल्या स्मरणवहीत टिपून घेऊ लागला. यावर त्याच्या मित्राने विचारले, 'माझं जेवण घर फार आवडलेलं दिसतंय तुम्हाला? तसंच बांधायचा विचार दिसतोय आपला.' होजा म्हणाला, 'विचार तर खराच, पण तो बांधण्याचा नव्हे तर, अन्नाच्या किंमतीचा. कारण, तुमच्या साऱ्या घरात तर राहोच, पण जेवणघरात देखील कोणाच्या दातांवर मारायला अन्नाचा एक कण देखील दिसत नाही. यावरून मला हा विचार आला.'

यावरून त्या मित्राने योग्य ती सूचना घेऊन होजाचे आदरातिथ्य केलं हे सांगायला नकोच.

---

## १०० : रानोमाळ, आंधळ्यांची चाले माळ

एके दिवशी होजा नदीच्या काठावर बसला असता तेथे दहा आंधळे आले आणि म्हणाले, 'अहो, नावाडीबुवा आम्हा दहा जणांना होडीतून पलिकडे घेऊन जा. आम्ही तुम्हाला दहा आणे देऊ. ही संधी बरी आहे म्हणून स्वतः होजानेच त्या लोकांना होडीत बसवून ती होडी वल्हविण्यास सुरुवात केली. पण त्याला नावाड्याचे काम जमेना त्यामुळे होडी धारेला लागताच ती वाकडी तिकडी होऊ लागली. होडीतील एक आंधळा नदीत पडून वाहून जाऊ लागला आणि इतर साऱ्या आंधळ्यांनी एकच गील्ला केला. होजाने दटावले, 'उगीच गडबड करू नका. फार तर दहा आण्याच्या ऐवजी आता मला नऊ आणे द्या म्हणजे संपलं!'

---

## १०१ : श्रमसाफल्य

एके दिवशी बाजारात द्राक्षांचा भाव फारच खाली आला होता. तरीही गम्मत म्हणून होजाच्या एका मित्राने काही पैसे होजाला देऊन त्या किंमतीपेक्षाही कमी किंमतीला द्राक्षे आणण्यास होजाला पाठविले.

होजाने बाजारात जाऊन दुकानदाराशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. अखेर खूपशी कटकट केल्यावर अगदी कमी किंमतीत बरीचशी द्राक्षे घेऊन तो परत आला. मित्रांनी त्याला खबर बात विचारताच आपण किती मेहनत, खटपट करून, किंमतीबद्दल खोटे नाटे सांगून ही द्राक्षे स्वस्तात आणली याचे रंगवून वर्णन केले. त्याच्या मित्राने त्याबद्दल त्याला शाबासकी दिली. यावर होजा म्हणाला. ‘ हे सारं मी तुमच्या शब्दाखातर केले. पण माझ्या हिताकडे देखील मला थोडंसं पाहायला हवं की नको ? ’ ‘ तुम्हीच सांगा. ’ सारे मित्र म्हणाले, ‘ अवश्य ! ते तर पाहिलंच पाहिजे. ’ यावर होजा म्हणाला,

‘ मग असं पाहा, मी एवढे सारे श्रम केले म्हणून आता ही सारी द्राक्ष मी माझ्यासाठीच ठेवतो. ’

---

## १०२ : दिल्या घरी तूं सुखी राहा !

होजाने आपल्या मुलीचे लग्न शेजारच्या खेड्यातील एका तरुणाशी करून दिले. मुलीला घेऊन ती लग्नाची मिरवणूक नवऱ्याच्या घराकडे निघाली. तेव्हा होजाच्या लक्षात आले की, आपल्या मुलीला सासरी कसं वागावं याबद्दलचे चार शब्द सांगण्याची ही शेवटचीच संधी आहे, म्हणून तो पळत पळत त्या मिरवणुकीत शिरला. वधू भोवताली असलेल्या स्त्रियांच्या घोळक्यात घुसून तो मुलीच्या मेण्यापाशी आला

आणि धापा टाकीत म्हणाला, ' पोरी ! मला तुला काही महत्त्वाचा बोध करावयाचा आहे. ' ( कदाचित या साऱ्या धावपळीत होजा आपला संदेश विसरला असावा. त्यामुळे आता काही तरी सांगायला हवंच.) तो म्हणाला, ' मुली, जेव्हा तू सुईत दोरा ओवशील तेव्हा दोऱ्याच्या शेवटाला न विसरता एक गाठ मारीत जा, बरं का ! नाहीतर सारा दोरा सुईच्या नेढ्यातून आरपार निसटून जाईल. अन् तुझी फजीती होईल ! '

## १०३ : शापादपि शरादपि ।

एके दिवशी स्वतःला फार हुशार समजणाऱ्या एका वाह्यात मनुष्याने होजाला चिडविण्यासाठी त्याची हातात धरावयाची काठी मुद्दाम मोडून टाकली. आपली अनेक वर्षांची काठी मोडलेली पाहून होजाला फार राग आला. तो म्हणाला, ' ही काठी म्हणजे माझा उजवा हात होता. तुझ्या कृत्याबद्दल तुला परमेश्वर शिक्षा करीलच. चाळीस दिवसाच्या आत तुझा पाय मोडणार आहे. ' हा शाप ऐकून त्या मनुष्याचा चेहरा पडला आणि त्रस्त मुद्रेने तो बाहेर निघाला. तो इतका विमनस्क झाला होता की, वाटेकडे त्याचे लक्ष नसल्याने एका दगडाला ठेच लागून तो पडला. आणि त्याचा पाय मोडला. त्याच स्थितींत खुरडत येऊन तो होजाला म्हणाला, ' हे रास्त नव्हे. माझा पाय चाळीस दिवसांनी मोडणार असा तुमचा शाप होता. पण तो आजच का मोडावा ? '

होजा निष्ठूरपणे म्हणाला, ' हे पाहा हा परिणाम दुसऱ्या कोणाच्या शापाचा असला पाहिजे. माझा शाप जेव्हा तुला भोवेल तेव्हा तर हातापायावर रांगतच तुला चालावे लागेल. कारण तुझे दोन्ही पाय मोडलेले असतील ! '

द... १०४
वि... किशोर ८३...

# १०४ : झुकानेवाला चाहिये

एके काळी होजाने खेड्यातील पंतोजीचेही काम केले होते. त्यावेळी त्याच्या शिकवणीमुळे आपल्या मुलाच्या झालेल्या प्रगतीने खूष होऊन एका पालकाने मिठाईची एक पेटी होजाला भेट म्हणून शाळेत पाठविली. ती मिठाई खाण्यास होजाला वेळ मिळाला नाही. म्हणून त्याने ती पेटी आपल्या मेजाच्या खणात ठेवून दिली. मध्ये त्याला काही जरुरीच्या कामासाठी थोडा वेळ बाहेर जावे लागले. तेव्हा जाताना तो विद्यार्थ्यांना म्हणाला, 'हे बघा मुलांनो, या मेजाच्या खणात मघा मी एक मिठाईची पेटी ठेवली आहे. हे तुम्ही पाहिलं असेल पण मी तुम्हाला सांगून ठेवतो कीं, माझ्या कट्टर शत्रूकडून ती आलेली आहे. आणि त्याने त्या मिठाईत जलाल वीष मिसळले आहे. म्हणून कोणीही त्या-मिठाईला बोटसुद्धा लावू नये.' असे म्हणून तो गेला.

पण त्या वर्गात होजाचा एक पुतण्या होता. आपल्या काकाच्या स्वभावाची त्याला चांगलीच माहिती होती. होजा बाहेर पडल्याबरोबर त्याने मेजाशी जाऊन तो मिठाईची पेटी बाहेर काढली आणि त्यातील मिठाई तो मुलाना वाटून टाकू लागला.

मुले म्हणाली, 'आपण नाही रे बुवा ही मिठाई खाणार. तिच्यात वीष असेल.'

होजाचा पुतण्या म्हणाला, 'अरे छट,! वीष बीष कुछ नहीं. हे बघा-' असे म्हणून त्याने मिठाईचा एक तुकडा तोंडात टाकला आणि खाऊन टाकला. मिटक्या मारीत तो म्हणाला, 'वा, वा! काय छान आहे ही मिठाई!'

आता साऱ्या पोरांच्या तोंडाला पाणी सुटू लागले. होते. तरीही तीं म्हणाली, 'अरे पण ही मिठाई नाहीशी झाल्याचं होजा पंतोजीला कळलं तर आपली काय स्थिती होईल?'

होजाचा पुतण्या अभिमानाने म्हणाला, ' अरे जा रे ! ते माझ्याकडे लागलं. '

मग काय विचारता ? क्षणात त्या साऱ्या मिठाईचा फडशा उडाला. थोड्या वेळाने होजा परत आला. आणि मेजाचा खण उघडून त्याने पेटी बाहेर काढली. पाहातो तींत मिठाईचा एक कणही शिल्लक नव्हता.

होजाने रागाने गर्जना केली, ' माझी मिठाई कुठे आहे ? '

होजाचा पुतण्या खाली मान घालून पुढे झाला. आणि हळूच म्हणाला, ' मी खाल्ली ती. '

होजाच्या तोंडून आता रागाने धडपणे शब्दही फुटत नव्हता. तो धुसफुसत म्हणाला, ' तू-तू- खाल्लीस ? का....कशी ? '

पुतण्या म्हणाला, ' काका ! माझी लेखणी करण्यासाठी तुमच्या खणातला चाकू घेण्यासाठी मी खण उघडला. लेखणी करता करता तुमचा चाकू मोडला. आता तुम्ही किती रागवाल याची मला जाणीव होती. म्हणून ठरविलं की, आता जगण्यात अर्थ नाही. विहिरीत उडी घ्यावी तर विहीर विटाळणार आणि लोकांची अडचण होणार म्हणून मी आपलं ठरविलं की,....तुम्ही सांगितलेली ती जलाल वीषाची मिठाई खाऊन टाकावी, आपल्या आयुष्याचा शेवट करावा. म्हणून मी ती मिठाई कशी बशी खाल्ली. पण नवल हे की, मला काही एक झालं नाही.'

होजाला मनातल्या मनात चरफडण्याखेरीज दुसरे काहीच करता येण्यासारखे नव्हते. वरकरणी हसून तो म्हणाला, ' असेल, असेल, बहुतेक तो वंशपरंपरा चालत असलेला एखादा गुण तुझ्या अंगी उतरला असेल. '

# १०५ : माणसाचे मोल

**एकदा** तैमूरलंग आणि होजा मिळून स्नानगृहात गेले. दोघांचे अंगमर्दन चालले असता तैमूरने होजाला मोठ्या ऐटीने विचारले, ' काय रे ? मी जगत्ज्जेता आहे. हे तुला माहित आहे. पण मग माझी एकूण किंमत– माझं ऐश्वर्य....किती असेल ? याची तुला कल्पना तरी करता येते का पाहू. '

होजा ताडकन उत्तरला, ' त्यांत काय आहे ? तुमची किंमत पन्नास रुपये. '

तैमूरलंगने विचारले, ' ते कसं काय ? ' माझ्या अंगावरील या अंगरख्याचीच किंमत पन्नास रुपये आहे. '

होजा उत्तरला, ' बरोबर ! त्याचीच किंमत सांगितली मी. त्यांत अधिक काही नाही. '

---

# १०६ जन पळभर म्हणतिल हाय !

**एकदा** एका मनुष्याने होजाला प्रश्न केला, ' काय हो ? या जगाचा शेवट केव्हा होणार आहे असं तुम्हाला वाटतं ? '

होजाने उलट प्रश्न केला, ' जगाच्या कोणत्या शेवटाबद्दल तुम्ही विचारता ? '

तो माणूस रागाने म्हणाला, ' हा काय तुमचा प्रश्न ? असे किती शेवट असतात जगाला ? ' होजाने शांतपणे उत्तर दिले, ' दोन ! माझी पत्नी वारली म्हणजे तो पहिला शेवट आणि मी, स्वतः मला मृत्यू आला म्हणजे तो दुसरा शेवट ) '

---

## १०७ हा वीणा झंकार !

**एकदा** होजाची गम्मत करण्यासाठी त्याच्या मित्रांनी सतारीसारखे एक वाद्य त्याच्या हातात दिले. आणि त्याला त्या वाद्यावर एखादी गत वाजविण्यास सांगितले.

होजाने उजव्या हातात नखी घेऊन ती तारांवरून फिरविण्यास सुरुवात केली आणि डाव्या हाताचे एक बोट कुठेतरी ठेवले. त्या वाद्याचा गोंगाट कर्णकटू असा होत होता. त्याचे मित्र म्हणाले, ' होजा, असंच वाजवितात का हे वाद्य? अरे! दुसरे वादक आम्ही पाहिलेत. ते डाव्या हाताची बोटं वाद्याच्या पडद्यावरून वरखाली सारखी नाचवीत असतात. अन् तू तर एका जागीच धरून बसला आहेस ते का ? '

होजा म्हणाला, ' त्या वादकांना खूप खटपट करून सचा सूर शोधून काढायचा असतो. पण मी तो सूर प्रथमच पकडून ठेवला आहे. मग वरखाली करण्याची ती यातायात कशाला ? '

---

## १०८ : कौशल्य मोठे रचनेत आहे !

**एके** दिवशी होजा मांसाच्या विशिष्ट भागाचा एक तुकडा घरी घेऊन येत होता. त्याला वाटेत एक मित्र भेटला. तो म्हणाला, ' तू हा तुकडा कसा शिजविणार आहेस ? '

होजा म्हणाला, ' नेहमीप्रमाणे. ' तो मित्र म्हणाला, ' तसं नव्हे. अशा तऱ्हेचं मांस नेहमीच्या पद्धतीनं शिजवलं तर अगदी बेचव लागतं. ते नीट चविष्ट रीतीनं शिजविण्यासाठी माझी एक विशेष पद्धत आहे. ती मी तुला सांगतो ऐक ! '

होजा म्हणाला, ' तू तोंडी सांगितलीस तर ती मी विसरुन जाईन. ती मला कागदावर टिपून दे. '

त्या मित्राने त्याप्रमाणे आपल्या सूचना लिहून तो कागद होजाच्या स्वाधीन केला. तो घेऊन होजा घराच्या दाराशी येतो तो, एका भल्या मोठ्या कावळ्याने झडप घालून तो मांसाचा तुकडा आपल्या पंजात पकडून आकाशात भरारी मारली. तरी होजाने मात्र विजयाच्या आनंदात आपल्या जवळील कागद फडफडवीत म्हटले, 'अरे चोरा! तू मांस नेलंस तरी तुला त्याचा काय उपयोग? त्याची पाककृति तर माझ्याजवळ आहे.'

---

## १०९ : मनात आले तर बच्चंजी !

**एकदा** होजा प्रवासाला निघाला असता एका खेड्यात आला. काही वेळ तेथे थांबल्यावर, त्याला आढळून आले की, 'आपली पिशवी कुठे तरी गहाळ झाली आहे.'

यावर तो खेड्यातल्या शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाला, 'हे बघा, सांगून ठेवतो, माझी पिशवी तुम्ही शोधून आणली तर ठीक आहे; नाही तर....'

होजा म्हणजे प्रसिद्ध आणि सन्माननीय अशी असामी. त्या शेतकऱ्यांना वाटले की न जाणो, सरकार दरबारी या माणसाचे भलते वजन असायचे. आपली मात्र कंबक्ती ओढवणार. या भीतीने सारे त्याच्या पिशवीच्या शोधाला लागले. सारे गाव पालथे केल्यावर त्यांना एकदाची ती पिशवी सापडली आणि त्यांनी ती होजाला सुपूर्त केली. यानंतर मात्र एका शेतकऱ्याला राहवेना. त्याने हळूच विचारले, "रावसाहेब! समजा, आम्हाला ही पिशवी सापडली नसती तर काय केलं असतं आपण?' होजा उत्तरला,

'त्यात काय? माझ्या घरच्या जुन्या सतरंजीचा तुकडा घेऊन त्याची दुसरी पिशवी केली असती मी!'

---

## ११० भिंत खचली, कलथून खांब गेला

एकदा होजा आनातोलिया या प्रान्तातून प्रवास करीत असता एका अगदी जुन्या मोडकळीस आलेल्या घरात रात्रीच्या उताऱ्यासाठी राहिला होता. बाहेर जरा वारा सुटला की साऱ्या घरभर तुळ्या वाशांचा करकर आवाज पसरे. अखेर होजाने त्या जागेच्या रखवालदाराला बोलविले आणि तो म्हणाला, ' अरे ! छताच्या या तुळ्या अगदी ढिल्या झालेल्या दिसतात. त्या सारख्या करकर वाजत आहेत. एखादा सुतार आणून त्या दुरुस्त का करीत नाही तुम्ही लोक ? '

रखवालदार म्हणाला, ' अहो या घराला काही धोका नाही. तुम्ही मुळीच भिऊ नका. हे घर म्हणजे, महाराजा ! किती प्राचीन, ऐतिहासिक, महत्त्वाचे शेकडो वर्षांचं जुनं आहे. तुम्ही तर पंडित तर तुम्हाला माहितच असणार की, असं घर म्हणजे, परमेश्वराचं स्तुतिस्तोत्रच होय. ' होजा म्हणाला, ' ते स्तोत्र ऐकू येतंच आहे, मला भीती वाटते ती एवढीच की, त्याची भक्ती अनावर होऊन ते कदाचित् नाचू लागेल आणि आमच्या डोक्यावर कोसळेल.

---

## १११ : मोहरेचे मोल

एके दिवशी होजा आपल्या काही मित्रांसह एका उपाहारगृहात बसला असता, एका मनुष्याने तेथे येऊन एका सोन्याच्या मोहरेची मोड मागितली. त्यावेळी होजाजवळ पैसे नव्हते. पण चारचौघात तसे सांगणे त्याला कमीपणाचे वाटू लागले. म्हणून त्याने ती मोहर घेऊन तळहातात तोलून पाहिली आणि तो म्हणाला, ' अरे ही मोहर कमी वजनाची आहे, तिची मोड देता येणार नाही. '

तो माणूस म्हणाला ठीक आहे; ' तिच्या वजनाच्या मानाने तिची जी किंमत होत असेल. ती मला द्या. ' होजा अस्वस्थ होऊन म्हणाला, ' अरे तिचे वजन फारच कमी आहे. ' तरी तो माणूस आपला हेका सोडीना. तो म्हणाला, ' ही मोहर देणाऱ्या माणसाची मी जाऊन नंतर गाठ घेईन, पण सध्या मला तिची किंमत द्याच. '

आता होजाला वाटले की, आपण चट्कन न बोललो तर आपली नाचक्की होणार. म्हणून तो त्या माणसाला वाटेला लावण्यासाठी रागाने म्हणाला, ' अरे तुझी मोहर इतकी वजनात कमी आहे की, मी तिची मोड देऊ लागलो तर, उलट तुला मलाच एक रुपया देणे भाग पडेल. बोल ! आहे का तुझी तयारी ? '

## ११२ : जाये तो जाये कहाँ

असे म्हणतात की, एकदा अक-शहीर गावातील सारे लोक होजा-वर फार रागावले आणि त्यांनी न्यायाधीशाकडे त्याच्याविरुद्ध तक्रार नेली. न्यायाधीशाने होजाला बोलावून म्हटले, ' इथल्या लोकांना आता तू आवडेनासा झाला आहेस. दुसरीकडे कुठे तरी जा. '

होजा उलट म्हणाला, ' मला हे लोक आवडत नाहीत त्यांनीच दुसरीकडे जावे. ' न्यायाधीश म्हणाला, ' ते अनेक आहेत आणि तू एकच आहेस. '

होजा उत्तरला, ' ते अनेक असल्याने जातील तेथे एखादे खेडे उभारून राहू शकतील. मी एकटा, माझं वय झालेलं. अशात दुसरीकडे नवं घर बांधून, नवं शेत नांगरून मी निर्वाह कसा करू शकणार ? ते तुम्हीच सांगा. '

न्यायाधीशाने फिर्याद काढून टाकली हे सांगायला नकोच.

## ११३ : घर भरा, शिगोशिग भरा

एके दिवशी होजाने आपल्या मुलीजवळ एक मडके देऊन तिला पाणी आणण्यास पाठविले. ती निघाली असता फाड्कन तिच्या थोबाडीत मारून सांगितले, 'खबरदार मडकं फोडशील तर !'

यावर ती मुलगी मोठमोठ्याने रडू लागली आणि तिच्या भोवताली रस्त्यावरचे लोक जमले. ते म्हणाले, 'होजा ! या पोरीनं काही एक केलं नाही, तरी तू तिला का मारलंस ?'

होजा म्हणाला, 'मडकं फोडणं ही किती गंभीर बाब आहे. हे पटविण्यासाठी तिला मी मारलं आणि हा मार तिने हे मडके फोडण्याच्या आधीच दिला पाहिजे. नाही का? एकदा तिने मडके फोडले तर, नंतर तिला मारून काय उपयोग होणार आहे?'

यावर मात्र कोणालाच उत्तर देता आले नाही.

---

## ११४ : एकनूर आदमी। दसनूर कपडा॥

एके दिवशी होजाला एका महत्त्वाच्या मेजवाणीला बोलाविले होते. तो त्याच्या नेहमीच्या साध्या कपड्यात गेला. तेव्हा तेथील घाईगोंधळात कोणीही त्याकडे लक्ष दिले नाही. बराच वेळ तो भुकेला-तान्हेला असा राहिला. नंतर तो बाहेर निसटला आणि घरी जाऊन उंची पोषाख करून पुन्हा पुढच्या दाराने ऐटीत आत आला. तेव्हा त्याच्या डोक्यावर भरजरी फेटा, अंगावर रेशमी अंगरखा आणि त्यावरून मोठा केसाळ किंमती ओव्हरकोट होता. तो येताना दिसताच यजमानाने पुढे जाऊन त्याचे स्वागत केले आणि आपल्या शेजारी बसवून उत्तमोत्तम पक्वानांनी भरलेले ताट त्याच्यासमोर ठेवले....

होजाने अंगातला कोट काढून तो त्या ताटाजवळ नेला आणि म्हणाला, ' आता स्वस्थ होऊ दे. '

यजमान आश्चर्याने म्हणाले, ' अहो हे काय चाललंय तुमचं ? ' होजा उत्तरला, ' हे बघा, ही पक्वान्नं पुढे आली आहेत ती या उंची कपड्यांसाठी, त्यांच्या आतील मनुष्यासाठी नव्हेत. मग माझ्याऐवजी या कपड्यांनाच ती पक्वान्नं खाण्याचा खरा अधिकार नाही का ? खाऊ दे ती त्यांनाच. '

---

## ११५ : चोरावर मोर

एके दिवशी होजाने बाजारात जाऊन एक विजार पसंत केली. त्या व्यापाऱ्याने ती नीट बांधून तयार केली. तेवढ्यात होजाने आपला विचार बदलला. तो व्यापाऱ्याला म्हणाला, ' हे पाहा, या विजारीऐवजी मला एक अंगरखा द्या बरं ! '

अंगरख्याचे पुडके तयार झाल्यावर ते उचलून तो चालू लागला.

व्यापाऱ्याने हाक मारून म्हटले, ' अहो रावसाहेब, तुम्ही अंगरख्याचे पैसे दिले नाहीत ! ' होजा म्हणाला, ' अहो पण त्या ऐवजी मी विजार तुमच्यापाशी दिली की ! '

तो व्यापारी उत्तरला, ' पण तुम्ही त्या विजारीचेही पैसे दिले नव्हते. '

होजा म्हणाला, ' नाहीच देणार ! विकत न घेतलेल्या विजारीचे पैसे मी का म्हणून द्यावेत ? ' या प्रश्नाला त्या गोंधळलेल्या दुकानदाराला उत्तर सुचण्याआधीच होजा तेथून पसार झाला होता.

---

## ११६ : सदा कलहा विना

एके दिवशी सकाळी होजा बाहेर पडल्यावर त्याला त्याचा एक शेजारी भेटला. तो म्हणाला, 'अरे, मला तुझ्याबद्दल फार काळजी वाटत होती. कारण आज भल्या पहाटेस तुझ्या घरात बरीच आरडा-ओरड सुरू होती आणि मग धाडकन् एक मोठा आवाज झाला. घडलं तरी काय असं?'

बऱ्याच नाखुषीने होजा म्हणाला, 'दुसरं काही नाही. मी आणि माझी बायको यांची जरा बोलाचाली झाली आणि तिने रागावून माझा झब्बा जिन्याखाली ढकलून दिला, एवढंच.' असे म्हणून तो घाईघाईने तेथून निघून जाऊ लागला. पण त्याच्या मागोमाग जाऊन त्या शेजाऱ्याने पुन्हा प्रश्न केला–,

'ते असो, नुसता झब्बा खाली पडला तर एवढा आवाज कसा होईल?'

अखेर होजाला नाखुषीने सांगावे लागले,

('त्यावेळी तो झब्बा माझ्या अंगावर होता....म्हणून हा आवाज.... समजलं?....')

---

## ११७ : एके दिनी नवल जाहले !

एके दिवशी होजाने आपल्या शेजाऱ्याकडून एक मोठी कढई उसनी आणली. काही काळानंतर ती परत करताना त्याने तिच्या आत कॉफीचे एक लहानसे भांडे घालून ती परत केली. त्या मालकाने कॉफीच्या भांड्याकडे पाहून विचारले, 'हे काय आहे?'

होजा म्हणाला, 'तुमची कढई माझ्या घरी होती तेव्हा तिने या लहानशा भांड्याला जन्म दिला.'

अर्थात शेजाऱ्याला फार आनंद झाला आणि त्याने ती दोन्ही भांडी ठेवून घेतली.

आणखी काही दिवस गेल्यावर होजाने त्याच शेजाऱ्याजवळ तीच कढई पुन्हा मागितली.

त्या शेजाऱ्याने ती मोठ्या आनंदाने दिली. यानतंर अनेक आठवडे लोटले. शेजाऱ्याला त्या कढईची एकदा फार गरज लागली. तेव्हा त्याने होजाच्या घरी जाऊन तिची मागणी केली.

होजा म्हणाला, 'आता ती कढई मला देता येत नाही, कारण की ती नुकतीच मेली हो!'

शेजारी आश्चर्याने उद्गारला, 'काय म्हणता मेली? कढई कधी मरत असते का?'

होजाने उत्तर दिले, 'का? काय हरकत आहे? कढईने भांड्याला जन्म दिला असं जेव्हा मी तुम्हाला सांगितलं तेव्हा तुमचा त्याच्यावर विश्वास बसला. मग आता ती मेली असं मी सांगत असता त्यावर तुमचा विश्वास का बसू नये.'

---

## ११८ : फटाटोपो भयंकरः ।

एके दिवशी होजा एक कुदळ घेऊन आपल्या बागेत एक खोल खड्डा खणत होता. एकदा त्याचा शेजारी तेथे आला आणि विचारू लागला, 'हे काय चाललंय तुमचं?'

होजा म्हणाला, 'आपल्या समोरचा हा रस्ता दुरूस्त करताना बरीच माती निघाली. ती रस्त्याच्या कडेला पडली आणि ती आता कोठे टाकावी? याची तुम्हाला अडचण पडली होती. म्हणून ती टाकण्यासाठी मी हा खड्डा खणीत आहे.'

शेजारी म्हणाला, ' पण तुम्ही उकरलेली माती मग कुठे टाकणार ? ' होजा गोंधळून म्हणाला, ' त्याचं पुढं पाहू ! सध्या हे तर संपवू द्या मला ! '

---

## ११९ : घास घ्या हो नारायणा !

जेवणाची चांगली चालरीत म्हणजे, पहिली दोन बोटे आणि अंगठा यांत घास उचलून घ्यावा, असा तुर्कस्तानांत प्रघात असे. एकदा मात्र होजाला इतकी भूक लागली होती की, तो आपल्या पांची बोटांनी भाताचे घास भराभर गिळीत होता.

हे पाहून एका शिष्ट माणसाने होजाला कुत्सितपणे प्रश्न केला, ' का हो गुरुजी ! आज तुम्ही पाची बोटांनी जेवण चालविलं आहे, त्याचं कारण काय ? '

होजाने चट्कन उत्तर दिले, ' कारण मला सहा बोटं नाहीत म्हणून, समजलं ? '

---

## १२० : साद घातली सखया तुला !

होजा अगदी लहान मुलगा असताना आपले शिवरी-हिसार हे जन्मग्राम सोडून एकदा अक-शेहरीर या मोठ्या शहरात येऊन राहिला होता. त्याच्या खेड्यातील मशीद अगदीच लहान, झोपडीसारखी होती. अक-शहरीर येथील मशीद खूप मोठी असून तिला एक उंचच उंच सरळ असा मनोरा होता. पहिल्या दिवशी छोटा होजा या मनोऱ्याजवळून चालला असता मनोऱ्याच्या शिखरावर उभा राहून तेथील मुअज्जीमने ( धर्मगुरुंनं ) मोठ्याने ओरडून लोकांना प्रार्थनेसाठी आवाहन केले. ही

त्याची मोठमोठ्याने चाललेली ‘ बांग ’ ऐकून छोट्या होजाचा गैरसमज झाला. त्याला वाटले, मनोऱ्यावर अडकलेला कोणी माणूस मदत मागण्यासाठी आरडाओरड करीत आहे म्हणून तोही खालून ओरडला—

‘ अहो काका ! मी तुम्हाला कशी मदत करणार ? तुम्ही आमच्या खेड्यातल्या एकाद्या झाडावर अडकला असता तर, सरसर फांद्यांच्या आधाराने वर चढून मी तुमची सुटका केली असती. पण तुमचं हे दगडी झाड इतकं गुळगुळीत दिसतं आहे की, मला त्याच्यावर चढताही येणार नाही. माफ करा ! ’

---

## १२१ : तस्करा हाती।

एका चोराने एके रात्री होजाचे गाढव तबेल्यातून चोरून नेले.

दुसऱ्या दिवशी ही गोष्ट षट्कर्णी झाल्यावर होजाचे अनेक मित्र तेथे जमले. पण ते सारे होजालाच दोष देऊ लागले. त्याच्या चुका काढू लागले. एक म्हणाला, ‘ तुम्ही तबेल्याला कुलूपच का घातलं नाही ? ’ तर दुसरा म्हणाला, ‘ तो चोर आला तेव्हा तुम्हाला जाग कशी आली नाही ? ’

होजा म्हणाला, ‘ हे पाहा, सगळी चूक माझीच आहे, असं तुमचं मत दिसतं. ’ पण मला एवढंच सुचवायचं आहे की, ‘ या प्रकरणात त्या बिचाऱ्या चोराचाही थोडा तरी दोष आहे असं वाटत नाही का तुम्हाला ? ’ मग होजाचे मित्र जरा गप्प बसले.

---

## १२२ : द्राविडी प्राणायाम

एकदा होजा हा न्यायाधीश म्हणून काम करीत असता, एका माणसाने फिर्याद केली की, ‘ आरोपीने माझ्या कानाचा चावा घेतला. ’

आरोपीने बचाव केला, ' हे मुळीच खरं नाही. या फिर्यादीनं स्वतःचा कान स्वतःच चावला आणि माझ्यावर खोटा आरोप केला आहे. '

होजाने निर्णय लांबणीवर टाकला. तो आपल्या न्यायाधीशाच्या खोलीत निघून गेला. तेथे गेल्यावर आपली मान वळवून आपल्याला आपल्या कानाचा चावा घेता येईल काय, याचा प्रयोग करून तो शहानिशा करू लागला. असे मानेचे झटके देत असता तोल जाऊन तो खाली पडला आणि त्याच्या डोक्याला चांगलाच मार लागला.

होजा पुन्हा न्यायालयात आल्यावर फिर्यादीने विचारले, ' राव-साहेब, आपला निर्णय काय आहे ? एखाद्या माणसाला स्वतःच्या कानाचा चावा घेता येणं शक्य आहे काय ? '

नुकत्याच झालेल्या प्रयोगामुळे होजा अगदी त्रासला होता. आपले डोके कुरवाळीत म्हणाला, ' हो तर ! ते तर खरं आहेच पण माणसाला स्वतःचं डोकं देखील स्वतः फोडून घेता येतं; हे देखील मी अनुभवाने सांगतो. '

---

# १२३ : हले डुले नाव ही

एकदा होजा कधी नव्हे तो एका शिडाच्या होडीत बसून समुद्र प्रवासास निघाला होता. मध्येच वारा जोराने वाहू लागला आणि ती होडी एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला जोरजोराने डोलू लागली आणि तिचे टोकाचे शीडही फाटले.

काही खलाशी भरभर डोलकाठीवर चढून ते टोकाचे शीड बांधून टाकू लागले. या साऱ्या गडबडीमुळे होजा अगदी गोंधळून गेला होता. तो खलाशाला म्हणाला, ' [illegible] होडी तुम्हाला जर स्थिर ठेवा-वयाची असली तर ते शी[illegible]ाशी बांधण्याची

BVBK-0400104

खटपट करण्याऐवजी तळाशीच बांधून बंदोबस्त का करीत नाही? सारी हालचाल तर तळाशी आहे, टोकाशी नव्हे!'

# १२४ : मधुबिंदु लाभले जिथे!

**एकदा** एका मित्राने मधाने भरलेली एक बरणी होजाजवळ दिली. आपण परत येईपर्यंत ती जपून ठेवण्यास सांगितली. काही दिवसानंतर त्या बरणीत काय आहे, हे पाहाण्याची होजाला उत्कंठा लागली. त्याने बोट बुडवून पाहिले, तो बरणीत अत्यंत स्वादिष्ट असा मध होता. त्याने आपले बोट चाटले आणि मग त्याला त्या मधाची चटकच लागली. रोज केव्हांतरी त्याला तलफ आली म्हणजे, त्या बरणीचे झाकण काढून आत बोट बुडवून तो मध चाखत असे. 'बोटभर मधाने काय होणार?' असे त्याला वाटे.

पुढे कैक दिवसांनी त्याचा मित्र आल्यावर त्याने ती बरणी परत मागितली आणि होजाचे तोंड भरून आभारही मानून टाकले. पुढे ती बरणी हलकी लागू लागल्यावर त्याने ती उघडून पाहिली. तो ती अगदी रिकामी दिसली. यावर त्या मित्राने विचारले, 'यातला मध कुठे गेला?'

होजाने घाईघाईने उत्तर दिले, 'फालतू प्रश्नाना उत्तर देत बसायला मला आता वेळ नाही. तेव्हा ते तुम्ही विचारू नयेत आणि मी सांगू नयेत, तुमची बरणी तुम्हाला मिळाली एवढे पुरे.'

# १२५ : लागले नेत्र हे पैलतिरी।

**शेवटी** होजा फार म्हातारा झाला आणि मृत्युशय्येवर पडला होता. तरी तो आपल्या पत्नीला म्हणाला, ‘अग! तू असे काळे कपडे घातले आहेस. तुझे केस विस्कटले आहेस. तुझा चेहरा रडवा झाला आहे, हे काही ठीक नव्हे, जा तुझे छानसे कपडे घालून ये. केस नीट विंचर आणि जरा हस पाहू.’

त्याची पत्नी रडत म्हणाली, ‘अहो, बोलवतं तरी कसं असं तुमच्याने? तुम्ही फार फार आजारी आहात. कळतं का हे तुम्हाला!’

होजा हसत म्हणाला, ‘अग हो! हे सारं कळतं म्हणून मी तुला तसं करायला सांगतो. ते यमदूत आता कोणत्याही क्षणी इथे येऊन पोहचतील. अन् मग तू चांगली नटून-थटून, मोरासारखी सजून इथे बसलेली त्यांना दिसलीस तर, कोण जाणे, तू त्यांना आवडल्याने माझ्याऐवजी ते तुलाच उचलून घेऊन जातील.’

असे म्हणून होजा हसू लागला आणि हसता हसता त्याने या जगाचा निरोप घेतला.

म. ग्रं. सं.
दा. क्र. ९०४
विषय किशोर क्र. ८3

बा. बा
१५५८०

# प्रस्तावना

बालमित्रांनो आणि नवसाक्षरांनो,

ह्या छोटेखानी पुस्तकात जगातले प्रमुख रहिवासी तुमच्याशी हितगुज करणार आहेत. हे पुस्तक लिहिताना, भूगोलाची अनेक पुस्तके तसेच श्री. वि. द. घाटे यांच्या 'नाना देशांतील नाना लोक' ह्या पुस्तकाचा आणि श्री. न. र. फाटक ह्यांच्या 'रशियाचे संक्षिप्त दर्शन' ह्या पुस्तकांचा आधार मला मिळाला ह्याबद्दल मी त्या सर्व लेखकांचा ऋणी आहे. भारताच्या निमंत्रणाला मान देऊन विश्वबांधवांच्या दिल्लीत भरलेल्या संमेलनाला विविध राष्ट्रांचे प्रतिनिधी आले आहेत, अशी कल्पना केली आहे. आपले राष्ट्रपती त्या संमेलनाचे अध्यक्ष आहेत. चला तर मग. ते पाहा राष्ट्रपतींचे प्रास्ताविक भाषण सुरू झाले. आपणही त्या संमेलनास हजर राहू या.

—सी. ग. देसाई